एन.सी.सी.मध्ये शारीरिक तंदुरुस्तीला विशेष महत्त्व दिले जाते. परेड, धावणे, शारीरिक प्रशिक्षण आणि विविध क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग घेतल्यामुळे विद्यार्थ्यांची फिटनेस सुधारते. त्यामुळे सैन्य, पोलीस किंवा इतर सुरक्षा सेवांबरोबरच क्रीडा क्षेत्रातही करिअर करण्याची संधी मिळते.शूटिंगसारख्या खेळांमध्ये एन.सी.सी.चे प्रशिक्षण विशेष उपयुक्त ठरते. अनेक उत्कृष्ट नेमबाजांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात एन.सी.सी.मधून केली आहे.

कॉर्पोरेट क्षेत्रातील संधी



आजच्या कॉर्पोरेट जगात नेतृत्व, संघभावना आणि शिस्त यांना खूप महत्त्व आहे. एन.सी.सी.चे प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांमध्ये ही सर्व कौशल्ये विकसित झालेली असतात. त्यामुळे अनेक खाजगी कंपन्या अशा उमेदवारांना प्राधान्य देतात.एन.सी.सी. कॅडेट्समध्ये जबाबदारी स्वीकारण्याची क्षमता, वेळेचे नियोजन, प्रभावी संवाद आणि टीम व्यवस्थापन कौशल्ये असतात. त्यामुळे व्यवस्थापन, मानव संसाधन, प्रकल्प व्यवस्थापन आणि प्रशासकीय क्षेत्रांमध्ये त्यांना चांगल्या संधी उपलब्ध होतात.

व्यक्तिमत्त्व विकास आणि रोजगारक्षमता

एन.सी.सी.मधील प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. आत्मविश्वास, शिस्त, सकारात्मक दृष्टिकोन, नेतृत्वगुण आणि सामाजिक जबाबदारी यांसारखे गुण रोजगाराच्या कोणत्याही क्षेत्रात उपयुक्त ठरतात.अनेक वेळा नोकरीच्या मुलाखतीत उमेदवाराच्या शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच त्याच्या व्यक्तिमत्त्वाकडेही लक्ष दिले जाते. एन.सी.सी.चा अनुभव उमेदवाराला इतरांपेक्षा वेगळे स्थान मिळवून देतो.

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील संधी

एन.सी.सी.मध्ये विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय शिबिरांचे आयोजन केले जाते. प्रजासत्ताक दिन शिबिर, राष्ट्रीय एकात्मता शिबिर, थल सैनिक शिबिर आणि युवा विनिमय कार्यक्रम यांसारख्या उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळते.या शिबिरांमुळे विद्यार्थ्यांना विविध संस्कृतींची ओळख होते, नेतृत्व कौशल्ये विकसित होतात आणि राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर अनुभव मिळतो. हे अनुभव भविष्यातील करिअर घडविण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात.

एन.सी.सी. प्रमाणपत्रांचे महत्त्व

एन.सी.सी.मध्ये 'ए', 'बी' आणि 'सी' अशी तीन प्रमाणपत्रे दिली जातात.

ए प्रमाणपत्र – शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी.

बी प्रमाणपत्र – महाविद्यालयीन स्तरावरील प्रारंभिक प्रमाणपत्र.

सी प्रमाणपत्र – सर्वात महत्त्वाचे आणि प्रतिष्ठेचे प्रमाणपत्र.

विशेषतः 'सी' प्रमाणपत्रधारक विद्यार्थ्यांना संरक्षण दलांमध्ये आणि विविध भरती प्रक्रियांमध्ये अधिक लाभ मिळतात. त्यामुळे एन.सी.सी.मध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी 'सी' प्रमाणपत्र मिळिवण्याचा प्रयत्न करावा.

एन.सी.सी. ही केवळ एक विद्यार्थी संघटना नसून व्यक्तिमत्त्व विकास, नेतृत्व प्रशिक्षण आणि राष्ट्रसेवेची भावना जोपासणारी एक प्रभावी चळवळ आहे. एन.सी.सी.मधून विद्यार्थ्यांना भारतीय सैन्य, नौदल, वायुदल, केंद्रीय सशस्त्र पोलीस दल, राज्य पोलीस सेवा, सरकारी नोकऱ्या, शिक्षण क्षेत्र, साहसी पर्यटन, क्रीडा क्षेत्र आणि कॉर्पोरेट जगत अशा अनेक क्षेत्रांमध्ये करिअरच्या संधी उपलब्ध होतात.याशिवाय एन.सी.सी. विद्यार्थ्यांना शिस्त, आत्मविश्वास, नेतृत्व आणि सामाजिक बांधिलकी यांचे मौल्यवान धडे देते. त्यामुळे जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात यश मिळिवण्यासाठी एन.सी.सी.चे प्रशिक्षण अत्यंत उपयुक्त ठरते. राष्ट्रनिर्मितीमध्ये योगदान देणारे जबाबदार नागरिक घडविण्याचे कार्य एन.सी.सी. प्रभावीपणे करत आहे. म्हणूनच विद्यार्थ्यांनी एन.सी.सी.मध्ये सक्रिय सहभाग घेऊन स्वतःच्या उज्ज्वल भविष्याचा मार्ग निश्चित करावा.

कॅडेट – डवले निखिल अनिल
(एस.वाय.बी.कॉम)

तुम्ही किती वेळा जिंकलात,
यापेक्षा तुम्ही हरल्यानंतर किती वेळा उभे राहिलात हे
महत्वाचे आहे. जिद्द ठेवा



कल्पनांपासून स्टार्टअपपर्यंत एक प्रेरणादायी प्रवास

आजच्या काळात प्रत्येकाच्या मनात काहीतरी नवीन करण्याची इच्छा असते. कधी मोबाईल वापरताना, कधी मित्रांशी बोलताना किंवा एखादी समस्या अनुभवताना आपल्याला अचानक एखादी भन्नाट कल्पना सुचते. पण प्रश्न असा आहे की या कल्पनांपैकी किती कल्पना प्रत्यक्ष व्यवसायात रूपांतरित होतात? खरं पाहिलं तर 'आयडिया' असणे ही सुरुवात आहे; पण त्या आयडियाला वास्तवात आणण्यासाठी लागणारी जिद्द, नियोजन आणि सातत्य ही खरी ताकद असते.

एखाद्या यशस्वी स्टार्टअपची सुरुवात नेहमी एका छोट्या समस्येपासून होते. उदाहरणार्थ, लोकांना वेळेवर जेवण मिळत नव्हते त्यातून फूड डिलिव्हरी सेवा सुरू झाली. विद्यार्थ्यांना अवघड विषय समजत नव्हते त्यातून ऑनलाइन शिक्षण प्लॅटफॉर्म तयार झाले. म्हणजेच, प्रत्येक यशस्वी व्यवसायामागे समस्या + उपाय हे सूत्र असते. पण फक्त कल्पना सुचली म्हणून व्यवसाय सुरू होत नाही. त्या कल्पनेची पडताळणी करावी लागते. लोकांना खरंच त्या सेवाची गरज आहे का? ते त्यासाठी पैसे देण्यास तयार आहेत का? हे समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यानंतर येतो बाजाराचा अभ्यास. ग्राहक कोण आहेत, स्पर्धक कोण आहेत आणि आपण त्यांच्यापेक्षा वेगळं काय देणार आहोत याचा सखोल विचार करावा लागतो. व्यवसाय सुरू करताना पैशांची गरज ही मोठी अडचण असते. काही जण स्वतःच्या बचतीतून सुरुवात करतात, काही मित्र-परिवाराची मदत घेतात, तर काही गुंतवणूकदार शोधतात.

स्टार्टअपच्या सुरुवातीच्या टप्प्यात परफेक्ट प्रॉडक्ट तयार करण्यापेक्षा काम चालेल असा साधा प्रॉडक्ट (MVP) तयार करणे अधिक योग्य ठरते. आजच्या डिजिटल युगात मार्केटिंग ही यशाची गुरुकिल्ली बनली आहे. सोशल मीडियाच्या मदतीने अगदी छोटा व्यवसायही मोठ्या प्रमाणात ग्राहकांपर्यंत पोहोचू शकतो. यशस्वी उद्योजक बनण्यासाठी काही गुण अत्यंत महत्त्वाचे असतात नवोपक्रमाची क्षमता, जोखीम घेण्याची तयारी, अपयशातून शिकण्याची वृत्ती आणि सतत प्रयत्न करत राहण्याची सवय.

भारतामध्ये आज स्टार्टअप संस्कृती वेगाने वाढत आहे. त्यामुळे आजचा तरुण नोकरी शोधण्यापेक्षा नोकरी देणारा बनण्याचा विचार करतो. शेवटी, एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी मोठा आयडिया असणे गरजेचे नाही; पण छोट्या आयडियाला योग्य पद्धतीने अंमलात आणणे खूप महत्त्वाचे आहे. कल्पना प्रत्येकाकडे असतात, पण त्या वास्तवात आणणारेच खरे उद्योजक ठरतात.

मोरवाल आदित्य रमेश
टी. वाय. बी. कॉम.






कृत्रिम बुद्धिमत्ता

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) म्हणजे संगणकाने माणसासारखी विचार करण्याची, शिकण्याची आणि निर्णय घेण्याची क्षमता देणारे आधुनिक तंत्रज्ञान होय. आजच्या दिगीतल युगात कृत्रिम बुद्धिमत्ता अनेक क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर वापरली जात आहे. सोशल मिडीयावर दिसणारे अनेक व्हीडीओ, जाहिराती किवा सुचवलेले कंटेंट हे आपल्या आवडीनुसार दाखवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता मदत करते. ई-कॉमर्स वेबसाईटवर ग्राहकांच्या शोध माहितीवर आधारित वस्तू सुचवल्या जातात. ज्यामुळे खरेदीचा अनुभव अधिक सोपा आणि वैयक्तिक बनतो. सायबर सुरक्षा क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता संशयास्पद हालचाली ओळखून फसवणूक टाळण्यासाठी मदत करते. तसेच, भाषांतर, आवाज ओळख आणि रोबोटिक्समध्येही तिचा मोठा उपयोग होत आहे. उद्योगांमध्ये कामे स्वयंचलित करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढत आहे. ज्यामुळे वेळ आणि खर्च वाचतो. अशा प्रकारे कृत्रिम बुद्धिमत्ता हि आधुनिक जीवनातील एक महत्वाची आणि प्रभावी तंत्रज्ञान प्रणाली बनली आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता मध्ये सध्या खूप वेगाने नवीन बदल होत आहे. आणि काही अत्यंत आधुनिक संकल्पना पुढे येत आहेत. आणि काही आधुनिक संकल्पना पुढे येत आहेत. त्यापैकी एक म्हणजे " Explainable AI " ज्यामध्ये AI कोणता निर्णय का घेतो हे समजावून सांगण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे लोकांचा त्यावर विश्वास वाढतो. आणखी एक महत्वाची संकल्पना म्हणजे Edge AI ज्यात डेटा Cloud वर पाठवण्याऐवजी थेट मोबाईल किवा तत्सम उपकरणांवरच प्रोसेस केला जातो. त्यामुळे कामाची गती वाढते. आणि आपली माहिती अधिक सुरक्षित राहते. कृत्रिम बुद्धिमत्ता आता Mental Health क्षेत्रातही वापरली जाते जिथे अख आधारित अँप वापरून लोकांशी संवाद साधून त्यांना मानसिक ताण कमी करण्यास मदत करतात. त्याचबरोबर AI Ethics हि संकल्पना महत्वाची आहे. ज्यामध्ये AI चा वापर सुरक्षित, योग्य आणि कोणालाही नुकसान होणार नाही अशा पद्धतीने केला जातो. आज-काल Multimodel AI देखील विकसित होत आहे, जे एकाच वेळी Text, Image, Audio आणि Video समजू शकते. अशाप्रकारे कृत्रिम बुद्धिमत्ता दिवसेंदिवस अधिक Smart जबाबदार आणि मानवाच्या गरजेनुसार विकसित होत आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता – मानवासोबत प्रगतीचा प्रवास

नाव : वैष्णवी मनोज होंड
वर्ग – एफ.वाय.बी.बी.ए. (सी.ए.)





ग्रामीण भारताच्या आर्थिक क्रांतीची मशालः चेतना गाला सिन्हा

जेव्हा जिद्द, चिकाटी आणि समाज परिवर्तनाची ओढ एकत्र येते, तेव्हा एक सामान्य व्यक्ती असामान्य इतिहास घडवू शकते. महाराष्ट्राच्या दुष्काळी सातारा जिल्ह्यातील म्हसवडसारख्या एका छोट्या गावातून सुरू झालेला एक प्रवास आज जागतिक स्तरावर चर्चेचा विषय ठरला आहे. हा प्रवास आहे 'मानदेशी' फाउंडेशन आणि बँकेच्या संस्थापिका चेतना गाला सिन्हा यांचा. ग्रामीण महिलांना केवळ साक्षरच नाही, तर त्यांना उद्योजक बनवून त्यांच्या हातात आर्थिक सत्तेची चावी देणाऱ्या चेतनाताईंचा जीवनप्रवास प्रत्येक तरुणासाठी, विशेषतः महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे.

चेतना सिन्हा यांचा जन्म मुंबईत झाला. त्यांचे शिक्षणही एका महानगरात झाले. मात्र, त्यांचे मन नेहमीच सामाजिक प्रश्नांमध्ये गुंतलेले होते. विद्यार्थी दशेत असतानाच त्या जयप्रकाश नारायण यांच्या 'संपूर्ण क्रांती' चळवळीकडे आकर्षित झाल्या. मुंबईत सुखासीन आयुष्य जगण्यापेक्षा त्यांनी ग्रामीण भागातील प्रश्न समजून घेण्याला प्राधान्य दिले. याच काळात त्यांचा परिचय शेतकरी नेते विजय सिन्हा यांच्याशी झाला आणि लग्नानंतर त्या सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील म्हसवड येथे स्थायिक झाल्या.

मुंबईच्या चकाकीतून थेट दुष्काळी माण देशी भागात येणे हा त्यांच्या आयुष्यातील मोठा बदल होता. तिथे त्यांनी पाहिले की, महिला कष्टकरी आहेत, कष्टची त्यांची तयारी आहे, पण त्यांच्याकडे भांडवल नाही आणि बँका त्यांना दारात उभे करत नाहीत. हीच परिस्थिती बदलण्याच्या ध्यासातून त्यांच्या कार्याची खऱ्या अर्थाने सुरुवात झाली.

'मानदेशी महिला सहकारी बँके'चा ऐतिहासिक जन्म

चेतना सिन्हा यांच्या कार्याचा टर्निंग पॉईंट म्हणजे 'मानदेशी महिला सहकारी बँक'. १९९० च्या दशकात त्यांनी जेव्हा ग्रामीण महिलांसाठी बँक सुरू करण्याचा विचार केला, तेव्हा रिझर्व्ह बँकेने त्यांचा परवाना नाकारला. कारण? ज्या महिलांना बँकेच्या सदस्य व्हायचे होते, त्या अशिक्षित होत्या आणि त्यांना सही करता येत नव्हती.

परंतु, चेतनाताई आणि त्या ग्रामीण महिला हार मानणाऱ्या नव्हत्या. त्या महिलांनी जिद्दीने अंगठा देण्याऐवजी स्वाक्षरी करायला शिकले आणि पुन्हा परवान्यासाठी अर्ज केला. अखेर १९९७ मध्ये भारताची पहिली ग्रामीण महिला सहकारी बँक 'मानदेशी बँक' सुरू झाली. आज ही बँक हजारो महिलांना कर्जपुरवठा करून त्यांना स्वावलंबी बनवत आहे. 'ज्या महिलांना वाचता येत नाही, त्या हिशोब उत्तम करू शकतात,' हे त्यांनी जगाला दाखवून दिले.

चेतना सिन्हा यांच्या कार्याचे यश केवळ आकड्यांमध्ये नाही, तर त्यातून घडलेल्या व्यक्तींमध्ये आहे. अशीच एक प्रेरणादायी कथा आहे कांताबाई साळुंखे यांची. कांताबाई या एकेकाळी म्हसवडच्या बाजारात सीताफळे विकण्याचे काम करायच्या. अत्यंत गरिबीत दिवस काढणाऱ्या कांताबाईंकडे स्वतःची बचत ठेवण्यासाठी कोणतीही सुरक्षित जागा नव्हती. जेव्हा चेतनाताईंनी बँक सुरू केली, तेव्हा कांताबाई पहिल्या काही सभासदांपैकी एक होत्या. त्यांनी दररोज पाच-दहा रुपये वाचवायला सुरुवात केली.

बँकेच्या मदतीने त्यांनी प्रथम एक छोटी हातगाडी घेतली. त्यानंतर त्यांनी मानदेशी बिझनेस स्कूलमधून व्यवसायाचे आणि आर्थिक नियोजनाचे धडे गिरवले. केवळ फळिवक्रेती म्हणून न थांबता, त्यांनी बँकेकडून कर्ज घेऊन शेळ्या पाळल्या आणि नंतर दुग्ध व्यवसायात पाऊल टाकले. आज कांताबाई केवळ एक यशस्वी उद्योजिका नाहीत, तर त्या मानदेशी बँकेच्या बोर्डावर संचालक म्हणून काम करतात. ज्या महिलेला एकेकाळी बँकेच्या दारात उभे केले जात नव्हते, ती महिला आज बँकेची धोरणे ठरवते, हा चेतना सिन्हा यांनी घडवलेला सर्वात मोठा बदल आहे.

उद्योजकतेचे धडेः मानदेशी बिझनेस स्कूल

केवळ कर्ज देऊन महिलांची प्रगती होणार नाही, हे चेतनाताईंना उमजले होते. त्यांना व्यवसायाचे कौशल्य शिकवणे गरजेचे होते. यातूनच त्यांनी 'मानदेशी बिझनेस स्कूल'ची स्थापना केली. मोबाईल बिझनेस स्कूलच्या माध्यमातून बसमधून ग्रामीण भागातील वाड्या-वस्त्यांवर जाऊन महिलांना शेळीपालन,



दुग्धव्यवसाय, टेलरिंग, आणि अगदी मोबाईल रिपेअरिंगसारखे तांत्रिक शिक्षण दिले जाते. आजपर्यंत लाखो महिलांनी या स्कूलमधून प्रशिक्षण घेऊन स्वतःचे छोटे–मोठे उद्योग सुरू केले आहेत.

तंत्रज्ञान आणि ग्रामीण महिलांची सांगड:

चेतना सिन्हा यांनी नेहमीच आधुनिक तंत्रज्ञानाचा पुरस्कार केला. ग्रामीण महिलांना डिजिटल साक्षर करण्यासाठी त्यांनी 'डिजिटल लिटरेसी' अभियान राबवले. अंगठा लावणाऱ्या महिला आज डिजिटल पेमेंट आणि बँकिंग व्यवहार सहज करतात, याचे श्रेय चेतनाताईंच्या दूरदृष्टीला जाते. त्यांनी महिलांसाठी 'चेंबर ऑफ कॉमर्स'ची स्थापना केली, जेणेकरून ग्रामीण महिलांच्या उत्पादनांना शहरात आणि जागतिक बाजारपेठेत स्थान मिळेल.

जागतिक व्यासपीठावर 'मानदेशी'चा डंका

चेतना सिन्हा यांचे कार्य केवळ म्हसवड किंवा महाराष्ट्रापुरते मर्यादित राहिले नाही. त्यांच्या कार्याची दखल संयुक्त राष्ट्रे (UN) आणि जागतिक आर्थिक मंच (World Economic Forum) यांनी घेतली. २०१८ मध्ये स्वित्झर्लंडमधील दावोस येथे झालेल्या 'वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम'च्या वार्षिक बैठकीचे सह–अध्यक्षपद (Co-chair) भूषवण्याचा मान त्यांना मिळाला. एका ग्रामीण भागात काम करणाऱ्या महिलेने जागतिक नेत्यांसमोर ग्रामीण अर्थव्यवस्थेचे मॉडेल मांडणे, ही भारतासाठी अभिमानाची गोष्ट होती.

त्यांच्या या अतुलनीय कार्याबद्दल त्यांना अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे:

नारी शक्ती पुरस्कार: भारत सरकारतर्फे महिला सक्षमीकरणासाठी दिलेला सर्वोच्च सन्मान.

फोर्ब्स इंडिया लीडरशिप अवॉर्ड.

सोशल ऑन्ट्रप्रन्युअर ऑफ द इयर.

अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांकडून गौरव.

आजच्या तरुण पिढीला, विशेषतः महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना चेतना सिन्हा यांच्या प्रवासातून बरेच काही शिकण्यासारखे आहे.

समस्या हीच संधी: त्यांनी दुष्काळ आणि गरिबीला समस्या न मानता, तिथे बदलाची संधी शोधली.

चिकाटी: रिझर्व्ह बँकेने परवाना नाकारल्यानंतरही त्यांनी प्रयत्न सोडले नाहीत.

सहयोग: एकट्याने काम करण्यापेक्षा समाजाला सोबत घेऊन काम केल्यास मोठे परिवर्तन घडवता येते, हे त्यांनी सिद्ध केले.

चेतना सिन्हा यांनी ग्रामीण महिलांच्या हाताला काम दिले आणि त्यांच्या स्वप्नांना पंख दिले. 'माझे भांडवल माझे धैर्य आहे' (My Capital is My Courage) हा मंत्र त्यांनी घराघरात पोहोचवला. साध्या सुती साडीतील ही महिला जेव्हा जागतिक व्यासपीठावर आत्मविश्वासाने बोलते, तेव्हा ती केवळ एक व्यक्ती नसते, तर ती कोट्यवधी ग्रामीण महिलांचा आवाज असते. त्यांचा जीवनप्रवास आपल्याला शिकवतो की, जर तुमची नियत साफ असेल आणि कष्ट करण्याची तयारी असेल, तर जगातील कोणतीही शक्ती तुम्हाला रोखू शकत नाही.

कु. तनपुरे अक्षदा ज्ञानेश्वर.
एम. कॉम. भाग II





दादामाणूस

अजित पवारांचा दिवस लवकर सुरू होत असे भल्या सकाळी ते अचानक कुठेतरी भेट देतील कशाची तरी पाहणी करतील याचा अंदाज बांधता येत नसे अशाच एका सकाळी राजभवनात शपथ घेऊन त्यांनी महाराष्ट्राला धक्का दिला होता मात्र बुधवारी सकाळी त्यांनी जो धक्का दिला त्यातून महाराष्ट्र सावरलेला नाही संपूर्ण महाराष्ट्र शोकाकूळ झालेला आहे. एका तडफदार नेत्याला आपण गमावले आहे. ज्या अपघातामुळे महाराष्ट्राने असा कर्तबगार नेता गमावला की तो आता कधीही न मिळणारा नेता आहे . असा एक नेता घडण्यासाठी किती तरी वर्षे जातात . राजकारणाच्या आखाड्यात आपल्या काकाप्रमाणे सुमारे पाच दशकेहून अधिक काळ सामान्य जनतेच्या मनावर राज्य करणारे दादा यांनी आपल्या शब्दाचा महिमा कायम ठेवला होता.

जे दादा बोलतात तेच करतात ही त्यांची ख्याती होती जे अशक्य आहे ते स्पष्ट शब्दात सांगणारा नेता मात्र एकदा शब्द दिला की ते काम तडीस नेणार हा नेता. कामाचा माणूस ही त्यांची ओळख होती काम करताना कोण कुठल्या पक्षाचा हेही ते कधी बघत नसत अगदी सामान्यातल्या सामान्य माणसाला आपले वाटत असणारे दादा हे रसायनच वेगळे होते. ङ्क मैने हमेशा मेरे दिल की सुनी है ङ्क असे ते एका मुलाखतीत म्हणाले होते त्याच स्वभावामुळे त्यांनी पारंपारिक राजकारणाचे निकष बदलून टाकले. आपल्या मनात काय काटशह आहे याचा इतरांना पत्ता लागता कामा नये हे अनेक राजकीय नेते. परंतु दादा मात्र स्वाभाविक वैशिष्ट्य असलेले नेते अगदी प्रेमाने बोलणारे बोलता बोलता मिश्कील हास्य करणारे दादा हे नाम निराल होते व आता ते पुन्हा कधीही न होणारे दादा .एखादे काम न होण्यासारखे असेल तर थेट पर्याय बोलणारे दादा जे पोटात आहे तेच ओठात आणणारे दादा मग त्याची नंतर काय किमंत मोजावी लागेल याचा जराही विचार न करणारे दादा .

ते महाविकास आघाडीत असो की महायुतीत आपली थेट भूमिका त्यांनी कधीही लपवून ठेवली नाही जात , पंथ व धर्माचे राजकारण त्यांनी कधीही केले नाही त्यांना संसदीय राजकारणाची शिस्त ही आपल्या काकाची माहीत होती.हळूहळू दादा हे पवार साहेब याच्याकडून शिकू लागले. सामान्य माणूस हा लोकशाहीत मालक आहे त्याबद्दल दुमत नव्हते त्यामुळे एखाद्या कर्तबगार स्टेटस प्रमाणे ङ्क नो नॉन्सेन्स ङ्क अशा पद्धतीने ते काम करत राहिले ते कार्यकर्त्यांचे लाडके दादा झाले त्यांचे कारण हेच दिलेला शब्द पाळणे कार्यकर्त्यांना प्रेमाने जपणे आणि काम करेल त्याला संधी देणे या स्वभावामुळे अजित पवारांना असा जनाधार मिळू शकला की महाराष्ट्राने त्यांना ०६ वेळा उपमुख्यमंत्री केले . महाराष्ट्राच्या राजकारणात उपमुख्यमंत्री पद पहिल्यांदाच आले ते १९७८ मध्ये बॅरिस्टर नाशिकराव तिरपुडे हे पहिले उपमुख्यमंत्री त्यानंतर अलीकडच्या इतिहासात हे पद अजित पवारांसाठीच तयार केले आहे कि काय असे वाटावे इतक्या वेळा त्यांनी आपले उपमुख्यमंत्री पद मिळवले. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण असोत की देवेंद्र फडणवीस किंवा उद्धव ठाकरे असो की एकनाथ शिंदे अजित पवारांनी उपमुख्यमंत्री म्हणून काम करताना आपला ठसा उमटवला .

अजित पवारांचे राजकारण आकाराला आले ते बारामती तालुक्यात त्यामुळे ते ग्रामीण भागातील नेते म्हणून ओळखू लागले .आपला हा ग्रामीण भाग त्यांनी कधी लपवला नाही उलट अभिमानाने मिरवला . त्यांचे वक्तृत्वाचे अनेक चहाते होते भाषण असो की पत्रकार परिषद आपला खास रांगड्या आणि खेळकर शैलीत अजित पवार बोलत या महानगरपालिका निवडणुकीत त्यांनी थेट भाजपला अंगावर घेतले पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत अजित पवारांनी मोठे आव्हान उभे केले ही निवडणूक त्यांनी विकासाच्या मुद्द्यवर आणली अर्थात त्यांना अपेक्षित यश मिळाले नाही मात्र लगेच ते जिल्हा परिषद निवडणुकीच्या तयारीला लागले .

नुकत्याच झालेल्या पुणे ग्रँड सायकलचा टूरचा समारोप होता अजित पवार प्रमुख पाहुणे होते त्यावेळी ते म्हणाले पुणेकरांनी या सायकल स्पर्धेला जोरदार प्रसिद्ध दिला अर्थात महापालिका निवडणुकीत तसा प्रसिद्ध आम्हाला मिळाला नाही.असा मिश्कील टोला त्यांनी लावला व कार्यक्रमात हशा पिकला अश्या अनेक घटना , गोष्ट वेगळी त्यांची विनोदी बुद्धी अतिशय बारीक असा अभ्यास त्यांचा होता.वाडीलाच्या निधनानंतर कुटुंबाची जबाबदारी एकदम उत्कृष्टपणे पार पडली. राजकारणा बरोबर त्यांनी आपले कुटुंब व्यवस्थापन चांगले केले . राजकारणात स्व –विकास वाढत असताना आणि शहकाटशह वाढत असताना उत्कृष्ट राजकारण कसे करावे हे दादांनी दाखवून दिले .

अजित पवारांचा हा दिलखुलास मोकळेपणा त्यांच्या विरोधकांनाही आवडत असे अजित पवारांचे असे व्यक्तिमत्व हे खूप संघर्ष यातून घडले आहे .आपले काका जरी मोठे राजकारणी असले तरी त्यांनी आपली वेगळी ओळख तयार केली



. त्यांच्या प्रवासात ते राजकारणात तसे १९८२ मध्ये आले अगदी गावापासून सुरुवात केलेल्या ग्रामपंचायत , पंचायत समिती , नगर पालिका , जिल्हा परिषद, दुध संघ , कृषी उत्पन्न बाजार समिती , पुणे जिल्हा सहकारी बँक असा प्रवास करत करत ते ०६ वेळा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री झाले . एकाच व्यक्तीला कधीही न जमणारा हा प्रवास त्यांनी काही कालावधीच पूर्ण करून दाखवला . वसंतदादा पाटील ,शंकराव चव्हाण , शरदराव पवार , बॅरिस्टर ए. आर. अंतुले , रामराव आदिक अशा नेत्यांचे राजकारण अजित पवार बघत होते. एन .डी . पाटील , गणपतराव देशमुख असे सगळे विरोधक होते. इंदिरा गांधी सारखे राष्ट्रीय विरोधक आव्हान देण्याचे सामर्थ्य ठेवणारे दादा आपले नेतृत्व तयार करत होते .

यशवंतरावांचा तो अखेरचा काळ होता मात्र त्यांची प्रभावळ महाराष्ट्राच्या राजकारणात अक्षय होती खेळाडूपणे राजकारणात कुस्ती करायची जिंकण्यासाठी कसा डाव टाकायचा . परंतु मात्र विजय असो की पराभव दोन्ही मान्य करून दोघांनाही लोकांसाठी काम करायचे हे एकाच ध्यास असायचा . स्वातंत्र्यलढ्यातून प्रेरणा घेऊन उदयाला आलेले राजकारणही अजित पवारांनी पाहिले आणि २१ व्या शतकासोबत व्यावसायिक झालेल्या राजकारणातही ते टिकून राहिले जुन्या प्रेरणा घेऊन नव्या काळात सामोरे जाताना लोक व लोकविकास हा केंद्रबिंदू कधी सोडला नाही त्यांचा दरारा ही होता आणि अर्ध्या रात्री मदतीसाठी धावून येणारा नेताही हाच आहे असा दादाचा स्वभाव होता . १९९१ मध्ये अजित पवार सर्वप्रथम खासदार झाले. परंतु राष्ट्रीय पातळीवरील राजकारणात आवड निर्माण न झालेले दादा यांनी लोकसभा सोडली आणि ते विधानसभेत आले हा कालखंड जागतिकीकरणाचा होता सगळे बदल होत होते राजकारणही बदलत होते.

महाराष्ट्रात प्रथमच शिवसेना–भाजपचे सरकार आले केंद्रातही एक पक्षीय वर्चस्वाचे दिवस संपले होते. परंतु दादा राज्याच्या राजकारणात कायम टिकवून राहिले व बारामती शहर , पुणे जिल्हा व पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रे ही शहरे वेगाने विकसित होऊ लागली या शहरांना योग्य दिशेने नेण्यासाठी अजित पवार उभे राहिले आणि आजचे बारामती शहर , पुणे जिल्हा , पुणे महानगरपालिका आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका पुणे शहर हा अजित पवारांचा दृष्टिकोनाचा आणि कर्तबगारीचा पुरावा आहे हे त्यांचे विरोधकही मान्य करतील असे काम अजित दादा यांनी खूप कमी कालावधीत पूर्ण केले . अजित पवार राजकारणात आले ते शरद पवारांची बोट पकडून तेव्हा शरद पवारांचे नाव दुमदुमत होते वयाच्या अवघ्या ३८व्या वर्षी मुख्यमंत्री झालेल्या या तरुण नेत्यांनी देशाचे लक्ष वेधून घेतले होते त्या काळात तरुण अजित पवार राजकारणी वयाची बाराखडी गावच्या मातीत गिरवत होते .

१९९९ मध्ये शरदराव पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापन केला त्यावेळी त्यांच्यासोबत तरुण नेत्यांची जी फळी होती त्यात अजित पवार अतिशय प्रभावी होते अल्प कालावधीत त्यांनी पक्षावर मान ठोकली प्रशासनावर पकड मिळवली महाराष्ट्रातील महत्त्वाचे नेते म्हणून ते उदय झाले २००४ मध्ये काँग्रेस पेक्षाही राष्ट्रवादी काँग्रेसने अधिक जागा मिळाल्या या विजयात अजित पवारांचा मोठा वाटा होता शरद पवारांसारखा वटवृक्ष असतानाही अजित पवारांनी त्या सावलीत न वाढता आपली स्वतंत्र ओळख केली स्वतःचे व्यक्तिमत्व विकसित केले त्यांचे महाराष्ट्राचे आकालन विलक्षण होते, स्थानिक स्वराज संस्था यांची कामे कशी पूर्ण करायची याचा आवाका थक्क करणारा होता जलसंपदा ,ग्रामविकास , कृषी , पाणीपुरवठा , ऊर्जा , पाटबंधारे आणि अर्थ अशा विविध विभागाचे मंत्री म्हणून काम करत असताना त्यांनी आपला कामाचा ठसा उमटवला तो त्यामुळेच त्यांची कार्यक्षमता अफाट होती .

एका प्रकट मुलाखतीमध्ये त्यांना विचारले होते की तुम्ही सत्तरीकडे जात आहात असे वाटत नाही कि तुम्ही म्हातारे झाला आहात काय रहस्य आहे तेव्हा ते म्हणाले होते पहाटे उठतो थोडा व्यायाम आणि मोजका आहार दिवसभर काम आणि शांत झोप पुढे ते म्हणाले माझ्या मनात कोणाचाही द्वेष कधी नसतो लोकांसाठी आपल्या हातातून काम घडते त्यावेळी मी आनंदी असतो हेच माझे अध्यात्म आहे .त्यावर त्यांना शुभेच्या देताना म्हटले गेले होते कि तुम्ही शतआयुषी व्हाल व पुढे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व्हाल आणि बुधवारी सकाळी धक्कादायक घटना बातमी येऊन धडकली अजित पवार दहा मिनिटे नॉट रिचेबल झाले तरी बातमी व्हायची तेच अजित दादा कायमचे नॉट रिजिबल झाले आहेत कर्तबगार अशा असामान्य लोकनेत्याला आपण गमावले आहे.

रयत संकुलाच्या वतीने अजित दादांना भावपूर्ण श्रद्धांजली .

जंगम तेजस
टी. वाय. बी.कॉम.



निर्मला सितारामन : शांततेतून घडलेले मजबूत नेतृत्व

कधी कधी काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की ती फारसा गाजावाजा न करता, शांतपणे आपले काम करत राहतात आणि एक दिवस लक्षात येते की त्यांनी देशाच्या वाटचालीवर मोठा ठसा उमटवला आहे. निर्मला सितारामन यांचे व्यक्तिमत्त्व असेच आहे. त्यांच्याकडे पाहिले की नेतृत्व म्हणजे केवळ मोठमोठ्या घोषणा किंवा आक्रमक भाषण नव्हे, तर संयम, अभ्यास आणि योग्य वेळी घेतलेले निर्णय हेही तितकेच महत्त्वाचे असतात, हे जाणवते.

त्यांचा जन्म तामिळनाडूमधील एका साध्या कुटुंबात झाला. वडील सरकारी नोकरीत असल्यामुळे घरात शिस्त, शिक्षण आणि मूल्यांना नेहमीच प्राधान्य होते. लहानपणापासूनच त्यांना विविध ठिकाणी राहण्याची संधी मिळाली. त्यामुळे देशाची विविधता, लोकांची जीवनशैली आणि समाजातील बदलत्या गरजा यांचा त्यांनी जवळून अनुभव घेतला. कदाचित हाच अनुभव पुढे त्यांच्या निर्णयांमध्ये दिसून येतो.

त्यांनी अर्थशास्त्र विषयात शिक्षण घेतले. अर्थशास्त्र हा विषय तसा कोरडा वाटू शकतो, पण त्यातून समाजाच्या नाडीचा अंदाज घेता येतो. अर्थव्यवस्था म्हणजे केवळ आकडे नाहीत, तर त्यामागे माणसांचे जीवन, त्यांच्या गरजा आणि त्यांचे भविष्य दडलेले असते ड्ड ही जाणीव त्यांना शिक्षणातूनच झाली असावी. राजकारणात येण्यापूर्वी त्यांनी विविध क्षेत्रांत काम केले. संशोधन, धोरण विश्लेषण, आणि काही प्रमाणात आंतरराष्ट्रीय स्तरावरचा अनुभव यामुळे त्यांचा दृष्टिकोन व्यापक झाला. त्यामुळे त्या फक्त देशांतर्गत प्रश्नांकडेच नव्हे, तर जागतिक बदलांकडेही समजून पाहू लागल्या.

राजकारणात प्रवेश केल्यानंतर त्यांनी आपली एक वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या बोलण्यात नेहमीच संयम असतो, पण त्याचवेळी ठामपणा देखील दिसून येतो. त्या आक्रमक शैलीपेक्षा मुद्देसूद आणि विचारपूर्वक मांडणीवर विश्वास ठेवतात. त्यामुळेच त्या पक्षाच्या प्रवक्त्या म्हणून काम करताना लोकांच्या लक्षात राहिल्या. त्यांच्या कारकिर्दीतील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे संरक्षणमंत्रीपद. देशाच्या सुरक्षेसारख्या गंभीर विषयाची जबाबदारी सांभाळताना त्यांनी आत्मविश्वासाने काम केले. महिलांनी अशा उच्च पदांवर काम करणे हे आजच्या काळात शक्य आहे, याचे त्यांनी उत्तम उदाहरण घालून दिले.

यानंतर अर्थमंत्री म्हणून त्यांच्यावर आलेली जबाबदारी अधिकच मोठी होती. देशाच्या अर्थव्यवस्थेची धुरा सांभाळणे हे सोपे काम नाही. विशेषतः जेव्हा जगभरात आर्थिक अनिश्चितता असते, तेव्हा निर्णय घेणे अधिक कठीण होते. अशा परिस्थितीत त्यांनी संयम राखून, परिस्थितीचा अभ्यास करून निर्णय घेतले.

कोविड–१९ चा काळ आपण सगळ्यांनी अनुभवला आहे. त्या काळात अनेक लोकांचे रोजगार गेले, उद्योग अडचणीत आले, आणि अर्थव्यवस्था डगमगली. अशा वेळी सरकारकडून अपेक्षा वाढतात. त्या काळात त्यांनी ज्या पद्धतीने आर्थिक उपाययोजना जाहीर केल्या, त्यातून परिस्थिती सावरण्याचा प्रयत्न दिसून येतो. हे निर्णय किती यशस्वी झाले यावर मतभेद असू शकतात, पण त्या काळात घेतलेली जबाबदारी आणि केलेले प्रयत्न नक्कीच महत्त्वाचे होते.

त्यांच्या कामाची एक खास गोष्ट म्हणजे त्यांनी परंपरा आणि आधुनिकता यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न केला. अर्थसंकल्प सादर करताना पारंपरिक ब्रीफकेसऐवजी 'Laptop' वापरणे हा केवळ प्रतीकात्मक बदल नव्हता, तर भारतीय संस्कृतीशी जोडलेला संदेश होता. अशा छोट्या गोष्टीही लोकांच्या मनात ठसा उमटवतात.

आजच्या काळात डिजिटल अर्थव्यवस्था खूप वेगाने वाढत आहे. ऑनलाइन व्यवहार, डिजिटल पेमेंट्स, आणि तंत्रज्ञानाचा वापर यामुळे अर्थव्यवस्था अधिक पारदर्शक होत आहे. या बदलांना त्यांनी प्रोत्साहन दिले. त्यामुळे सामान्य नागरिकांपर्यंतही या सुविधांचा लाभ पोहोचत आहे.

तसेच ''आत्मनिर्भर भारत'' ही संकल्पना मांडताना देशाने स्वतःच्या ताकदीवर उभे राहावे, स्थानिक उद्योगांना चालना मिळावी आणि रोजगारनिर्मिती वाढावी, हा विचार पुढे आला. या संकल्पनेमुळे अनेक तरुणांना उद्योजकतेकडे वळण्याची प्रेरणा मिळाली. अर्थात, कोणत्याही नेतृत्वावर टीका होतेच. महागाई, कर धोरणे, आणि रोजगार यासारख्या विषयांवर प्रश्न उपस्थित केले गेले. पण त्यांना सामोरे जाताना त्यांनी कधीही घाईघाईने प्रतिक्रिया दिली नाही. त्यांची शैली नेहमीच शांत आणि संयमी राहिली.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील साधेपणा हा विशेष लक्षात येण्यासारखा आहे. मोठ्या पदावर असूनही त्यांच्यात दिखावा दिसत नाही. त्या आपल्या कामातूनच स्वतःची ओळख निर्माण करतात.



आजच्या काळात ही गोष्ट खूप महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या जीवनातून अनेक गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. यश मिळवण्यासाठी नेहमीच मोठा आवाज करणे गरजेचे नसते, तर सातत्य, अभ्यास आणि प्रामाणिकपणा हेही तितकेच महत्त्वाचे असतात. आपल्या क्षेत्रात निपुणता मिळवणे आणि बदलत्या परिस्थितीनुसार स्वतःला तयार ठेवणे ही त्यांची वाटचाल आपल्याला शिकवते.

जागतिक स्तरावर भारताची ओळख मजबूत करण्यामध्येही त्यांचा वाटा आहे. विविध आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये त्यांनी भारताची भूमिका मांडली. भारत ही केवळ एक मोठी लोकसंख्या नसून, एक सक्षम आणि वाढती अर्थव्यवस्था आहे हा संदेश त्यांनी दिला. आज आपण ज्या वेगाने बदलणाऱ्या जगात जगत आहोत, तिथे नेतृत्वाची व्याख्या बदलत आहे. केवळ लोकप्रियता नव्हे, तर दीर्घकालीन विचार, स्थैर्य आणि योग्य निर्णयक्षमता या गोष्टी महत्त्वाच्या ठरत आहेत. निर्मला सितारामन यांचे नेतृत्व याच गोष्टींचे उदाहरण आहे.

शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की, काही लोकांचा प्रभाव त्यांच्या शब्दांपेक्षा त्यांच्या कामातून जास्त दिसतो. निर्मला सितारामन यांचेही तसेच आहे. त्यांनी गाजावाजा न करता, शांतपणे आपले काम करत भारताच्या प्रगतीत आपले योगदान दिले आहे.

कु. सोनिया शर्मा
टी. वाय. बी.बी.ए.(सी.ए.)

श्रध्दा - अंधश्रध्दा

अंधश्रध्दा निर्मूलनासाठी जनजागृती व्हायला पाहिजे,
लोक जागृत का होत नाहीत,
कायद्याची कुंडली पहायला पाहिजे ।।१।।
अंधश्रध्दा निर्मूलन करतांना संस्कृतीही जपली पाहिजे,
बुध्दीच्या निकषावर श्रध्दा ही मापली पाहिजे ।।२।।
नरबळी देणारा सहजासहजी घावत (सापडत) नाही,
श्रध्देविना केलेल्या भक्तिला देव सुध्दा पावन नाही. ।।३।।
अंधश्रध्दा मानवतेला शाप आहे,
कोणाचा तरी बळी गेल्याशिवाय कायदा मंजूर होत नाही,
हे सुध्दा सामाजिक पाप आहे. ।।४।।
अंधश्रध्देने भल्या-भल्यांचे बळी घेतले
भले होण्याच्या मोहापायी पाण्यासारखे पैसे ओतले ।।५।।
भोंदू बाबांनी अनेकांना फसवले आहे,
डोळे असणाऱ्यांना अंधाच्या रांगेत बसवले आहे. ।।६।।
अंधांनी देवावर ठेवलेल्या श्रध्देला अंधश्रध्दा म्हणायचे का?
उघड्या डोळ्यांनी नरबळी देणाऱ्याला श्रध्दांध म्हणायचे का ।।७।।
अंधश्रध्देचे परिणाम सांगा कोणाला कळले आहेत?
संतांच्या उपदेशाकडे किती लोक वळले आहेत ? ।।८।।
उपदेश करुन समाजाला निघून गेले संत
उपदेशाकडे लोकांनी पाठ फिरविली याचीच वाटते खंत. ।।९।।

श्री. संदिप नलगे
योगशिक्षक



बजेटमधून प्रतिबिंबित होणारे अजितदादा

महाराष्ट्राच्या राजकारणात अजितदादा म्हणून परिचित असलेले अजित पवार हे एक प्रभावी, कार्यक्षम आणि निर्णायक नेतृत्व म्हणून ओळखले जातात. विशेषतः अर्थसंकल्प (बजेट) सादर करताना त्यांची शैली, विचारसरणी आणि विकासाभिमुख दृष्टिकोन स्पष्टपणे दिसून येतो. बजेट हे केवळ आकड्यांचे गणित नसून राज्याच्या विकासाची दिशा ठरवणारे महत्त्वाचे साधन आहे. या माध्यमातून शासनाची प्राधान्यक्रम, सामाजिक बांधिलकी आणि आर्थिक धोरणे स्पष्ट होतात. त्यामुळे बजेटमधून प्रतिबिंबित होणारे अजितदादा हा विषय अत्यंत अभ्यासपूर्ण आणि समजून घेण्यासारखा आहे.अजित पवार यांची काम करण्याची पद्धत अत्यंत व्यवहार्य आणि परिणामकारक आहे. त्यांनी अनेकदा अर्थमंत्री म्हणून काम करताना बजेट सादर केले आहे. त्यांच्या बजेटमध्ये एक गोष्ट ठळकपणे दिसते, ती म्हणजे विकासाची स्पष्ट दिशा आणि निधीचे योग्य नियोजन. ते केवळ घोषणांवर भर देत नाहीत, तर त्या घोषणांची अंमलबजावणी कशी होईल याकडेही ते विशेष लक्ष देतात. त्यामुळे त्यांच्या बजेटमधून कामगिरी ही संकल्पना स्पष्टपणे दिसून येते.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी अनेक वेळा राज्याचा अर्थसंकल्प सादर केला आहे. त्यांच्या बजेट सादरीकरणाचा इतिहास पाहिला असता, त्यांनी विविध कालखंडात एकूण ११ वेळा अर्थसंकल्प मांडला आहे. अजित पवार यांनी प्रथम अर्थमंत्री म्हणून काम करताना २०१० च्या दशकात (विशेषतः २०१०–२०१४) दरम्यान सलग काही वर्षे बजेट सादर केले. त्यानंतर पुन्हा २०१९ नंतर महाविकास आघाडी सरकारमध्ये आणि नंतर महायुती सरकारमध्ये त्यांनी अर्थमंत्री पद भूषवले. या काळात त्यांनी २०२०, २०२१, २०२२, २०२३ आणि २०२४ या आर्थिक वर्षांसाठीही अर्थसंकल्प मांडले.विशेषतः, २७ फेब्रुवारी २०२४ रोजी त्यांनी २०२४–२५ साठी अंतरिम बजेट सादर केले, तर १० मार्च २०२५ रोजी त्यांनी २०२५–२६ या वर्षाचा अर्थसंकल्प सादर केला, जो त्यांच्या कारकिर्दीतील ११वा बजेट होता. यावरून असे दिसते की, अजितदादा पवार हे महाराष्ट्रातील सर्वाधिक वेळा बजेट सादर करणाऱ्या अर्थमंत्र्यांपैकी एक आहेत. त्यांच्या बजेटमधून राज्याच्या विकासाची सातत्यपूर्ण दिशा आणि आर्थिक नियोजनाचा अनुभव स्पष्टपणे दिसून येतो.

बजेटमध्ये कृषी क्षेत्राला दिलेले प्राधान्य हे अजितदादांच्या धोरणाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. महाराष्ट्र हा कृषीप्रधान राज्य असल्यामुळे शेतकऱ्यांच्या समस्यांकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. त्यांच्या बजेटमध्ये सिंचन प्रकल्प, पाणी व्यवस्थापन, पीकविमा योजना आणि शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य यावर भर दिला जातो. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे आणि त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे हा त्यामागील मुख्य उद्देश आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील विकासाला चालना मिळते.पायाभूत सुविधांच्या विकासालाही अजितदादांच्या बजेटमध्ये मोठे स्थान आहे. रस्ते, पूल, जलसंधारण प्रकल्प, वीज पुरवठा आणि शहरी विकास या क्षेत्रांमध्ये त्यांनी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला आहे. पायाभूत सुविधा मजबूत केल्याशिवाय आर्थिक प्रगती शक्य नाही, हे त्यांना चांगले माहीत आहे. त्यामुळे त्यांनी दीर्घकालीन विकासाच्या दृष्टीने या क्षेत्रावर विशेष भर दिला आहे.

शिक्षण आणि आरोग्य या क्षेत्रांनाही त्यांच्या बजेटमध्ये महत्त्वाचे स्थान आहे. विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, शाळा आणि महाविद्यालयांची उभारणी, डिजिटल शिक्षण सुविधा यासाठी त्यांनी निधी उपलब्ध करून दिला आहे. तसेच आरोग्य क्षेत्रात रुग्णालयांची सुधारणा, नवीन वैद्यकीय सुविधा आणि आरोग्य सेवा ग्रामीण भागात पोहोचवण्यावर त्यांनी भर दिला आहे. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण आणि आरोग्य ही दोन महत्त्वाची क्षेत्रे असल्याचे त्यांच्या बजेटमधून स्पष्ट होते. अजितदादांच्या बजेटमध्ये सामाजिक न्याय आणि समावेशक विकास यावरही विशेष लक्ष दिले जाते. समाजातील वंचित, दुर्बल आणि मागासवर्गीय घटकांसाठी विविध योजना राबवून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला जातो. महिला सक्षमीकरण, युवकांसाठी रोजगाराच्या संधी, आणि उद्योजकतेला प्रोत्साहन या बाबींवर त्यांनी विशेष भर दिला आहे. त्यामुळे समाजातील सर्व घटकांचा विकास साधण्याचा प्रयत्न त्यांच्या बजेटमधून दिसून येतो. त्यांच्या बजेटची आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे आर्थिक शिस्त आणि पारदर्शकता. राज्याचा महसूल आणि खर्च यामध्ये संतुलन राखण्याचा त्यांनी नेहमी प्रयत्न केला आहे. अनावश्यक खर्च टाळून आवश्यक क्षेत्रांमध्ये निधी वळवणे, कर्ज व्यवस्थापन योग्य पद्धतीने करणे आणि आर्थिक स्थैर्य राखणे या बाबींवर त्यांनी विशेष लक्ष दिले



आहे. त्यामुळे राज्याची आर्थिक स्थिती मजबूत राहण्यास मदत होते.

अजितदादांच्या बजेटमध्ये उद्योग आणि व्यापार क्षेत्रालाही प्रोत्साहन दिले जाते. नवीन उद्योग उभारण्यासाठी सवलती, गुंतवणुकीला चालना, आणि रोजगारनिर्मितीसाठी उपाययोजना यांचा समावेश असतो. त्यामुळे राज्यात औद्योगिक विकासाला गती मिळते आणि युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण होतात. विकास आणि रोजगार हे त्यांच्या बजेटचे दोन महत्त्वाचे स्तंभ आहेत. तथापि, त्यांच्या बजेटवर काही वेळा टीकाही केली जाते. काही जणांच्या मते, बजेटमध्ये केलेल्या घोषणा आणि त्यांची अंमलबजावणी यामध्ये तफावत आढळते. तसेच काही प्रकल्पांमध्ये विलंब होणे किंवा निधीचा योग्य वापर न होणे यासारख्या समस्या देखील दिसून येतात. परंतु, कोणत्याही मोठ्या धोरणात काही अडचणी येणे स्वाभाविक आहे. महत्त्वाचे म्हणजे त्या अडचणींवर मात करून पुढे जाण्याची क्षमता असणे, आणि ती अजितदादांमध्ये स्पष्टपणे दिसत होती. अजित पवार यांचे व्यक्तिमत्त्व त्यांच्या बजेटमधूनही प्रतिबिंबित होते. ते स्पष्टवक्ते, कर्तव्यदक्ष आणि निर्णयक्षम नेते म्हणून ओळखले जातात. त्यांच्या काम करण्याच्या पद्धतीत वेग आणि अचूकता होती. त्यामुळे त्यांच्या बजेटमध्येही तीच झलक दिसते. ते फक्त धोरणे मांडत नाहीत, तर त्यांची अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठीही प्रयत्नशील असत.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी या विषयाचे महत्त्व विशेष आहे. कारण आजचे विद्यार्थी हे उद्याचे नागरिक आणि नेतृत्व करणारे घटक आहेत. बजेटमधून शासनाची दिशा आणि धोरणे समजून घेणे आवश्यक आहे. त्यातून आर्थिक नियोजन, सामाजिक जबाबदारी आणि विकासाची संकल्पना समजते. अजितदादांच्या बजेटचा अभ्यास केल्यास एक प्रभावी प्रशासकीय दृष्टिकोन कसा असावा हे शिकता येते. शेवटी असे म्हणता येईल की, बजेटमधून प्रतिबिंबित होणारे अजितदादा म्हणजे एक विकासाभिमुख, व्यवहार्य आणि परिणामकारक नेतृत्वाचे प्रतीक आहे. त्यांच्या बजेटमध्ये केवळ आकडे नसायची, तर त्यामागे राज्याच्या प्रगतीची स्पष्ट दिशा होती. कृषी, उद्योग, शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधा या सर्व क्षेत्रांचा समतोल विकास साधण्याचा प्रयत्न त्यांच्या धोरणांमधून दिसून येतो. अजितदादांचे बजेट हे केवळ आर्थिक दस्तऐवज नसून ते महाराष्ट्राच्या भविष्याची रूपरेषा आहे. त्यांच्या विचारसरणीमुळे आणि कार्यपद्धतीमुळे राज्याच्या विकासाला चालना मिळाली आहे. त्यामुळे त्यांचे योगदान आणि त्यातून प्रतिबिंबित होणारी दृष्टी ही अभ्यासण्यासारखी आणि अनुकरणीय आहे. असे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजितदादा पुन्हा होणे नाही.

सोनावणे संध्या
(एफ.वाय बी.कॉम)





भारतातील पेटंट नोंदणी प्रक्रिया

आजच्या ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेमध्ये कल्पना, संशोधन आणि नवकल्पना यांना मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. नवीन उत्पादन, तंत्रज्ञान, औषध, यंत्रणा किंवा एखादी अभिनव प्रक्रिया ही व्यक्ती किंवा संस्थेसाठी मौल्यवान संपत्ती ठरू शकते. अशा नवकल्पनांचे संरक्षण करण्यासाठी पेटंट ही संकल्पना महत्त्वाची ठरते.

भारत हा वेगाने प्रगती करणारा देश असून संशोधन आणि नवकल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी पेटंट प्रणाली कार्यरत आहे. आज विद्यार्थी, संशोधक, स्टार्टअप उद्योग तसेच तरुण उद्योजक नवीन कल्पनांवर काम करत आहेत. त्यामुळे पदवीच्या विद्यार्थ्यांनी पेटंट प्रक्रियेची माहिती असणे आवश्यक आहे.

पेटंट म्हणजे काय ?

पेटंट म्हणजे एखाद्या नवीन शोध किंवा आविष्कारासाठी सरकारकडून दिला जाणारा कायदेशीर हक्क होय. या हक्कामुळे शोधकर्त्याला त्याच्या शोधाचा वापर, उत्पादन आणि विक्री करण्याचा विशेष अधिकार मिळतो. साधारणपणे हा अधिकार २० वर्षांसाठी दिला जातो.

भारतामध्ये पेटंट व्यवस्था पेटंट अधिनियम, १९७० अंतर्गत कार्यरत असून तिचे प्रशासन भारतीय पेटंट कार्यालयाकडून केले जाते.

कोणत्या गोष्टींना पेटंट मिळू शकते ?

एखाद्या शोधाला पेटंट मिळण्यासाठी खालील अटी पूर्ण होणे आवश्यक आहे :

नवीनता (Novelty) – शोध पूर्णपणे नवीन असावा.

सर्जनशीलता (Inventive Step)– त्या शोधामध्ये नाविन्यपूर्ण कल्पना असावी.

औद्योगिक उपयोगिता (Industrial Application) – शोधाचा उद्योग किंवा व्यवहारात उपयोग होणे आवश्यक आहे.

उदाहरणार्थ :नवीन औषधे ,यंत्रसामग्री ,तांत्रिक प्रक्रिया ,सॉफ्टवेअरशी संबंधित शोध, कृषी क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञान ई. मात्र गणितीय सूत्रे, नैसर्गिक नियम किंवा पारंपरिक ज्ञान यांना पेटंट मिळत नाही.

भारतातील पेटंट नोंदणी प्रक्रिया

पेटंट मिळिवण्याची प्रक्रिया काही टप्प्यांमध्ये पूर्ण होते. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी ती पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

१. कल्पना आणि माहिती संकलन

सर्वप्रथम शोधाशी संबंधित सर्व माहिती व्यवस्थित नोंदवून ठेवणे आवश्यक असते. त्यामध्ये :

शोधाचे वर्णन

रेखाचित्रे किंवा आकृती

शोधाची तारीख

उपयोग आणि वैशिष्ट्ये

यांचा समावेश होतो. योग्य नोंदीमुळे शोधाची मौलिकता सिद्ध करण्यास मदत होते.

२. पेटंट शोध (Patent Search)

पेटंट अर्ज दाखल करण्यापूर्वी अशाच प्रकारचा शोध आधीपासून अस्तित्वात आहे का, हे तपासले जाते. यालाच पेटंट शोध म्हणतात.

हा शोध ऑनलाइन डेटाबेस किंवा पेटंट तज्ज्ञांच्या मदतीने केला जातो. यामुळे अर्ज नाकारला जाण्याची शक्यता कमी होते.

३. पेटंट अर्ज तयार करणे

पेटंट अर्ज तयार करणे ही अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. अर्जामध्ये पुढील बाबींचा समावेश असतो :

शोधाचे शीर्षक

शोधाची पार्श्वभूमी

सविस्तर माहिती

दावे (Claims)

आवश्यक रेखाचित्रे

ही प्रक्रिया तांत्रिक आणि कायदेशीर स्वरूपाची असल्याने अनेक वेळा पेटंट एजंट किंवा तज्ज्ञांची मदत घेतली जाते.

४. पेटंट अर्ज दाखल करणे

अर्ज भारतीय पेटंट कार्यालयाकडे ऑनलाइन किंवा ऑफलाइन



पद्धतीने दाखल केला जातो.

पेटंट अर्जाचे दोन प्रकार असतात :

तात्पुरता अर्ज (Provisional Application) – शोध पूर्ण विकसित नसताना दाखल केला जातो. यामुळे शोधाला तात्पुरते संरक्षण मिळते.

पूर्ण अर्ज (Complete Specification) – शोधाची संपूर्ण माहिती तयार झाल्यानंतर दाखल केला जातो.

अर्ज दाखल केल्यानंतर अर्ज क्रमांक आणि तारीख दिली जाते.

५. अर्जाचे प्रकाशन

साधारणतः अर्ज दाखल केल्यानंतर १८ महिन्यांनी त्याचे प्रकाशन केले जाते. त्यानंतर शोधाची माहिती सार्वजनिक स्वरूपात उपलब्ध होते.

विशेष विनंती केल्यास लवकर प्रकाशनही करता येते.

६. अर्जाची तपासणी

प्रकाशनानंतर अर्जाची तपासणी केली जाते. यासाठी अर्जदाराने स्वतंत्र विनंती करणे आवश्यक असते.

पेटंट परीक्षक पुढील बाबी तपासतो :

शोधाची नवीनता

सर्जनशीलता

औद्योगिक उपयोगिता

कायदेशीर अटींचे पालन

जर काही त्रुटी किंवा आक्षेप असतील तर परीक्षक अहवाल पाठवतो. अर्जदाराने त्यावर योग्य उत्तर देणे आवश्यक असते.

७. पेटंट मंजुरी

सर्व अटी पूर्ण झाल्यानंतर पेटंट मंजूर केले जाते. त्यानंतर शोधकर्त्याला २० वर्षांसाठी विशेष हक्क प्राप्त होतात.

पेटंटचे महत्त्व

पेटंट प्रणालीमुळे संशोधन आणि नवकल्पनांना प्रोत्साहन मिळते. त्याचे महत्त्व पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल :

संशोधन आणि नवकल्पनांना चालना मिळते

शोधकर्त्यांचे संरक्षण होते

उद्योग आणि व्यवसाय विकासास मदत होते

स्टार्टअप आणि उद्योजकतेला प्रोत्साहन मिळते

देशाच्या आर्थिक प्रगतीस हातभार लागतो

आज अनेक महाविद्यालये आणि विद्यापीठे विद्यार्थ्यांना संशोधन आणि पेटंटविषयी मार्गदर्शन करत आहेत. विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांमधूनही नाविन्यपूर्ण कल्पना विकसित होऊ शकतात.

पेटंट प्रक्रियेतील अडचणी

पेटंट प्रक्रियेमध्ये काही अडचणी देखील आहेत :

विद्यार्थ्यांमध्ये जागरूकतेचा अभाव

खर्चिक प्रक्रिया

कायदेशीर आणि तांत्रिक गुंतागुंत

मंजुरीसाठी लागणारा कालावधी

म्हणूनच शैक्षणिक संस्थांनी बौद्धिक संपदा हक्कांविषयी जनजागृती करणे आवश्यक आहे.

आजच्या स्पर्धात्मक युगात नवकल्पना आणि संशोधन हे प्रगतीचे मुख्य साधन बनले आहे. पेटंट प्रणालीमुळे शोधकर्त्यांना त्यांच्या कल्पनांचे संरक्षण मिळते आणि नवीन संशोधनाला प्रोत्साहन मिळते.

पदवीच्या विद्यार्थ्यांनी पेटंट प्रक्रियेची माहिती घेतल्यास भविष्यात संशोधन, उद्योग, व्यवसाय आणि उद्योजकता क्षेत्रात त्यांना मोठा फायदा होऊ शकतो. भारतातील वाढती स्टार्टअप संस्कृती आणि डिजिटल अर्थव्यवस्था लक्षात घेता तरुणांनी नाविन्यपूर्ण विचार करून आपल्या कल्पनांचे संरक्षण करणे ही काळाची गरज आहे.

कु. वैष्णवी शिंदे
एम. कॉम. भाग – २



उपकार नव्हेत , हा महिलांचा हक्क आहे !

लोकसभा आणि विधानसभेमध्ये महिलांना ३३ % आरक्षण हा सध्या सर्वाधिक चर्चेचा विषय आहे हे विधेयक २०२३ मध्ये संमत झाले असून मागच्या आठवड्यात सरकारने ते लागू करण्याची अधिसूचना जारी केली त्यात दुरुस्ती करण्यासाठी नव्हे विधेयक आणले गेले परंतु ते संमत होऊ शकले नाही.

पुढे काय होईल हा आता प्रश्न आहे लोकसभेत हा कायदा २०१९ मध्ये लागू होईल असे सरकार म्हणते परंतु मतदारसंघाच्या पुनर्रचनेशी जोडलेल्या या निकषाला विरोध होणे स्वाभाविक होते विरोधी पक्षाचे म्हणणे असे की लोकसभेतील जागा ८५० झाल्यानंतर हे विधेयक लागू करणे ऐवजी सध्याच्या संख्येवरच लागू करावे परिसिमन मतदारसंघाची पुनर्रचना विषयी विरोधकांचा मनात अनेक शंका आहेत आज तो विषय नाही महिलांसाठी जे ३३% आरक्षण हा मुख्य मुद्दा आहे आधीच खूप विलंब झाला आहे आता टाळाटाळ पुरे झाली जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीत महिलांच्या हिस्सेदारी बाबत आपण मागे राहिलो.

संसदीय लोकशाहीत महिलांची जागतिक स्तरावरील भागीदारी सुमारे २०% एवढी आहे आपला कमाल आकडा कधीही १४% यांच्या पुढे जाऊ शकलेला नाही अर्ध्या लोकसंख्येला राजकारण केवळ एक तृतीयांश वाटा देण्याच्या इतका वेळ का लागला १९५१ ५२ मध्ये लोकसभेच्या पहिल्या निवडणुका वेळी मतदारसंघाच्या सर्वेक्षणात २८ लाख महिलांनी आपले नाव नोंदवण्याऐवजी असे लिहिले की ती अमुक व्यक्तीची पत्नी किंवा आई नाहीतर बहीण आहे त्याकाळी देशाच्या अनेक भागात हीच पद्धत होती महिलांना त्यांच्या नावाने नव्हे तर नात्याने ओळखले जात असे पहिले मुख्य निवडणूक आयुक्त सुकुमार सेन यांनी नाराज होऊन २८ लाख नावांची यादी रद्द करण्याचा निर्णय घेतला होता.

ते क्रांतिकारी पाऊल होते समाजाला असे वाटले की महिलांच्या हक्कावर गदा आणली गेली आहे आणि पुढच्या निवडणुकीत अशा महिलांना पुढे येऊन नाव नोंदविले पाहिजे भारतीय महिलांनी राजकीय व्यवस्थेच्या पायवाटेवर आज हमरस्त्यावर येऊन पोहोचणे आहेत का प्रवास पूर्ण केला आहे लोकसभेच्या पहिल्या निवडणुकीत ४७९ सदस्यांमध्ये २२ महिला निवडून आल्या होत्या ही संख्या केवळ ४.४ इतकी होती दुसऱ्या लोकसभेत महिलांची संख्या ५.४ इतकी झाली होती असे करत करत सतराव्या आणि अठराव्या लोकसभेत तो आकडा आता १८% एवढा झाला आहे याचा अर्थ महिलांच्या भागीदारीचा वेग अत्यंत संथ गतीचा आहे अर्थात महिलांची भागीदारी वाढविण्याचे प्रयत्न अनेक लोकांनी केले .

राजीव गांधी पंतप्रधान असताना त्यांनी स्थापन केलेल्या एका समितीने शासनात महिलांची भागीदारी वाढवण्याचा प्रस्ताव मांडला होता या प्रस्तावा पी व्ही नरसिंहराव यांच्या सरकारने पंचायतीत महिलांना तेहतीस टक्के आरक्षण दिले त्यानंतर विधानसभा आणि लोकसभेसाठी हीच मागणी केली गेली सप्टेंबर १९९६ रोजी पहिल्यांदाच एचडी देवळा यांच्या सरकारने लोकसभेत आरक्षण विधेयक मांडले परंतु ते संमत होऊ शकले नाही ते विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्यात आले एक मोठा वर्ग महिलांना ३३% आरक्षण देण्याच्या बाजूने नव्हता परंतु १९९८ मध्ये अटल बिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना महिला आरक्षण विधेयक संमत करण्याचा प्रयत्न झाला होता

त्यावेळी राज्यात खासदार सुरेंद्र प्रसाद यादव यांनी लाल कृष्ण आडवाणी यांच्या हातातून विधेयकाची प्रत घेऊन फाडून टाकली होती त्यावेळी सभागृहाला एक आश्चर्यजनक धक्का बसला होता लालोजींनी आपल्या पत्नीला मुख्यमंत्री केले परंतु येथे महिलांना आरक्षण देऊन उचित नाही असा चिमटा अटलजींनी त्यावेळी लालूजी यांना काढला जून २००९ मध्ये मनमोहन सिंग यांचे सरकार असताना महिला आरक्षण विधेयक राज्यसभेत संमत केले गेले परंतु राजन आणि समाजवादी पक्षांनी केलेल्या कडव्या विरोधामुळे ते लोकसभेत संमत होऊ शकले नाही परंतु विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्याच विचाराने चालणाऱ्या अमित शाह त्यांचे वैशिष्ट्य असे की एकदा ठरवले की ते ती गोष्ट शेवटपर्यंत नेतात २०२३ मध्ये संसदेने नारीशक्ती वंदन अधिनियम संमत केले गेले २०२४ मध्ये आरक्षण लागू करावे अशी मागणी त्यावेळी झाली होती परंतु ते शक्य झाले नाही सरकारने २०१९ मध्ये ते लागू व्हावे अशी भूमिका घेतली परंतु त्यातही आता अडथळा निर्माण झाला आहे भारतीय महिला राजकारणाचा प्रवाह पावित्र्याच्या रस्त्याने पुढे घेऊन जातील.

असा मला विश्वास आहे आमच्या मुली धरती पासून ते निळ्या आकाशापर्यंत आपली प्रतिभा दाखवत आहेत राजकारणाचाही त्यांची प्रतिभा अविकृष्ट होण्यात अडथळे खूपच दिसतात एक गोष्ट मात्र समजत नाही सर्व राजकीय पक्षांना महिलांना तेहतीस टक्के आरक्षण देण्याची गोष्ट का करत नाहीत तर मग ते लागू का होत नाही हेच पक्ष महिलांना जास्त संख्येने उमेदवारी का देत नाहीत कारण त्या निवडून येऊ शकत नाही असे उत्तर मिळते पुरुष सत्ताक मानसिकतेतून भारतीय राजकारण बाहेर येऊ शकले नाही हेच खरे कारण महिला आरक्षण विधेयकाचे आहे.

जगताप कृतिका
एफ. वाय.बी.कॉम.



महाविद्यालयात फायर सिस्टीम बसविण्याचे महत्त्व व कार्यपद्धती

आधुनिक शिक्षणसंस्था केवळ ज्ञानदानाचे केंद्र नसून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारीही पार पाडतात. महाविद्यालयामध्ये दररोज शेकडो किंवा हजारो विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी आणि अभ्यागत उपस्थित असतात. तसेच प्रयोगशाळा, ग्रंथालय, संगणक कक्ष, कार्यालये, विद्युत उपकरणे, रसायने आणि इतर ज्वलनशील वस्तूंचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे आग लागण्याचा धोका पूर्णपणे नाकारता येत नाही. त्यामुळे अशा आपत्कालीन परिस्थितीमध्ये जीवित आणि वित्तहानी टाळण्यासाठी फायर सिस्टीम (Fire Protection System) बसविणे अत्यंत आवश्यक ठरते.फायर सिस्टीम ही आग लागल्यास त्वरित सूचना देणारी, आग नियंत्रित करणारी आणि लोकांना सुरक्षितपणे बाहेर पडण्यास मदत करणारी अत्याधुनिक सुरक्षा व्यवस्था आहे. आज बहुतेक शैक्षणिक संस्थांमध्ये राष्ट्रीय अग्निसुरक्षा मानकांनुसार ही प्रणाली बसविण्यात येत आहे.

फायर सिस्टीम म्हणजे काय ?

फायर सिस्टीम म्हणजे आग लागल्यास तिचा प्रारंभिक टप्प्यात शोध घेऊन संबंधित व्यक्तींना सूचना देणे, आग विझविण्याची प्रक्रिया सुरू करणे आणि संपूर्ण इमारतीतील लोकांचे सुरक्षित स्थलांतर सुनिश्चित करणारी एकात्मिक सुरक्षा व्यवस्था होय. या प्रणालीमध्ये विविध इलेक्ट्रॉनिक उपकरणे, सेन्सर्स, नियंत्रण पॅनेल, अलार्म, स्प्रिंकलर, पंप आणि अग्निशमन उपकरणांचा समावेश असतो.

महाविद्यालयात फायर सिस्टीम बसविण्याची आवश्यकता :

महाविद्यालयात अनेक प्रकारच्या सुविधा उपलब्ध असतात. संगणक प्रयोगशाळा, रसायनशास्त्र प्रयोगशाळा, विद्युत प्रयोगशाळा, ग्रंथालय, कार्यालये, कॅन्टीन आणि सभागृह या सर्व ठिकाणी विविध विद्युत उपकरणे वापरली जातात. शॉर्टसर्किट, गॅस गळती, रासायनिक अभिक्रिया किंवा निष्काळजीपणामुळे आग लागू शकते. अशा वेळी फायर सिस्टीम त्वरित कार्यान्वित होऊन नुकसान कमी करण्यास मदत करते.

फायर सिस्टीमचे प्रमुख घटक

महाविद्यालयातील फायर सिस्टीममध्ये खालील प्रमुख घटक असतात.

फायर अलार्म कंट्रोल पॅनेल (Fire Alarm Control Panel)

स्मोक डिटेक्टर (Smoke Detector)

हीट डिटेक्टर (Heat Detector)

मॅन्युअल कॉल पॉइंट (Manual Call Point)

हूटर किंवा सायरन (Hooter/Siren)

स्प्रिंकलर प्रणाली (Automatic Sprinkler System)

फायर हायड्रंट प्रणाली (Fire Hydrant System)

फायर एक्स्टिंग्विशर (Fire Extinguisher)

आपत्कालीन प्रकाश व्यवस्था (Emergency Lighting)

एक्झिट साईन बोर्ड (Exit Sign Board)

फायर पंप आणि पाण्याची टाकी

फायर सिस्टीम कशी कार्यान्वित होते ?

फायर सिस्टीम पूर्णपणे स्वयंचलित आणि अत्यंत संवेदनशील पद्धतीने कार्य करते. तिची कार्यपद्धती पुढीलप्रमाणे आहे.

१. धूर किंवा उष्णतेचा शोध : जर इमारतीमध्ये आग लागण्यास सुरुवात झाली तर सर्वप्रथम धूर निर्माण होतो किंवा तापमान वाढते. छतावर बसविलेले स्मोक डिटेक्टर आणि हीट डिटेक्टर हे धूर व उष्णता सतत तपासत असतात.स्मोक डिटेक्टर हवेमधील धुराचे सूक्ष्म कण ओळखतो. हीट डिटेक्टर ठराविक मर्यादेपेक्षा तापमान वाढल्यास सक्रिय होतो.

२. कंट्रोल पॅनेलला संदेश : डिटेक्टरला धूर किंवा उष्णता आढळताच तो त्वरित फायर अलार्म कंट्रोल पॅनेलकडे विद्युत सिग्नल पाठवतो. कंट्रोल पॅनेल हा संपूर्ण प्रणालीचा मुख्य मेंदू



असतो.

३. अलार्म सुरू होतो : कंट्रोल पॅनेलला सिग्नल मिळाल्यानंतर संपूर्ण इमारतीमध्ये हूटर, सायरन किंवा बेल वाजू लागते. यामुळे सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचारी सावध होतात.

४. आपत्कालीन सूचना : अनेक आधुनिक महाविद्यालयांमध्ये सार्वजनिक सूचना प्रणाली (Public Address System) जोडलेली असते. त्याद्वारे 'कृपया शांतपणे बाहेर पडा' अशा सूचना दिल्या जातात.

५. स्प्रिंकलर सुरू होतात : जर आग मोठ्या प्रमाणात वाढत असेल आणि तापमान निश्चित मर्यादेपेक्षा जास्त झाले तर संबंधित भागातील स्प्रिंकलर आपोआप सुरू होतात. स्प्रिंकलरमधून पाण्याचा वर्षाव होऊन आग नियंत्रणात आणली जाते. महत्त्वाचे म्हणजे संपूर्ण इमारतीतील सर्व स्प्रिंकलर एकाच वेळी सुरू होत नाहीत. फक्त ज्या ठिकाणी तापमान वाढलेले असते त्या भागातील स्प्रिंकलरच कार्यान्वित होतात.

६. फायर पंप कार्यान्वित होतो : स्प्रिंकलर किंवा हायड्रंट प्रणालीला पुरेशा दाबाने पाणी मिळण्यासाठी फायर पंप आपोआप सुरू होतो. हा पंप पाण्याच्या टाकीतून पाणी पुरवतो.

७. अग्निशमन दलाला सूचना : अनेक आधुनिक फायर सिस्टीम अग्निशमन केंद्राशी किंवा सुरक्षा नियंत्रण कक्षाशी जोडलेल्या असतात. त्यामुळे आग लागल्याची माहिती त्वरित संबंधित विभागाला मिळते.

८. सुरक्षित स्थलांतर : अलार्म सुरू झाल्यानंतर सर्वांनी पूर्वनियोजित आपत्कालीन मार्गाने बाहेर पडावे. आपत्कालीन दिवे आणि एक्झिट बोर्ड यामुळे वीज नसतानाही बाहेर पडणे सोपे होते.

मॅन्युअल कॉल पॉइंटचे कार्य

जर कोणाला आग दिसली आणि डिटेक्टर सक्रिय होण्यापूर्वी सूचना द्यायची असेल तर भिंतीवर बसविलेला मॅन्युअल कॉल पॉइंट दाबला जातो. त्यामुळे अलार्म लगेच सुरू होतो.

फायर एक्स्टिंग्विशरचे प्रकार

महाविद्यालयात विविध प्रकारचे अग्निशामक ठेवलेले असतात.

वॉटर टाईप – लाकूड, कागद, कापड यासाठी.

फोम टाईप – पेट्रोल, डिझेल यांसाठी.

उज$_2$ प्रकार – विद्युत उपकरणांसाठी.

ड्राय केमिकल पावडर – सर्वसाधारण आगीसाठी.

योग्य प्रकारचा अग्निशामक वापरणे अत्यंत महत्त्वाचे असते.

फायर हायड्रंट प्रणाली

मोठ्या इमारतींमध्ये फायर हायड्रंट बसविलेले असतात. अग्निशमन दल या हायड्रंटला होज पाईप जोडून मोठ्या प्रमाणात पाण्याचा मारा करून आग विझवते.

- महाविद्यालयातील फायर सिस्टीमची देखभाल

फायर सिस्टीम प्रभावी राहण्यासाठी नियमित देखभाल आवश्यक आहे.

- दर महिन्याला अलार्म तपासणी.
- स्मोक डिटेक्टर स्वच्छ करणे.
- स्प्रिंकलरची तपासणी.
- फायर एक्स्टिंग्विशरची वैधता तपासणे.
- फायर पंपाची चाचणी.
- बॅटरी बॅकअप तपासणे.
- वायरिंगची तपासणी.
- वार्षिक फायर ऑडिट करणे.
- फायर ड्रिलचे महत्त्व

महाविद्यालयात नियमित फायर ड्रिल घेतल्यास विद्यार्थी आणि कर्मचारी आपत्कालीन परिस्थितीत घाबरत नाहीत. त्यांना सुरक्षित मार्ग, एकत्र येण्याचे ठिकाण आणि बचाव प्रक्रिया समजते. यामुळे आपत्कालीन परिस्थितीत जीवितहानी कमी होते.



- फायर सिस्टीमचे फायदे
- फायर सिस्टीमचे अनेक महत्त्वाचे फायदे आहेत.
- आग लवकर ओळखली जाते.
- त्वरित सूचना मिळते.
- जीवितहानी कमी होते.
- मालमत्तेचे नुकसान कमी होते.
- आग पसरण्यापूर्वी नियंत्रण मिळवता येते.
- विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो.
- शैक्षणिक संस्थेची सुरक्षा अधिक मजबूत होते.
- विमा दाव्यासाठी मदत होते.
- शासनाच्या सुरक्षा नियमांचे पालन होते.
- विद्यार्थ्यांची जबाबदारी
- महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्याने पुढील बाबी लक्षात ठेवाव्यात.
- फायर अलार्मची थट्टा करू नये.
- आपत्कालीन मार्ग अडवू नयेत.
- विद्युत उपकरणांचा योग्य वापर करावा.
- आग दिसल्यास त्वरित प्रशासनाला कळवावे.
- फायर ड्रिलमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा.
- अग्निशामक वापरण्याचे मूलभूत प्रशिक्षण घ्यावे.

महाविद्यालयातील फायर सिस्टीम ही केवळ एक सुरक्षा यंत्रणा नसून विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या जीवनाचे संरक्षण करणारी अत्यंत महत्त्वाची व्यवस्था आहे. आग ही कोणत्याही क्षणी लागू शकते; परंतु योग्य नियोजन, आधुनिक फायर सिस्टीम, नियमित तपासणी, प्रशिक्षित कर्मचारी आणि जागरूक विद्यार्थी यांच्या मदतीने मोठ्या दुर्घटना टाळता येतात. फायर सिस्टीममुळे धूर किंवा उष्णतेचा त्वरित शोध घेतला जातो, अलार्म सुरू होतो, स्प्रिंकलर कार्यान्वित होतात, फायर पंप पाणीपुरवठा करतो आणि आवश्यक असल्यास अग्निशमन दलाला सूचना दिली जाते. त्यामुळे आग नियंत्रणात येते आणि सुरक्षित स्थलांतर शक्य होते. यामुळे प्रत्येक महाविद्यालयाने अद्ययावत फायर सिस्टीम बसविणे, तिची नियमित देखभाल करणे आणि सर्व विद्यार्थी व कर्मचाऱ्यांना अग्निसुरक्षेचे प्रशिक्षण देणे ही काळाची गरज आहे. सुरक्षित महाविद्यालय हेच गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे खरे आधारस्थान आहे.

श्रीराम नाईक
(एम.कॉम भाग –१)





माजी विद्यार्थी : महाविद्यालयाचे बलस्थान

शैक्षणिक संस्थेच्या यशाचे खरे मोजमाप केवळ तिच्या इमारती, सुविधा किंवा शैक्षणिक निकालांवर होत नाही, तर त्या संस्थेतून घडलेल्या विद्यार्थ्यांच्या कार्यकर्तृत्वावरही होते. एखाद्या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी हे त्या संस्थेची ओळख, प्रतिष्ठा आणि यशाचे जिवंत प्रतीक असतात. शिक्षण पूर्ण करून विविध क्षेत्रांत यश संपादन करणारे माजी विद्यार्थी महाविद्यालयाच्या नावाला गौरव प्राप्त करून देतात. त्यामुळे माजी विद्यार्थी हे कोणत्याही महाविद्यालयाचे अमूल्य भांडार आणि खरे बलस्थान मानले जातात. आजच्या आधुनिक शैक्षणिक व्यवस्थेत माजी विद्यार्थी संघटनांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. माजी विद्यार्थ्यांचा अनुभव, ज्ञान, सामाजिक संपर्क, आर्थिक पाठबळ आणि मार्गदर्शन यांचा लाभ महाविद्यालयाच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात होतो. संस्थेच्या प्रगतीत आणि विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यात माजी विद्यार्थ्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असते.

माजी विद्यार्थ्यांचे महत्त्व

महाविद्यालयातून शिक्षण पूर्ण करून बाहेर पडलेले विद्यार्थी जीवनाच्या विविध क्षेत्रांत कार्यरत असतात. काहीजण प्रशासन, उद्योग, शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, आरोग्य, कला, क्रीडा, राजकारण आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करतात. त्यांच्या यशामुळे महाविद्यालयाची प्रतिष्ठा वाढते.माजी विद्यार्थी हे संस्थेच्या इतिहासाचे आणि परंपरेचे वाहक असतात. त्यांनी महाविद्यालयात घेतलेल्या शिक्षणाचा आणि संस्कारांचा प्रभाव त्यांच्या कार्यातून दिसून येतो. त्यामुळे ते महाविद्यालय आणि समाज यांच्यातील महत्त्वाचा दुवा बनतात.

महाविद्यालयाची ओळख निर्माण करण्यात योगदान

महाविद्यालयाची खरी ओळख त्याच्या विद्यार्थ्यांमुळे निर्माण होते. जेव्हा एखादा माजी विद्यार्थी आपल्या क्षेत्रात मोठे यश मिळवतो, तेव्हा त्याच्याबरोबर त्याच्या महाविद्यालयाचे नावही उजळते. यशस्वी माजी विद्यार्थ्यांमुळे संस्थेची विश्वासार्हता वाढते आणि नवीन विद्यार्थ्यांना त्या महाविद्यालयात प्रवेश घेण्याची प्रेरणा मिळते.अनेक नामांकित महाविद्यालयांची ख्याती त्यांच्या माजी विद्यार्थ्यांमुळेच जगभर पोहोचली आहे. त्यामुळे माजी विद्यार्थी हे महाविद्यालयाच्या प्रतिष्ठेचे राजदूत मानले जातात.

विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्रोत

माजी विद्यार्थी हे सध्याच्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणेचे स्रोत असतात. महाविद्यालयातून शिक्षण घेऊन विविध क्षेत्रांत यशस्वी झालेल्या व्यक्तींचा प्रवास विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरतो. त्यांचे अनुभव, संघर्ष आणि यशोगाथा विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करतात. महाविद्यालयांमध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या व्याख्यानमाला, करिअर मार्गदर्शन कार्यक्रम आणि संवाद सत्रांमध्ये माजी विद्यार्थ्यांचा सहभाग विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरतो. त्यांच्या अनुभवांमधून विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळते.

करिअर मार्गदर्शनातील भूमिका

आजच्या स्पर्धात्मक युगात योग्य करिअर निवडणे हे विद्यार्थ्यांसमोरचे मोठे आव्हान आहे. अशा वेळी विविध क्षेत्रांत कार्यरत असलेले माजी विद्यार्थी विद्यार्थ्यांना मौल्यवान मार्गदर्शन करू शकतात.माजी विद्यार्थी रोजगाराच्या संधी, स्पर्धा परीक्षा, उच्च शिक्षण, कौशल्य विकास आणि उद्योग क्षेत्रातील बदल यांविषयी माहिती देतात. त्यांच्या अनुभवामुळे विद्यार्थ्यांना वास्तव परिस्थितीची जाणीव होते आणि करिअर नियोजन अधिक प्रभावीपणे करता येते.

रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे

माजी विद्यार्थी अनेक नामांकित कंपन्या, संस्था आणि उद्योगांमध्ये कार्यरत असतात. त्यामुळे ते महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करू शकतात. अनेक महाविद्यालयांमध्ये प्लेसमेंट उपक्रमांमध्ये माजी विद्यार्थ्यांचे महत्त्वपूर्ण योगदान असते.काही माजी विद्यार्थी आपल्या संस्थांमध्ये इंटर्नशिप, प्रशिक्षण किंवा नोकरीच्या संधी उपलब्ध करून देतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना रोजगार मिळिवणे अधिक सुलभ होते. महाविद्यालय आणि उद्योग क्षेत्र यांच्यातील दुवा म्हणून माजी विद्यार्थी महत्त्वाची भूमिका बजावतात.

आर्थिक सहकार्य आणि विकास

अनेक माजी विद्यार्थी आपल्या महाविद्यालयाशी भावनिक नाते जपून ठेवतात. त्यामुळे संस्थेच्या विकासासाठी ते आर्थिक मदत करतात. ग्रंथालये, प्रयोगशाळा, शिष्यवृत्ती योजना, डिजिटल सुविधा, क्रीडा साहित्य आणि इतर पायाभूत सुविधांच्या उभारणीत माजी विद्यार्थ्यांचे योगदान महत्त्वाचे ठरते.अनेक नामांकित शैक्षणिक संस्थांमध्ये माजी विद्यार्थ्यांच्या देणग्यांमुळे आधुनिक सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती निर्माण करण्यातही त्यांचे मोठे योगदान असते.



संशोधन आणि नवोपक्रमांना चालना

विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग आणि संशोधन क्षेत्रात कार्यरत असलेले माजी विद्यार्थी महाविद्यालयातील संशोधन उपक्रमांना चालना देऊ शकतात. ते संशोधन प्रकल्पांसाठी मार्गदर्शन, तांत्रिक मदत आणि आवश्यक संसाधने उपलब्ध करून देतात.त्यांच्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन पद्धती आणि उद्योग क्षेत्रातील नव्या संधींची माहिती मिळते. यामुळे महाविद्यालयातील शैक्षणिक गुणवत्ता वाढण्यास मदत होते.

सामाजिक आणि सांस्कृतिक विकास

महाविद्यालयाचा विकास केवळ शैक्षणिक क्षेत्रापुरता मर्यादित नसतो. सामाजिक, सांस्कृतिक आणि नैतिक मूल्यांची जपणूक करणेही तितकेच महत्त्वाचे असते. माजी विद्यार्थी विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होऊन विद्यार्थ्यांना समाजसेवेची प्रेरणा देतात.रक्तदान शिबिरे, पर्यावरण संवर्धन, आरोग्य जागरूकता, ग्रामीण विकास आणि सामाजिक सेवा कार्यक्रमांमध्ये त्यांचा सहभाग महत्त्वाचा असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीची भावना निर्माण होते.

महाविद्यालयाशी भावनिक नाते

माजी विद्यार्थ्यांचे आपल्या महाविद्यालयाशी एक विशेष भावनिक नाते असते. त्यांनी घालवलेली विद्यार्थी जीवनातील वर्षे, मित्रमंडळी, शिक्षक आणि विविध अनुभव त्यांच्या स्मरणात कायम राहतात. त्यामुळे ते संस्थेशी सातत्याने जोडलेले राहतात. माजी विद्यार्थी मेळावे, स्नेहसंमेलने आणि विविध कार्यक्रमांमधून हे नाते अधिक दृढ होते. अशा कार्यक्रमांमुळे जुन्या आठवणींना उजाळा मिळतो आणि महाविद्यालयाबद्दलची आत्मीयता टिकून राहते.

नेटवर्किंगची संधी

माजी विद्यार्थी संघटनांमुळे विद्यार्थ्यांना व्यापक संपर्कजाळे उपलब्ध होते. विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या व्यक्तींशी संवाद साधण्याची संधी मिळते. या संपर्कांचा उपयोग शिक्षण, संशोधन, रोजगार आणि उद्योजकतेसाठी होऊ शकतो.आजच्या काळात नेटवर्किंग हे यशाचे एक महत्त्वाचे साधन मानले जाते. माजी विद्यार्थ्यांचे जाळे विद्यार्थ्यांसाठी नवीन संधींचे दरवाजे उघडते.

उद्योजकतेला प्रोत्साहन

यशस्वी उद्योजक बनलेले माजी विद्यार्थी विद्यार्थ्यांना उद्योजकतेची प्रेरणा देतात. व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक असलेले मार्गदर्शन, अनुभव आणि आर्थिक मदत ते उपलब्ध करून देऊ शकतात.स्टार्टअप संस्कृती विकसित करण्यासाठी माजी विद्यार्थ्यांचे योगदान महत्त्वाचे ठरते. त्यांच्या अनुभवामुळे विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्रातील आव्हाने आणि संधी समजून घेण्यास मदत होते.

संस्थेच्या गुणवत्तावाढीत योगदान

महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी माजी विद्यार्थी सतत योगदान देऊ शकतात. अभ्यासक्रमातील बदल, उद्योग क्षेत्राच्या गरजा, कौशल्य विकास कार्यक्रम आणि आधुनिक शिक्षण पद्धती यांविषयी ते महत्त्वपूर्ण सूचना देतात.त्यांच्या अनुभवामुळे महाविद्यालयाला काळानुसार स्वतःमध्ये आवश्यक बदल करता येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना अधिक गुणवत्तापूर्ण आणि रोजगाराभिमुख शिक्षण मिळते.

राष्ट्रीय विकासात योगदान

महाविद्यालयातून घडलेले माजी विद्यार्थी विविध क्षेत्रांत कार्य करून राष्ट्राच्या विकासात योगदान देतात. प्रशासन, विज्ञान, उद्योग, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक सेवा यांसारख्या क्षेत्रांमध्ये त्यांचे कार्य देशाच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे ठरते.अशा यशस्वी माजी विद्यार्थ्यांमुळे महाविद्यालयाचा गौरव वाढतो आणि संस्थेच्या मूल्यांची समाजात सकारात्मक प्रतिमा निर्माण होते.

माजी विद्यार्थी हे कोणत्याही महाविद्यालयाचे खरे बलस्थान असतात. ते संस्थेच्या प्रतिष्ठेचे वाहक, विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक, विकासाचे भागीदार आणि प्रेरणेचे स्रोत असतात. त्यांच्या अनुभव, ज्ञान, संपर्क, आर्थिक सहकार्य आणि सामाजिक योगदानामुळे महाविद्यालयाची प्रगती अधिक वेगाने होते.माजी विद्यार्थी आणि महाविद्यालय यांच्यातील संबंध जितके मजबूत असतील तितकी संस्था अधिक सक्षम, प्रगत आणि प्रभावी बनते. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी, संस्थेच्या विकासासाठी आणि समाजाच्या प्रगतीसाठी माजी विद्यार्थ्यांचे योगदान अमूल्य आहे. म्हणूनच माजी विद्यार्थी हे महाविद्यालयाचे बलस्थान आहेत हे विधान पूर्णपणे सत्य असून त्यांच्या सहकार्यामुळेच कोणतीही शैक्षणिक संस्था यशाच्या नव्या उंचीवर पोहोचू शकते.

कायगुडे ओम सुनील
– एस. वाय.बी.कॉम.



मार्क झुकेरबर्ग - डिजिटल युगाचा परिवर्तनकर्ता

आजच्या जगात सोशल मीडिया हा शब्द उच्चारला की सर्वप्रथम आठवण येते ती मार्क झुकेरबर्ग यांची. त्यांनी केवळ एक वेबसाइट तयार केली नाही, तर जगभरातील लोकांना एकमेकांशी जोडणारा नवा सामाजिक विश्व निर्माण केला.

मार्क झुकेरबर्ग यांचा जन्म १४ मे १९८४ रोजी न्यूयॉर्कमध्ये झाला. लहानपणापासूनच त्यांना संगणक आणि प्रोग्रामिंगची आवड होती. वयाच्या १२व्या वर्षी त्यांनी "ZuckNet" नावाचे एक छोटे नेटवर्क तयार केले, ज्यामुळे त्यांच्या घरातील संगणक एकमेकांशी संवाद साधू शकत होते.

हार्वर्ड विद्यापीठात शिक्षण घेत असताना त्यांनी "Facemash" नावाचा एक प्रयोग केला विद्यार्थ्यांच्या फोटोंची तुलना करणारी वेबसाइट. या प्रयोगातूनच "Facebook" या कल्पनेचा जन्म झाला. २००४ मध्ये त्यांनी आपल्या मित्रांसह फेसबुक सुरू केले. सुरुवातीला ती फक्त हार्वर्डच्या विद्यार्थ्यांसाठी होती, पण काही महिन्यांतच ती जगभर पसरली.

फेसबुकने संवादाची पद्धतच बदलून टाकली.

लोकांना आपले विचार, फोटो, व्हिडिओ शेअर करण्याचे स्वातंत्र्य मिळाले.

व्यवसाय, शिक्षण, राजकारण, समाजसेवा सर्व क्षेत्रांमध्ये फेसबुकने नवे दालन उघडले.

"Connect the world" हे झुकेरबर्ग यांचे ध्येय आज प्रत्यक्षात उतरले आहे.

मार्क झुकेरबर्ग हे केवळ उद्योजक नाहीत, तर दूरदृष्टी असलेले नवकल्पक आहेत. त्यांनी फेसबुकच्या माध्यमातून Instagram, WhatsApp, आणि Meta (Virtual Reality) सारख्या प्रकल्पांना एकत्र आणले.

त्यांचे नेतृत्व हे तरुणांना प्रेरणा देणारे आहे – "Think big, start small, move fast" हा त्यांचा दृष्टिकोन आज अनेक स्टार्टअप्ससाठी मार्गदर्शक ठरला आहे.

२०२१ मध्ये फेसबुकचे नाव बदलून Meta Platforms Inc. करण्यात आले. यामागे उद्दिष्ट होते – Metaverse तयार करणे, म्हणजेच एक आभासी जग जिथे लोक डिजिटल स्वरूपात संवाद साधू शकतील.

झुकेरबर्ग यांचा विश्वास आहे की पुढील दशकात Virtual Reality (VR) आणि Augmented Reality (AR) हे शिक्षण, काम आणि मनोरंजनाचे केंद्रबिंदू ठरतील.

मार्क आणि त्यांच्या पत्नी प्रिसिला चॅन यांनी "Chan Zuckerberg Initiative" या संस्थेद्वारे शिक्षण, आरोग्य आणि विज्ञान क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे. त्यांचा उद्देश आहे मानवजातीच्या प्रगतीसाठी तंत्रज्ञानाचा उपयोग.

मार्क झुकेरबर्ग म्हणतात

"The biggest risk is not taking any risk."

"Ideas don't come fully formed. They only become clear as you work on them."

हे विचार प्रत्येक विद्यार्थ्याला सांगतात की स्वप्न पाहा, प्रयत्न करा आणि अपयशाला घाबरू नका.

मार्क झुकेरबर्ग यांनी जगाला दाखवून दिलं की एक कल्पना, एक संगणक आणि एक दृढनिश्चय पुरेसा असतो जग बदलण्यासाठी.

त्यांचा प्रवास हा आधुनिक तरुणांसाठी प्रेरणादायी आहे

तंत्रज्ञान हे केवळ साधन नाही, ते समाज परिवर्तनाचे शक्तिशाली माध्यम आहे.

पार्थ पंकज विळस्कर
बी.बी.ए.(सी.ए.)

पुस्तक प्रेमी मनुष्य
अत्यंत श्रीमंत आणि सुखी असतो.



योग एक जीवनशैली-
सुखी आणि समृध्द जीवनाचा राजमार्ग

नमस्कार ! संस्कृतमध्ये एक श्लोक आहे. 'आरोग्यं धन संपदा' म्हणजे आरोग्य हेच धन आहे. आणि 'धर्मार्थकाममोक्षाणामाआरोग्यं मूलमुत्तम'. म्हणजे धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार पुरूर्षार्थाचे मूळही आरोग्यातच आहे. आणि ब्रम्हचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थ आश्रम आणि सन्यास आश्रम हे पुरूषार्थ करण्यासाठी साधन मार्ग आहेत. या चार आश्रमांपैकी अनेक संतांनी गृहस्थाश्रमाला श्रेष्ठ मानले आहे. कारण जीवनाच्या दुसऱ्या टप्प्यात म्हणजे गृहस्थाश्रमात पुरूषार्थ करण्यासाठी संधी आणि वाव असतो. परंतु प्रयत्नांची पराकाष्ट व संयमाची परिक्षाही असते.

धर्मशास्त्रानूसार व निसर्ग नियमांना धरून जीवनाततील आचरण कसे असावे, या बाबत योगऋषी महर्षी पतंजलिंनी सखोल विचार त्या काळात केला आहे. कारण पतंजलिंच्या तर्कानुसार उत्क्रांतीच्या आणि प्रगतीच्या दिशेने जाणाऱ्या मनुष्याच्या जीवनात जशा संधी आहेत, तसेच समस्या व आव्हानेसुध्दा आहेत. त्यासाठी सर्वसामान्य मनुष्याची जीवनशैली कशी असावी, याबाबतचे सविस्तर मार्गदर्शन महर्षी पतंजलि ऋषिंनी अष्टांग योगशास्त्रामध्ये केले आहे. पतंजलि मानसशास्त्राचे गाढे अभ्यासक होते. त्यांनी १९५ सूत्रांचा योगदर्शन हा ग्रंथ लिहिला आहे. आता आपण महर्षी पतंजलिंनी रचनाबध्द केलेल्या अष्टांगयोगचे थोडक्यात अवलोकन करूया. त्यामध्ये जाणून घेवूया योगचा इतिहास, योग म्हणजे काय? योगच्या व्याख्या, अष्टांगयोगचे स्वरूप व परिचय, आणि योगचे फायदे.

१) योगचा इतिहास :- भारतीय ऋषीपरंपरेतील महर्षी पतंजलिंनी पाच ते साडेपाच हजार वर्षापूर्वी अष्टांगयोगची रचना केली आहे. परंतु सर्वात अगोदर पहिला योग भगवान शंकरांनी देवी पार्वतीला सांगीतला आहे. म्हणजे पतंजलिंच्या अगोदर पासून योग अस्तीत्वात होता, असे म्हणायला हरकत नाही. त्यानंतरचा योग हिमालयाच्या गुहेत, अरण्यात, डोंगरकपारीत वास्तव्य करणाऱ्या संन्यासी, ऋषीमूनी आणि त्यांचे शिष्य यांच्या पूरताच मर्यादीत होता. परंतु पतंजलिंनी मुख्यतः अष्टांगयोगाला लक्ष करून सर्वसामान्य मनुष्याला उपयुक्त ठरेल अशा अष्टांगयोगशास्त्राची रचना केली. आणि आज पतंजलिंचाच अष्टांगयोग लोकप्रिय झाला आहे. म्हणून पतंजलिंना योगशास्त्राचे जनक म्हणतात.

भारताचा अतिप्राचीन ठेवा असलेला योग भारताचे पंतप्रधान मान. नरेंद्रजी मोदी यांच्या पूढाकाराने २१ जून या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या संकल्पनेतून जगातील १७२ देशात जावून पोहोचला आहे. योगचा जगभर प्रचार प्रसार होण्यामध्ये योगगुरू स्वामी रामदेवजी महाराज यांनी महत्वाची भूमीका निभावली आहे. असे म्हटले तर फारसे वावगे होणार नाही. पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील आणि लक्ष्मीबाई तथा वहिणी यांनी कर्मयोगाचा स्विकार केला, म्हणून ते महान कर्मयोगी आहेत.

२) योग म्हणजे काय :- योग हा शब्द संस्कृतच्या यूज या धातूपासून तयार झाला आहे. योग म्हणजे जोडणे. उदाः शरीराला नियंत्रित करणारी शक्ती आणि संपूर्ण विश्वाला किंवा ब्रम्हांडाला नियंत्रित करणारी शक्ती एक होणे म्हणजे योग. आत्म्याचे परमात्म्याशी मिलन म्हणजे योग. शरीर, बुध्दि, मन आणि परमात्मा एकमेकांना लिंक होणे म्हणजे योग.

३) संस्कृत श्लोकात योगच्या व्याख्याः- १) समत्वं योग उच्चते २) योगः कर्मसु कौशलमब. पतंजलिंनी केलेली व्याख्या आहे 'योगः श्चित्तवृत्ति निरोधः' आणि आधुनिक भाषेत योग म्हणजे 'सुखी आणि समृध्द जीवनाचा राजमार्ग'.

४) अष्टांगयोगचे स्वरूप व परिचयः योगचे अनेक प्रकार आहेत. जसे की मंत्रयोग, भक्तीयोग, ध्यानयोग, सांख्यशास्त्रयोग, कर्मयोग, हठयोग, लययोग, राजयोग, इत्यादी. परंतु आता आपण पतंजलिंच्या अष्टांगयोगचाच विचार करूया. इतर शास्त्रांप्रमाणेच योग हे सुध्दा एक शास्त्र आहे. योग ही उपचार पध्दती नसून ती एक जीवनशैली आहे. कारण योगची निर्मिती शारीरिक मानसिक व्याधी विकारांवर उपचार करण्यासाठी केली नसून, शरीरामध्ये व्याधी विकार निर्माणच होवू नयेत, अशी शरीराची व मनाची अवस्था निर्माण करण्याची व्यवस्था



योगशास्त्रामध्ये आहे. योगशास्त्र हे धर्म, अध्यात्म आणि विज्ञानाच्या कसोटीवर उतरलेले शास्त्र आहे. योगशास्त्र हे केवळ शरीरावरच नव्हे तर, मनावर संस्कार करणारे शास्त्र आहे. योग ही एक जीवनशैली आहे. म्हणून शासन पातळीवर योगशास्त्राचा समावेश शरीरिक शिक्षणामध्ये न करता शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये करणे अधिक संयुक्तीक ठरेल असे वाटते. कारण योगाभ्यास आपल्याला आतून बदलवण्याचे काम करतो, आणि त्याचा परीणाम मात्र बाहेर दिसून येतो. व्यक्तीगत आणि सामुदायिक परिपर्वत घडवून आणने हे योगाचे खास वैशिष्टे आहे.

योग म्हटलं, की आपल्या डोळ्यासमोर येतात योगासने आणि प्राणायाम, पण ही तर योगची तीन व चार कमांकाची दोनच अंग किंवा पायऱ्या आहेत. योगची एकूण आठ अंगे आहेत. त्याला आपण आठ पायऱ्या किंवा आठ टप्पे असेही म्हणू शकतो. योगाची आठ अंग पूढीलप्रमाणे आहेत. १) यम २) नियम ३) आसन ४) प्राणायाम ५) प्रत्याहार ६) धारणा ७) ध्यान ८) समाधी. यामध्ये यम आणि नियम यांचे अनुक्रमे पाच पाच उपअंग आहेत. यमचे उपअंगः अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रम्हचर्य आणि अपरिग्रह. नियमचे पाच उपअंगः– सौच, संतोष, स्वाध्याय, तप, आणि ईश्वर प्रणिधान. आता आपण एक एक अंगाचा थोडक्यात अर्थ समजावून घेवूया.

१) यमः – पतंजलिंनी शारीरिक व मानसिक स्वास्थ्याबरोबर सामाजिक स्वास्थ्याचाही विचार केला आहे. समाजाला त्रास होवू नये म्हणून मनुष्याचे सार्वजनीक ठिकाणचे आचरण कसे असावे, याबाबतचे मार्गदर्शन यम या पहिल्या अंगामध्ये केले आहे.

२) नियमः– मनुष्याने स्वतःच्या वयक्तीक खाजगी जीवनातील आचरण कसे असावे याबाबतची आचारसंहिता किंवा मार्गदर्शन नियम या अंगामध्ये केले आहे.

३) आसनः आसन हे तिसऱ्या क्रमांकाचे अंग आहे. आसनाने शारीरिक व्याधी दूर होवून शरीर लवचिक होते. पाठीचा कणा कणखर बनतो. 'ततो द्वंद्वानभिघातः' म्हणजे मनाची दोलायमान अर्थात द्विधा मनस्थिती राहात नाही. आसने केल्याने साधक प्राणायामच्या बैठकीसाठी आणि योगाभ्यासाच्या पूढील टप्प्याकडे जाण्यासाठी सक्षम होतो. आसन कसे असावे याबाबतची पतंजलिंनी व्याख्या केली आहे. श्लोक 'स्थिरसुखमासनम्' म्हणजे आसन हे स्थिर आणि सुखावह असावे. उच्च रक्तदाब व मधुमेह असणाऱ्यांनी आसने योगतज्ञाच्या मार्गदर्शनाखाली करावीत. तसेच पूढे वाकण्याची व शिर्षासन सारखी आसने करू नयेत. आसने चार स्थितीमध्ये करतात. दंडस्थिती, बैठकस्थिती, शयनस्थिती आणि विपरित शयनस्थिती. आसन म्हणजे शरीराची स्थिती. पतंजलि ऋषींनी फक्त आसनांची निर्मिती केली आहे. त्यांनी आसनांना नांवे दिली नाहीत. त्यांनी फक्त शरीराच्या स्थिती निर्माण केल्या. शरीराची स्थितीचा ज्याप्रमाणे आकार तयार होईल, त्यानुसार त्या स्थितीला ओळखण्यासाठी नांवे देण्यात आली. काही आसनांना प्राण्यांची, वृक्षांची किंवा ऋषीमुनिंची नांवे दिली आहेत.

४) प्राणायामः आसन सिध्द झाल्यावर चौथे कमांकाचे अंग प्राणायाम आहे. प्राणायामची व्याख्या आहे 'तस्मीन सती श्वासप्रश्वासयोर्गति र्विच्छेदः प्राणायामः' म्हणजे श्वास प्रश्वासाच्या गतीला आपल्या क्षमतेनुसार नियंत्रित करणे म्हणजे प्राणायाम होय. हठयोग ग्रथांमध्ये श्लोक आहे 'प्राणायामेनयुक्तेन सर्वरोगक्षयोभवेतब, आयुक्ताभ्यासयोगेन सर्वरोगसमुद्भव' म्हणजे प्राणायामचा रोगोपचाराच्या दृष्टीने शास्त्रीय पध्दतीने अभ्यास केल्यास हाडांचे सोडून अनेक आजार बरे होवू शकतात, पण चूकीच्या पध्दतीने अभ्यास केल्यास अनेक आजार उद्भवू शकतात. प्राणायाम एक पूर्णपणे वैज्ञानिक पध्दत आहे. प्राणायामचा मुख्य संबंध श्वसनाशी आहे. श्वसनाचे तीन प्रकार आहेत. १) सामान्य श्वसन २) जलद श्वसन ३) दिर्घ किंवा संथ श्वसन. श्वास नाकाने आत घेण्याच्या कीयेला शास्त्रीय भाषेत पूरक, बाहेर सोडण्याला रेचक आणि श्वास रोकून ठेवण्याच्या कीयेला कुंभक असे म्हणतात. प्राणायामचे सहा प्रकार पूढीलप्रमाणे आहेत. १) भस्त्रिका प्राणायाम २) कपालभाती ३) बाहय प्राणायाम ४) अनुलोम–विलोम प्राणायाम ५) भ्भामरी प्राणायाम ६) नाडीशुध्दी प्राणायाम. इत्यादी. प्राणायामने शरीराच्या सूक्ष्म रक्त वाहिण्यांसह ७२ हजार नाडयांची शुध्दी होते. प्राण्यायामने शरीराच्या शेवटच्यो प्रत्येक पेशीपर्यंत प्राणवायू पाहोचला जातो. रक्ताभीसरण सूरळीत होते. प्राणायामने फुफ्फुसाची ताकद वाढून ते सशक्त होतात. कारण खोल आणि



दिर्घ अगदी श्वासपटलापर्यंत श्वास घेतल्याने फुफ्फुसाच्या जास्तीत जास्त कोशिका उघडतात. त्यामुळे दम्यासारखे विकार दूर होतात. सायनसचे आजार बरे होतात. दोन्ही मेंदूंचा समतोल राखण्यासाठी अनुलोम विलोम प्राणायाम अतिशय लाभकारी आहेत. मेंदूतील न्यूरॉस ॲक्टीव होतात. शरीरातील चयापचयाची कीया सुधारते. थायरॉईडचे कार्य सुधारते. मनाची दोलायमान स्थिती कमी होवून मन निर्विषय होवून निर्णय क्षमता वाढते. प्राणायाम करत असतांना छातीच्या बरगडयांचे आकुंचन प्रसरण होते, त्यामुळे दोन बरगड्यांमधील स्नायूंचा चांगला व्यायाम होतो व त्यांची लवचीकता वाढते. हृदयाचे कार्य सुधारते. व रक्तातील प्राणवायूची पातळी वाढते. यासारखे बरेच काही फायदे प्राणायामने होतात. ५) प्रतब विसरलेला असतो. पण ज्याचे ध्यान करतो त्याच्याशी तो एकरूप झालेला आहे, याची त्याला जाणीव राहाते आणि तो साधक देहमुक्तीचा आनंद तो भोगत असतो. परंतु निर्बीज समाधीमध्ये ध्यान करणाऱ्याला कशाचीही जाणीव राहात नाही. त्याचे स्वतःचे अस्तित्व पूर्णपणे संपुष्ठत आलेले असते. आध्यात्मिक भाषेत त्याला मुक्त होणे असे म्हणतात.

अशा प्रकारे महर्षी पतंजलि ऋषींनी मनुष्य प्राण्याच्या संपूर्ण जीवनाची रूपरेषा अष्टांगयोगातून तयार केली आहे. अष्टांगयोग आचरण करणारा मनुष्य सर्व भवबंधनातून मुक्त होतो.

नियमित योग केल्याचे फायदे. १) अष्टांग योगाच्या आचरणाने शारीरिक, मानसिक व भावनिक पातळीवरील व्याधी विकार दूर होवून रोगप्रतिकार शक्तीत वाढ झाल्यामुळे व्याधी विकार मूळासगट नष्ट होतात. परीणामी आरोग्य प्राप्ती होवून वैद्यकिय खार्चाची बचत होते. २) नियमित योगाभ्यासाने रोगप्रतिकार शक्ती वाढल्यामुळे संसर्गजन्य आजार होत नाहीत. तसेच अनुवंशीक आजार उद्भवत नाहीत. जसे की दमा, रक्तदाब, फुफ्फुसांचे आजार किंवा सर्दी वगैरे. आजार उद्भवल्यास लवकर बरे होतात. ३) झोपेच्या तकारी कमी होतात. उदाः घोरणे, निद्रानाश, मध्ये-मध्ये सारखी वारंवार जाग येणे. डचकून उठणे, घबराट होणे, झोपेत चालणे, झोपेत खूप स्वप्नं पडणे. वगैर.... ४) रक्ताभिसरण प्रक्रिया सूरळीत होवून शरीरिक पातळीवरी काही किरकोळ तकारी जसे की, एखाद्या पदार्थाची ॲलर्जी (वावडे) असणे, महिलांच्या मासिक धर्माच्या तक्रारी, पाय दुखने, गुढगे दुखणे, कंबर दुखी यासारख्या आजारांपासून होणारा त्रास कमी होतो, किंवा पूर्ण निघून जातो. ५) शारीरिक, मानसिक व भावनिक स्तरावरील ताण-तणाव, भय, नैराष्य कमी होते. हृदयाचे कार्य सुधारून हृदय सशक्त होते. ६) नियमित योगाभ्यासाने शरीर, बुध्दि आणि मन एकमेकांना लिंक केले (जोडले) जातात. ७) नियमित योग करणाऱ्यांचे हार्ट बंद पडत नाही. फुफ्फुसे सशक्त राहतात. ८) अंधश्रध्देपासून दूर जातो. पण खऱ्या अर्थाने अध्यात्मिक बनतो. नियमित योगने निराकार, निर्गुण परमेश्वराच्या आस्तीत्वाची अनुभूती यायला लागते. ९) ईश्वरावर श्रध्दा ठेवून भक्ती करतो. परंतू निराधार कर्मकांड करत नाही. १०) कोणाच्या लोभाला बळी पडत नाही. अमिष/लालच दाखवून त्याला कोणी फसवू शकत नाही. ११) उपास-तापास, व्रत-वैकल्य जास्त करावे लागत नाहीत. निराधार कर्मकांड करावे लागत नाही. १२) योग करणाऱ्याला भूत, पिशाश्च बाधा होत नाही. त्याला बाहेरची बाधा होत नाही. कारण आतील पक्के झालेले असते. यमित योग करणाऱ्यावर करणी-कवटल, जादू-टोना व भानामती सारखे प्रयोग चालत नाही, किंवा अशा निराधार गोष्टींवर विश्वास बसत नाही. १४) नियमित योग करणाऱ्यावर हिप्नॉटिझम (सम्मोहन किया) काम करत नाही. त्याला कोणी वश करू शकत नाही. १५) नियमित योग केल्याने नाभीजवळील मनीपूर चक व स्वाधीष्ठान चक जागृत होत राहील्याने त्यांच्या ठिकाणी जमा होणारी उर्जा संपूर्ण शरीरात पसरवली जाते. परीणामी तारूण्य अवस्था टिकून राहून वृध्दत्व लांबते. १६) योग करणारा सर्व परिस्थितीमध्ये सम राहतो. श्रीमंतीमध्ये सय्यमाने व गरीबीमध्ये धिराने राहतो.

असा हा अष्टांगयोग श्रीमंतांसाठी लाभदायक आणि गरीबांसाठी वरदान आहे.

॥ करा योग रहा निरोग ॥

श्री संदीप नलगे
योगशिक्षक



राष्ट्रीय सेवा योजना आणि सामाजिक जनजागृती

स्वयंसेवक राष्ट्रीय सेवा योजना

भारत हा विविधतेने नटलेला आणि युवकांची मोठी संख्या असलेला देश आहे. येथे भाषा, संस्कृती, परंपरा आणि सामाजिक स्तर यांची विविधता आढळते. अशा परिस्थितीत सामाजिक ऐक्य, सहकार्य आणि राष्ट्रीय एकात्मता टिकवून ठेवण्यासाठी युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. युवक हे देशाचे भवितव्य मानले जाते, आणि त्यांची ऊर्जा योग्य दिशेने वळवली तर समाजात सकारात्मक परिवर्तन घडू शकते. या उद्देशाने भारत सरकारने १९६९ साली राष्ट्रीय सेवा योजना (NSS) सुरू केली. "Not Me But You" म्हणजे मी नव्हे, तू हा तिचा मूलमंत्र असून तो निस्वार्थ सेवा आणि समाजाभिमुखतेचे प्रतीक आहे.

राष्ट्रीय सेवा योजना ही केवळ शैक्षणिक उपक्रम नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी आणि समाजाच्या उन्नतीसाठी एक प्रभावी साधन आहे. NSS विद्यार्थ्यांना पुस्तकांच्या चौकटीबाहेर नेऊन प्रत्यक्ष समाजाशी जोडते. विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, जबाबदारी आणि संवेदनशीलता विकसित होते. NSS चा सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये समाजाभिमुख दृष्टिकोनाची जडणघडण. स्वयंसेवक स्वच्छता मोहिमा, वृक्षारोपण, रक्तदान, आरोग्य शिबिरे, ग्रामविकास कार्यक्रम, जलसंवर्धन आणि आपत्ती व्यवस्थापन यांसारख्या उपक्रमांमध्ये सहभागी होतात. यामुळे त्यांना समाजातील विविध समस्यांची जाणीव होते आणि त्या सोडवण्यासाठी ते सक्रियपणे पुढाकार घेतात.राष्ट्रीय सेवा योजना समाजात समता आणि बंधुता निर्माण करण्यास मदत करते. NSS स्वयंसेवक ग्रामीण आणि शहरी भागात काम करताना विविध सामाजिक घटकांशी संपर्क साधतात. त्यामुळे जात, धर्म, भाषा किंवा आर्थिक स्तरातील भेद कमी होतात. विद्यार्थ्यांमध्ये सहानुभूती आणि मानवतेची भावना वाढीस लागते, आणि ते सर्वांना समान दृष्टीने पाहायला शिकतात.

ग्रामीण विकासाच्या दृष्टीने NSS अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. भारतातील अनेक गावांमध्ये अजूनही मूलभूत सुविधा अपुऱ्या आहेत. NSS स्वयंसेवक गावांमध्ये जाऊन स्वच्छता, साक्षरता, आरोग्य, जलसंधारण आणि पर्यावरण यासंबंधी जनजागृती करतात. ते शाळाबाह्य मुलांना शिक्षणासाठी प्रेरित करतात आणि गावकऱ्यांना स्वच्छतेचे व आरोग्याचे महत्त्व पटवून देतात. त्यामुळे ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते.पर्यावरण संरक्षणातही NSS ची भूमिका लक्षणीय आहे. वाढते प्रदूषण, जंगलतोड, जलसंकट आणि हवामान बदल या समस्या गंभीर बनल्या आहेत. NSS स्वयंसेवक वृक्षारोपण, प्लास्टिकमुक्ती मोहिमा आणि स्वच्छता अभियान राबवून पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करतात. ते लोकांना पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारण्यास प्रेरित करतात.आरोग्य आणि स्वच्छतेच्या क्षेत्रात NSS चे योगदान महत्त्वाचे आहे. स्वयंसेवक आरोग्य शिबिरे आयोजित करून लोकांना मोफत तपासणी आणि औषधांची सुविधा उपलब्ध करून देतात. ते रोगप्रतिबंधक उपाय आणि स्वच्छतेचे महत्त्व लोकांना समजावून सांगतात, ज्यामुळे समाजाचे आरोग्य सुधारते.

आपत्ती व्यवस्थापनाच्या वेळी NSS स्वयंसेवकांची भूमिका विशेष उल्लेखनीय असते. पूर, भूकंप, दुष्काळ किंवा इतर नैसर्गिक संकटांच्या वेळी ते मदत आणि बचावकार्य करतात. अन्न, पाणी, कपडे यांचे वितरण करून आणि मानसिक आधार देऊन ते संकटग्रस्त लोकांना नवजीवन देतात. NSS विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठीही अत्यंत उपयुक्त आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, संघभावना, संवाद कौशल्य, निर्णयक्षमता आणि समस्या सोडवण्याची क्षमता विकसित होते. ते प्रत्यक्ष अनुभवातून शिकतात आणि जबाबदार नागरिक बनतात.तसेच, NSS राष्ट्रीय एकात्मता आणि



देशभक्तीची भावना दृढ करते. विविध राज्यांतील विद्यार्थी एकत्र येऊन काम करतात, ज्यामुळे त्यांना विविध संस्कृतींची ओळख होते आणि देशाबद्दल अभिमानाची भावना निर्माण होते. NSS ही भविष्यातील सामाजिक नेत्यांची शाळा ठरते.

राष्ट्रीय सेवा योजना समाजात स्वयंसेवेची संस्कृती रुजवते आणि सामाजिक परिवर्तनासाठी प्रभावी चळवळ म्हणून कार्य करते. ती अंधश्रद्धा, अशिक्षण, अस्वच्छता आणि विषमता यांविरुद्ध जनजागृती करून समाजाला प्रगत दिशेने नेते. तसेच, शिक्षण आणि समाज यांच्यातील दुवा म्हणून NSS कार्य करते, ज्यामुळे शिक्षण अधिक अर्थपूर्ण बनते.एकंदरीत, राष्ट्रीय सेवा योजना ही समाज आणि विद्यार्थी यांच्यातील एक मजबूत पूल आहे. ती युवकांना योग्य दिशा देऊन समाजाच्या प्रगतीत त्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करते. NSS मुळे समाजात सकारात्मक बदल घडतात आणि एक सशक्त, जागरूक व समतावादी समाज निर्माण होण्यास मदत होते. त्यामुळे राष्ट्रीय सेवा योजनेचे सामाजिक महत्त्व अत्यंत व्यापक असून भविष्यातही ती समाजाच्या उन्नतीसाठी महत्त्वाची भूमिका बजावत राहील.

NSS ही केवळ शैक्षणिक योजना नसून ती एक सामाजिक चळवळ आहे. प्रत्यक्ष जीवनातील समस्यांचा सामना करण्याची संधी ती देते. NSS च्या माध्यमातून युवकांना समाजातील विविध घटकांशी संवाद साधण्याची आणि त्यांच्या अडचणी समजून घेण्याची संधी मिळते. राष्ट्रीय सेवा योजना आणि सामाजिक जनजागृती यांचा परस्परांशी अतूट संबंध आहे. NSS ही केवळ एक योजना नसून ती समाज परिवर्तनाची प्रभावी चळवळ आहे. ती युवकांना समाजाशी जोडते आणि त्यांच्यामध्ये सेवा भावना, जबाबदारी आणि संवेदनशीलता निर्माण करते.

सामाजिक जनजागृतीच्या माध्यमातून NSS समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि असमानता कमी करण्यास मदत करते. ती समाजाला अधिक जागरूक, समतावादी आणि प्रगत बनवते.

आजच्या बदलत्या काळात NSS चे महत्त्व अधिकच वाढले आहे. समाजातील समस्यांचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे झाले आहे आणि त्यावर उपाय शोधण्यासाठी युवकांची सक्रिय भूमिका आवश्यक आहे. NSS ही युवकांना योग्य दिशा देणारी आणि समाजाच्या विकासासाठी प्रेरणा देणारी एक प्रभावी शक्ती आहे.

एकंदरीत, राष्ट्रीय सेवा योजना आणि सामाजिक जनजागृती या एकमेकांच्या पूरक आहेत. या दोन्हींच्या एकत्रित प्रयत्नांमुळे समाजात सकारात्मक परिवर्तन घडू शकते आणि एक सशक्त, जागरूक व समतावादी भारत घडवता येऊ शकतो.

कु.श्रुतिका गवारे
टी वाय बी कॉम



जीवनातला तिमीर जावा, प्रबोधनाची पहाट व्हावी
इथे लाभले पंख लेवूनी उंच भरारी नभात घ्यावी

– कर्मवीर



विद्यार्थ्यांसाठी बस सेवा ही एक जीवनदायिनी

आजच्या या एकदम मॉडर्न युगात शिक्षणाला जे महत्त्व आहे ना, ते काही वेगळं सांगायला नकोच. ''शिक्षण हेच खरे सामर्थ्य'' असं आपण ऐकत आलोय आणि ते अगदी खरं आहे बरं का! शिक्षणामुळे व्यक्तीचं भविष्य घडतं, घरची आर्थिक परिस्थिती सुधारते आणि समाजालाही एक वेगळी दिशा मिळते. पण शिक्षण घ्यायचं म्हणजे फक्त पुस्तकं वाचणं नाही तर शाळा, कॉलेज, युनिव्हर्सिटी, ट्रेनिंग सेंटर इथे वेळेवर पोहोचणं सुद्धा तेवढंच महत्त्वाचं आहे. आणि हाच मुद्दा ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्यांसाठी जरा कठीण होतो. ग्रामीण भागात अजूनही अनेक ठिकाणी उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये किंवा प्रोफेशनल कोर्सेसची सुविधा सहज उपलब्ध नसते. त्यामुळे पोरांना जवळच्या शहरात किंवा तालुक्याच्या ठिकाणी जावं लागतं. आता रोज इतक्या लांबचा प्रवास करायचा म्हटलं, तर काहीतरी भरोसेमंद साधन हवं ना! आणि इथेच बस सेवा विद्यार्थ्यांसाठी अक्षरशः ''जीवनदायिनी'' ठरते. महाराष्ट्रासारख्या मोठ्या राज्यात सार्वजनिक वाहतुकीचं खूप मोठं महत्त्व आहे. एस.टी. महामंडळाची बस आपली सगळ्यांची लाडकी ''लाल परी'' राज्याच्या अगदी कानाकोपऱ्यात पोहोचलेली आहे. गावागावातून, डोंगर-दऱ्यांतून, खेड्यापाड्यांतून ही बस धावत असते. शेतकरी, कामगार, व्यापारी, महिला आणि विद्यार्थी सगळ्यांचंच आयुष्य या बस सेवेमुळे सोपं झालंय. पण विद्यार्थ्यांसाठी तर ही सेवा म्हणजे एकदम आधारस्तंभच आहे असं म्हटलं तरी चालेल.

ग्रामीण भागातली अनेक मुलं रोज १० ते ३० किलोमीटर, कधी त्याहूनही जास्त अंतर कापून शाळा किंवा कॉलेजला जातात. सगळ्यांकडे स्वतःचं वाहन असतंच असं नाही. घरची परिस्थितीही नेहमीच बरी असते असं नाही. काही कुटुंबं शेतमजुरीवर किंवा रोजंदारीवर चालतात. अशा वेळी महागडी प्रवास साधनं वापरणं शक्य नसतं. पण एस.टी. बस मात्र परवडणारी, सुरक्षित आणि विश्वासार्ह असते. त्यामुळे विद्यार्थ्यांना वेळेवर शिक्षण संस्थेत पोहोचणं शक्य होतं.बस सेवा विद्यार्थ्यांसाठी इतकी महत्त्वाची का आहे, याचा विचार केला तर सगळ्यात पहिली गोष्ट म्हणजे वेळेची बचत. जर विद्यार्थ्यांना पायी जावं लागलं किंवा अनियमित रिक्षा-टेम्पोवर अवलंबून राहावं लागलं, तर त्यांचा खूप वेळ वाया जाईल. पण बस सेवा नियमित असल्यामुळे ते वेळेवर शाळेत पोहोचतात. वेळेचं व्यवस्थापन हा यशाचा एक मोठा मंत्र आहे, आणि बस सेवा हे शिकवण्यात मदत करते.दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आर्थिक बचत. गरीब किंवा मध्यमवर्गीय कुटुंबांतील विद्यार्थ्यांसाठी रोजचा प्रवास खर्च परवडणारा असणं खूप गरजेचं असतं. खासगी वाहनं, रिक्षा किंवा इतर साधनं महाग पडतात. पण एस.टी. कडून विद्यार्थ्यांसाठी सवलतीचे पास दिले जातात. मासिक किंवा वार्षिक पासमुळे खर्च खूप कमी होतो. त्यामुळे पालकांवरचा आर्थिक ताण कमी होतो आणि मुलांचं शिक्षण अडथळ्याविना सुरू राहतं.बस सेवा ही फक्त प्रवासापुरती मर्यादित नाही, तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासातही मोठी भूमिका बजावते. रोजच्या प्रवासातून विद्यार्थ्यांना शिस्त, वेळेचं महत्त्व, सार्वजनिक ठिकाणी वागण्याची पद्धत, सामाजिक जाणीव यांचं ज्ञान मिळतं. वेगवेगळ्या लोकांशी संपर्क आल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो. स्वतःच्या जबाबदाऱ्या सांभाळण्याची सवय लागते.

आता विशेषतः मुलींच्या बाबतीत बोलायचं झालं, तर बस सेवा अजूनच महत्त्वाची ठरते. अजूनही काही ठिकाणी पालक मुलींना दूरच्या गावात शिक्षणासाठी पाठवताना थोडी काळजी घेतात. पण जर सुरक्षित आणि नियमित बस सेवा असेल, तर त्यांचा विश्वास वाढतो. मुलींना वेळेवर आणि सुरक्षितपणे शाळा किंवा कॉलेजला जाता येतं. त्यामुळे त्यांच्या शिक्षणाला चालना मिळते.महाराष्ट्र सरकारनं महिलांसाठी आणि मुलींसाठी काही चांगल्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. बसमध्ये राखीव आसनांची व्यवस्था असते, त्यामुळे गर्दीतही सन्मानाने प्रवास करता येतो. ''महिला सन्मान'' सारख्या योजनांमुळे महिलांना आणि विद्यार्थिनींना सवलतीच्या दरात प्रवास करता येतो. अर्ध्या तिकिटात प्रवास करणं शक्य झाल्यामुळे शिक्षणाचा खर्च कमी होतो.काही ठिकाणी शाळा आणि कॉलेजच्या वेळेनुसार विशेष बसेस सोडल्या जातात. बसस्थानकांवर लाईट्स, सुरक्षा व्यवस्था, महिला मदत कक्ष, CCTV यांसारख्या सुविधा असल्या की विद्यार्थिनींचा आत्मविश्वास अजून वाढतो.



सुरक्षितता ही मुलींच्या शिक्षणासाठी खूप महत्त्वाची गोष्ट आहे, आणि बस सेवा त्यात मोठा वाटा उचलते.बस सेवा ही सामाजिक समतेचंही एक महत्त्वाचं साधन आहे. श्रीमंत–गरीब, ग्रामीण–शहरी, मुलगा–मुलगी सगळ्यांना समान संधी देण्याचं काम ती करते. शिक्षण सगळ्यांसाठी समान असावं, यासाठी वाहतूक व्यवस्था मजबूत असणं गरजेचं आहे.

कोरोनाच्या काळानंतर बस सेवेनं विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मोठी मदत केली. लॉकडाऊनमुळे शिक्षणात खंड पडला होता. पण बस सेवा पुन्हा सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्यांना कॉलेजला जाणं शक्य झालं. विशेषतः ग्रामीण भागात ही सेवा खूप उपयोगी ठरली.तरीसुद्धा काही समस्या अजूनही आहेतच बरं का! अनेक ठिकाणी बस वेळेवर येत नाही, बसेस कमी असतात, खूप गर्दी असते. काही वेळा विद्यार्थ्यांना उभं राहून लांबचा प्रवास करावा लागतो. पावसाळ्यात रस्त्यांची अवस्था खराब झाल्यामुळे बस सेवा विस्कळीत होते. विशेषतः मुलींसाठी ही परिस्थिती त्रासदायक ठरते.

या सगळ्या समस्यांवर उपाय म्हणून शासन आणि प्रशासनाने अजून लक्ष देणं गरजेचं आहे. विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र बसेस, अतिरिक्त फेऱ्या, चांगले रस्ते, सुरक्षित बसथांबे या गोष्टी सुधारायला हव्यात. विद्यार्थिनींसाठी हेल्पलाइन, महिला सुरक्षा कर्मचारी आणि तक्रार निवारण यंत्रणा मजबूत असावी.शिक्षणाचा अधिकार सगळ्यांना समानपणे मिळावा, यासाठी वाहतूक सुविधा उत्तम असणं गरजेचं आहे. बस सेवा चांगली असेल, तर विद्यार्थ्यांची शाळाबाह्य संख्या कमी होईल. मुलींचं शिक्षण वाढेल आणि ग्रामीण भागाचा विकास होईल.

थोडक्यात काय, तर विद्यार्थ्यांसाठी बस सेवा म्हणजे आशा, सुरक्षितता, शिस्त आणि उज्ज्वल भविष्याचा मार्ग आहे. ती विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वप्नांपर्यंत पोहोचवणारी एक मजबूत वाट आहे. विशेषतः मुलींसाठी ती शिक्षणाच्या दारापर्यंत पोहोचवणारी सुरक्षित शिडी आहे.शेवटी एकच सांगायचं, ''विद्यार्थ्यांसाठी बस सेवा ही एक जीवनदायिनी आहे'' हे अगदी १००% खरं आहे बरं का! आता पुढचं काम आपलं ही सेवा अजून चांगली, सुरक्षित आणि सर्वसमावेशक बनवणं. कारण आजचा विद्यार्थी म्हणजे उद्याचा नागरिक. आणि त्याच्या प्रवासात बस सेवा ही खरंच एक विश्वासू साथीदार आहे.

चंद्रकला देवकर
एम. कॉम. द्वितीय वर्ष





विपणनातून निर्माण होणाऱ्या व्यवसायाच्या संधी

अहो, आधीच सांगते 'माल भारी आहे' म्हणून ग्राहक रांगेत उभे राहतील, अशी अपेक्षा ठेवू नका. आजकाल ग्राहक हुशार आहे, वेळ कमी आहे आणि पर्याय भरपूर आहेत. त्यामुळे ''आपण काय करतो'' यापेक्षा ''लोकांना ते कळतं का?'' हा मुद्दा महत्त्वाचा. आणि इथंच विपणन म्हणजे मार्केटिंग आपलं खरं काम दाखवतं. पुणेरी भाषेत सांगायचं तर काम चोख असलं पाहिजेच, पण त्याचं नीट सादरीकरण केलं नाही, तर लोक ''बरं आहे, पुढे बघू'' म्हणून निघून जातात.आजच्या आधुनिक युगात विपणन हे फक्त जाहिरात नसून एक संपूर्ण प्रक्रिया आहे. ग्राहकांची गरज समजून घेणं, त्यानुसार उत्पादन तयार करणं, त्याचं योग्य पद्धतीनं सादरीकरण करणं, आणि शेवटी ग्राहकांशी नातं टिकवणं हे सगळं विपणनात येतं. आणि ही प्रक्रिया जितकी नीट समजून घेतली, तितक्या जास्त व्यवसायाच्या संधी निर्माण होतात.सर्वात आधी डिजिटल विपणनाचा विचार करूया. अहो, आज मोबाईल नसलेला माणूस शोधावा लागेल! त्यामुळे सोशल मीडियावर उपस्थिती असणं हे आजच्या व्यवसायाचं पहिलं पाऊल आहे. फेसबुक, इन्स्टाग्राम, यूट्यूब, व्हॉट्सअॅप ही सगळी साधनं योग्य वापरली, तर मोठमोठ्या कंपन्यांनाही स्पर्धा देता येते. पुण्यातल्या अनेक लहान उद्योगांनी हे सिद्ध करून दाखवलं आहे. घरगुती पदार्थ बनवणाऱ्या महिलांनी सोशल मीडियाच्या मदतीने स्वतःचा ब्रँड तयार केला आहे. ''घरगुती, शुद्ध, चविष्ट'' हे तीन शब्द योग्य पद्धतीने मांडले, की ग्राहक तयार!

पुण्यातील ग्राहक थोडा वेगळा आहे बरं का. इथं लोक फक्त जाहिरात पाहून भुलत नाहीत. ''क्वालिटी आहे का?'', ''किंमत योग्य आहे का?'', ''खरंच उपयोगी आहे का?'' हे सगळं तपासलं जातं. त्यामुळे इथं व्यवसाय करायचा असेल, तर विपणनात प्रामाणिकपणा हवा. जास्त गाजावाजा केला, आणि माल कमी दर्जाचा निघाला, तर दुसऱ्यांदा ग्राहक येणार नाही हे पक्कं.आता कंटेंट मार्केटिंगची गोष्ट करूया. आजकाल लोकांना माहिती हवी असते फक्त उत्पादन नको. त्यामुळे ब्लॉग, व्हिडिओ, सोशल मीडिया पोस्ट्स यांचा वापर करून ग्राहकांना माहिती देणं हा एक उत्तम मार्ग आहे. उदाहरणार्थ, एखादा बेकरी व्यवसाय असेल, तर तो फक्त केक विकत नाही; तर ''केक कसा बनवला जातो?'', ''कोणते घटक वापरले जातात?'' हे दाखवतो. त्यामुळे ग्राहकांचा विश्वास वाढतो. खर सांगायचं, तर ङ्कआधी विश्वास कमवा, मग व्यवसाय आपोआप येईल.ङ्क

इन्फ्लुएंसर मार्केटिंग हा आजचा ट्रेंड आहे. सोशल मीडियावर ज्यांचे फॉलोअर्स जास्त आहेत, त्यांच्यामार्फत आपल्या उत्पादनाची जाहिरात करायची. पुण्यात अनेक फूड ब्लॉगर्स, ट्रॅव्हल व्लॉगर्स आहेत, ज्यांचा लोकांवर प्रभाव असतो. त्यांनी एखाद्या ठिकाणाचं कौतुक केलं, की तिथे ग्राहकांची गर्दी वाढते. त्यामुळे योग्य इन्फ्लुएंसर निवडून त्यांच्यासोबत काम करणं ही एक मोठी व्यवसायाची संधी आहे.

स्थानिक विपणन (लोकल मार्केटिंग) ही पण तितकीच महत्त्वाची गोष्ट आहे. पुण्यात प्रत्येक भागाची गरज वेगळी आहे. उदाहरणार्थ, आयटी पार्कजवळ फास्ट फूड आणि कॅफे चालतात, तर निवासी भागात घरपोच सेवा जास्त चालते. त्यामुळे ''आपला ग्राहक कोण?'' हे ओळखून त्यानुसार विपणन केलं, तर व्यवसाय पटकन वाढतो. पुणेरी शैलीत सांगायचं, तर ''जिथं ग्राहक, तिथंच आपला व्यवसाय!'' ई-कॉमर्समुळे व्यवसायाच्या संधींना नवीन दिशा मिळाली आहे. आता दुकान उघडण्यासाठी मोठी जागा किंवा मोठी गुंतवणूक आवश्यक नाही. ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर आपण आपली उत्पादने विकू शकतो. पण इथेही स्पर्धा मोठी आहे. त्यामुळे सर्च इंजिन ऑप्टिमायझेशन (SEO), ऑनलाइन जाहिराती, ईमेल मार्केटिंग या गोष्टींचा वापर करून आपला व्यवसाय वेगळा ठरवावा लागतो.

ग्राहकांशी नातं टिकवणं हेही खूप महत्त्वाचं आहे. एकदा ग्राहक मिळवणं सोपं असतं, पण त्याला टिकवणं अवघड असतं. त्यासाठी चांगली सेवा, वेळेवर डिलिव्हरी, आणि ग्राहकांच्या तक्रारींना योग्य प्रतिसाद हे सगळं आवश्यक आहे. ग्राहकाला ''सेवा चांगली मिळाली'' असं वाटलं, की तो इतरांनाही सांगतो. आणि ''वाईट अनुभव आला'' असं वाटलं, तर त्याची बातमीही पटकन पसरते हे लक्षात ठेवा.



नवकल्पना (Innovation) ही पण एक मोठी संधी आहे. आजकाल ग्राहकांना काहीतरी वेगळं हवं असतं. त्यामुळे नवीन कल्पना, नवीन उत्पादने, आणि नवीन पद्धती वापरणं आवश्यक आहे. उदाहरणार्थ, पर्यावरणपूरक उत्पादने, ऑर्गॅनिक फूड, कस्टमाइज्ड गिफ्ट्स या सगळ्या गोष्टी आज खूप लोकप्रिय आहेत. योग्य विपणन केलं, की या क्षेत्रात मोठा व्यवसाय उभा राहू शकतो.तंत्रज्ञानाचा वापर करूनही विपणन अधिक प्रभावी करता येतं. डेटा ॲनालिसिस, ग्राहकांचे वर्तन, त्यांच्या आवडी–निवडी हे सगळं समजून घेऊन त्यानुसार रणनीती तयार केली, की यश मिळणं सोपं होतं. पुणेरी भाषेत सांगायचं, तर डोकं वापरा, फक्त पैसा नाही!

तसंच, ब्रँडिंग ही देखील एक महत्त्वाची बाब आहे. फक्त उत्पादन विकणं पुरेसं नाही; तर त्याला एक ओळख देणं गरजेचं आहे. नाव, लोगो, पॅकेजिंग, आणि ग्राहकांचा अनुभव हे सगळं मिळून ब्रँड तयार होतो. पुण्यातील काही लहान व्यवसायांनी उत्तम ब्रँडिंग करून मोठं यश मिळवलं आहे. आता थोडं वास्तव बघूया. विपणनातून संधी निर्माण होतात, पण त्यासाठी मेहनत, सातत्य आणि योग्य नियोजन आवश्यक आहे. आज पोस्ट टाकली, उद्या ग्राहक मिळाला असं लगेच होत नाही. त्यासाठी वेळ द्यावा लागतो, प्रयोग करावे लागतात, आणि चुका सुधाराव्या लागतात. शेवटी एवढंच विपणन ही एक कला आहे, आणि ज्याने ती साधली, त्याच्यासाठी व्यवसायाच्या संधींची दारं कायम उघडी राहतात. पण पुणेरी स्टाइलमध्ये सांगायचं, तर काम करा, पण व्यवस्थित करा; आणि नाव कमवा, पण टिकवून ठेवा! म्हणून, जर तुम्हाला व्यवसाय सुरू करायचा असेल किंवा वाढवायचा असेल, तर विपणनाचं महत्त्व समजून घ्या. नवीन गोष्टी शिकत रहा, बदल स्वीकारा, आणि ग्राहकांना केंद्रस्थानी ठेवा. कारण शेवटी, व्यवसाय हा ग्राहकांवरच चालतो हे विसरू नका.आणि हो, शेवटचा सल्ला ''फक्त विचार करत बसू नका; कृती करा. बोला कमी, काम जास्त करा आणि मग बघा, यश कसं तुमच्याकडे येतं!''

वैष्णवी गायकवाड
टी. वाय.बी. कॉम.





शून्यातून शिखरापर्यंत : महिला उद्योजकांचा संघर्ष, जिद्द आणि यशाचा प्रेरणादायी प्रवास

"There is no limit to what we, as women, can accomplish." – Michelle Obama

पूर्वस्थिती : महिलांची मर्यादित भूमिका

पूर्वीच्या काळात महिलांची भूमिका मुख्यतः घरकाम, मुलांचे संगोपन आणि कुटुंब व्यवस्थापनापुरती मर्यादित मानली जात होती. समाजातील पारंपरिक विचारसरणीमुळे महिलांना शिक्षण, आर्थिक स्वातंत्र्य आणि व्यवसाय क्षेत्रात संधी कमी मिळत होत्या.

व्यवसाय करणे हे पुरुषांचे क्षेत्र मानले जात होते. महिलांकडे कल्पकता आणि कौशल्य असूनही त्यांना आर्थिक मदत, सामाजिक पाठिंबा आणि आत्मविश्वासाचा अभाव जाणवत होता. ग्रामीण भागात तर महिलांना स्वतंत्र व्यवसाय करणे अत्यंत कठीण होते.

परंतु काळ बदलत गेला तसे महिलांनी स्वतःच्या क्षमतेची जाणीव करून घेतली. शिक्षण, तंत्रज्ञान आणि बदलत्या सामाजिक दृष्टिकोनामुळे महिलांनी उद्योगक्षेत्रात आत्मविश्वासाने पाऊल टाकण्यास सुरुवात केली.

ती थांबली नाहीः म्हणूनच ती घडली ! अडथळ्यांवर मात करत पुढे जाणाऱ्या महिला

व्यवसाय सुरू करताना स्त्री आणि पुरुष या दोघांचेही काही समान ध्येय असतात. दोघांनाही आर्थिक स्थैर्य, यश, समाजात मान–सन्मान आणि स्वतःची वेगळी ओळख निर्माण करायची असते. मात्र महिलांना या प्रवासात काही अतिरिक्त अडचणींचा सामना करावा लागतो. घर आणि व्यवसाय यांचा समतोल राखणे, समाजातील पारंपरिक विचारसरणी, आर्थिक मदतीचा अभाव आणि सुरक्षिततेचे प्रश्न या सर्व गोष्टी महिलांसाठी आव्हान ठरतात. तरीही त्यांनी या अडथळ्यांवर मात करत स्वतःचे यशस्वी विश्व निर्माण केले आहे.

संघर्षातून घडलेल्या प्रेरणादायी महिला उद्योजकांच्या यशकथा

महाराष्ट्रातील प्रेरणादायी महिला उद्योजक

महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात महिलांच्या उद्योजकतेची अनेक प्रेरणादायी उदाहरणे पाहायला मिळतात.

Kalpana Saroj

उद्योग : Kamani Tubes

अतिशय प्रतिकूल परिस्थितीतून त्यांनी आपला प्रवास सुरू केला. समाजातील अडचणी, आर्थिक संकटे आणि वैयक्तिक संघर्ष यावर मात करत त्यांनी बंद पडलेली कंपनी पुन्हा यशस्वी केली. आज त्यांना भारताची प्रेरणादायी महिला उद्योजिका म्हणून ओळखले जाते.

Medha Kulkarni

उद्योग : सामाजिक व उद्योजकीय उपक्रम

महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांनी विविध सामाजिक आणि आर्थिक उपक्रम राबवले. त्यांच्या कार्यामुळे अनेक महिलांना स्वावलंबी होण्याची प्रेरणा मिळाली.

मी अपयशाला कधीच घाबरले नाही, कारण प्रत्येक अपयश मला नव्या यशाकडे घेऊन जाते." – Kiran Mazumdar-Shaw

भारतातील प्रेरणादायी महिला उद्योजक

Kiran Mazumdar-Shaw

उद्योग : Biocon

भारतातील बायोटेक्नॉलॉजी क्षेत्राला जागतिक ओळख मिळवून देण्यात त्यांचे मोठे योगदान आहे. विज्ञान आणि उद्योग यांचा सुंदर संगम घडवत त्यांनी महिलांचे नेतृत्व किती प्रभावी असू शकते हे सिद्ध केले.

Falguni Nayar

उद्योग : Nykaa

कॉर्पोरेट क्षेत्रातील अनुभवाच्या जोरावर त्यांनी "Nykaa" ही कंपनी सुरू केली. आज Nykaa ही भारतातील एक यशस्वी ई–कॉमर्स कंपनी बनली आहे.



Indra Nooyi

उद्योग : PepsiCo

जागतिक उद्योगविश्वात भारतीय महिलांचे नेतृत्व किती प्रभावी असू शकते हे त्यांनी सिद्ध केले. त्यांच्या व्यवस्थापन कौशल्याचे जगभर कौतुक केले जाते.

Aditi Gupta

उद्योग : Menstrupedia

महिलांच्या आरोग्याशी संबंधित 'मासिक पाळी' या विषयावर जागरूकता निर्माण करण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांच्या उपक्रमामुळे हजारो मुलींना योग्य माहिती मिळाली.

जगातील प्रख्यात महिला उद्योजक

Oprah Winfrey

उद्योग : OWN Network

संघर्षातून उभे राहत त्यांनी स्वतःचे मीडिया साम्राज्य निर्माण केले. त्यांच्या प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वामुळे त्या जगभर प्रसिद्ध आहेत.

Sara Blakely

उद्योग : Spanx

एका छोट्या कल्पनेतून त्यांनी अब्जावधींचा फॅशन व्यवसाय उभारला. चिकाटी आणि आत्मविश्वासाचे त्या उत्तम उदाहरण आहेत.

Melanie Perkins

उद्योग : Canva

डिझाईन आणि तंत्रज्ञान क्षेत्रात त्यांनी मोठी क्रांती घडवली. त्यांच्या कल्पकतेमुळे Canva आज जगभर लोकप्रिय आहे.

महिलांसाठी शासनाच्या योजना आणि प्रोत्साहन

महिला उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी भारत सरकार आणि महाराष्ट्र शासन विविध योजना राबवत आहेत.

१. प्रधानमंत्री मुद्रा योजना

या योजनेअंतर्गत महिलांना लघुउद्योग सुरू करण्यासाठी कमी व्याजदरात कर्ज दिले जाते.

२. Stand-Up India योजना

महिला आणि अनुसूचित जाती–जमातीतील नागरिकांना उद्योग सुरू करण्यासाठी आर्थिक सहाय्य दिले जाते.

३. महिला आर्थिक विकास महामंडळ (MAVIM)

महाराष्ट्र शासनाची ही संस्था महिला बचत गटांना प्रशिक्षण, आर्थिक मदत आणि व्यवसाय मार्गदर्शन देते.

४. Startup India

महिला स्टार्टअप्सना नोंदणी, प्रशिक्षण, करसवलत आणि गुंतवणूक मिळवून देण्यासाठी ही योजना मदत करते.

५. कौशल्य विकास कार्यक्रम

महिलांना डिजिटल मार्केटिंग, शिवणकाम, अन्नप्रक्रिया, संगणक शिक्षण आणि व्यवसाय व्यवस्थापनाचे प्रशिक्षण दिले जाते.

या योजनांमुळे महिलांना आर्थिक स्वावलंबन आणि आत्मविश्वास मिळत आहे.

नारीणां शक्तिरूपेण संस्थिता सृष्टिरूपिणी ।

यत्र सा पूज्यते नित्यं तत्र प्रगतिर्न संशयः ।।

अर्थ : स्त्री ही सृष्टिची शक्तीस्वरूप निर्मिती आहे. ज्या ठिकाणी तिच्या सामर्थ्याचा सन्मान केला जातो, तेथे प्रगती निश्चित घडते. निसर्गाने स्त्री आणि पुरुष या दोघांनाही समान बुद्धी, कर्तृत्व आणि प्रगतीची क्षमता दिली आहे. त्यामुळे महिलांनी उद्योगक्षेत्रात निर्माण केलेले यश हे केवळ वैयक्तिक प्रगतीचे प्रतीक नसून समाजाच्या विकासाचेही प्रेरणादायी उदाहरण आहे.

कु. हर्षदा अभंग
टी. वाय. बीबीए (सीए)



शेतीची नवी पंढरीः बारामतीमधील कृषी क्रांती आणि आधुनिक प्रयोगांची गाथा

महाराष्ट्र हा कृषिप्रधान राज्य म्हणून ओळखला जातो. मात्र बदलते हवामान, पाण्याची कमतरता, वाढता उत्पादन खर्च आणि बाजारपेठेतील अस्थिरता यांसारख्या अनेक संकटांमुळे शेतीसमोर मोठी आव्हाने उभी राहिली आहेत. अशा परिस्थितीतही आधुनिक तंत्रज्ञान, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि नाविन्यपूर्ण प्रयोग यांच्या बळावर शेतीमध्ये क्रांती घडवून आणणारे एक महत्त्वाचे केंद्र म्हणजे पुणे जिल्ह्यातील बारामती. आज बारामतीला ''शेतीची नवी पंढरी'' म्हणून संबोधले जाते, कारण येथे पारंपरिक शेतीला आधुनिकतेची जोड देऊन ग्रामीण विकासाचा नवा आदर्श निर्माण करण्यात आला आहे.

एकेकाळी दुष्काळग्रस्त आणि मर्यादित पावसासाठी ओळखले जाणारे बारामती आज अत्याधुनिक कृषी तंत्रज्ञान, संशोधन, सेंद्रिय शेती, दुग्धव्यवसाय आणि कृषी उद्योग यामुळे देशभरात चर्चेचा विषय ठरले आहे. येथे कार्यरत असलेल्या 'ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट' (ADT), कृषी विज्ञान केंद्र (KVK) आणि विविध संशोधन केंद्रांनी स्थानिक शेतकऱ्यांसाठी आधुनिक शेतीचे नवे दरवाजे खुले केले आहेत.

बारामतीतील कृषी क्रांतीची सुरुवात जलव्यवस्थापनापासून झाली. ङ्कपाणी अडवा, पाणी जिरवाङ्क या संकल्पनेचा प्रभावी वापर करून येथे तलाव, बंधारे, कालवे आणि ठिबक सिंचन प्रणाली विकसित करण्यात आली. कमी पाण्यात अधिक उत्पादन घेण्याच्या तंत्रामुळे ऊस, डाळिंब, द्राक्षे, भाजीपाला आणि फुलशेतीमध्ये मोठी प्रगती झाली. ठिबक सिंचनामुळे पाण्याची बचत झाली आणि उत्पादनाचा दर्जाही सुधारला.

आज बारामतीतील शेती केवळ नांगर, बैल आणि पारंपरिक पद्धतींपुरती मर्यादित राहिलेली नाही. येथे आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला जात आहे. शेतकरी आता मोबाईल ॲप्स, हवामान अंदाज, माती परीक्षण, ड्रोन तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) यांचा वापर करत आहेत. एआय-आधारित ड्रोनच्या मदतीने पिकांवर फवारणी, निरीक्षण आणि खत व्यवस्थापन केले जात आहे. जीपीएस-आधारित ट्रॅक्टर्समुळे पेरणी अधिक अचूक होत असून शेतकऱ्यांचा वेळ आणि खर्च दोन्ही वाचत आहेत. काही प्रयोगांमध्ये उत्पादन खर्चात २० ते ३० टक्क्यांपर्यंत बचत झाल्याचे दिसून आले आहे.

बारामतीमधील 'इनोव्हेशन आणि इंक्यूबेशन सेंटर' हे कृषी क्षेत्रातील तरुणांसाठी प्रेरणास्थान ठरत आहे. २०१८ पासून कार्यरत असलेल्या या केंद्राच्या माध्यमातून कृषी-तंत्रज्ञान, अन्न प्रक्रिया उद्योग आणि ग्रामीण स्टार्टअप्सना प्रोत्साहन दिले जात आहे. अनेक तरुणांनी शेतीकडे केवळ परंपरा म्हणून नव्हे, तर आधुनिक व्यवसाय म्हणून पाहण्यास सुरुवात केली आहे. गेल्या काही वर्षांत शेकडो नवकल्पनांना या केंद्राने मार्गदर्शन आणि सहाय्य उपलब्ध करून दिले आहे.

याशिवाय, येथील 'पोस्ट ग्रॅज्युएट रिसर्च सेंटर' विविध विद्यापीठे आणि आयसीएआर (ICAR) संस्थांच्या सहकार्याने कृषीशास्त्र आणि जैवतंत्रज्ञानावर संशोधन करत आहे. माती परीक्षण, सूक्ष्मजीवशास्त्र आणि पीक व्यवस्थापन यांसारख्या विषयांवरील संशोधनामुळे शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन मिळत आहे. ऊस उत्पादनामध्ये एआय आणि उपग्रह प्रतिमांच्या वापरामुळे उत्पादनात लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून आले आहे.

महिला सक्षमीकरणामध्येही बारामतीने वेगळी ओळख निर्माण केली आहे. 'क्रीयेटीव्ह कुक लॅब'च्या माध्यमातून ग्रामीण महिलांना अन्न प्रक्रिया उद्योगाचे प्रशिक्षण दिले जाते. बाजरीचे स्नॅक्स, एनर्जी बार, लोणचे आणि विविध घरगुती पदार्थ तयार करून महिलांनी स्वतःचा व्यवसाय सुरू केला आहे. ऋडडअख-मान्यताप्राप्त पॅकेजिंग आणि विक्रीसाठी आवश्यक प्रशिक्षणही येथे दिले जाते. त्यामुळे ग्रामीण महिलांना आर्थिक स्वावलंबनाची नवी दिशा मिळाली आहे.

फलोत्पादन क्षेत्रातही बारामतीने मोठी झेप घेतली आहे. येथील कलम कक्षामध्ये आंबा, डाळिंब आणि इतर फळांच्या उच्च उत्पादन देणाऱ्या जाती विकसित केल्या जातात. दरवर्षी मोठ्या प्रमाणावर रोपांची निर्मिती करून ती राज्याबाहेरही पाठवली जातात. फलोत्पादन केंद्रामध्ये पेरू, पपई आणि टिश्यू



कल्चरच्या आधुनिक पद्धतींचे प्रशिक्षण दिले जाते. पारंपरिक शेतीच्या तुलनेत या पद्धतींमुळे अनेक पट अधिक उत्पादन घेणे शक्य होत आहे.

दुग्धव्यवसाय आणि पशुसंवर्धन हे बारामतीच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे आधारस्तंभ बनले आहेत. आधुनिक डेअरी प्रकल्प, पशुखाद्य व्यवस्थापन आणि कुक्कुटपालनामुळे हजारो कुटुंबांना रोजगार मिळाला आहे. येथील दुग्धशाळा मोठ्या प्रमाणात दूध संकलन करत असून ग्रामीण भागातील आर्थिक चक्र अधिक मजबूत झाले आहे.

भविष्यातील शेतीचा विचार करता बारामतीमध्ये मातीविना शेती (Hydroponics) आणि एरोपोनिक्ससारखे प्रयोगही यशस्वीपणे राबवले जात आहेत. कमी जागेत आणि नियंत्रित वातावरणात पालेभाज्या व स्ट्रॉबेरीसारखी पिके घेतली जात आहेत. शहरांमध्ये वाढणाऱ्या जागेच्या समस्येवर हा एक प्रभावी पर्याय म्हणून पाहिला जात आहे. पुणे आणि मुंबईसारख्या शहरांमध्ये या तंत्रज्ञानाला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

त्याचबरोबर सेंद्रिय शेतीवरही विशेष भर दिला जात आहे. रासायनिक खतांचा अतिरेक टाळून वर्मीकम्पोस्ट, जीवामृत आणि नैसर्गिक खतांचा वापर केला जात आहे. सेंद्रिय गूळ, हळद आणि इतर उत्पादनांना बाजारपेठेत वाढती मागणी मिळत आहे. पर्यावरणाचे संतुलन राखत शाश्वत शेती कशी करावी, याचे उत्तम उदाहरण बारामतीने दाखवून दिले आहे.

बारामतीची आणखी एक महत्त्वाची जमेची बाजू म्हणजे येथे शेती आणि उद्योग यांचा साधलेला समन्वय. कृषी प्रक्रिया उद्योग, साखर कारखाने, फूड प्रोसेसिंग युनिट्स आणि निर्यात व्यवसायामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य बाजारपेठ मिळत आहे. शेतकरी आता केवळ उत्पादन करणारा न राहता प्रक्रिया, पॅकेजिंग आणि विक्री यामध्येही सक्रियपणे सहभागी होत आहे.

आज देशभरातील शेतकरी, संशोधक आणि विद्यार्थी बारामतीचा अभ्यास करण्यासाठी येथे भेट देतात. कारण बारामतीने सिद्ध करून दाखवले आहे की योग्य नियोजन, विज्ञानाची जोड आणि बदल स्वीकारण्याची तयारी असेल तर शेती हा तोट्याचा नव्हे, तर प्रगतीचा व्यवसाय ठरू शकतो.

थोडक्यात सांगायचे झाले तर, बारामतीमधील कृषी केंद्रे ही केवळ संस्था नसून आधुनिक शेतीची प्रयोगशाळाच आहेत. सौर पंप, मधमाशी पालन, मत्स्य व्यवसाय, IoT-आधारित संवेदक, ड्रोन तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा प्रभावी वापर करून बारामतीने ''स्मार्ट शेती''ची नवी दिशा दाखवली आहे. ग्रामीण भारताच्या भविष्यासाठी प्रेरणादायी ठरणारी ही कृषी क्रांती पुढील अनेक पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे.

बेंद्रे अथर्व
टी. वाय बी.बी.ए.(सी.ए.)





पुस्तक परीक्षण - 'श्रीमान योगी'

मराठी साहित्यामध्ये 'श्रीमान योगी' ही कादंबरी एक ऐतिहासिक आणि साहित्यिक मैलाचा दगड मानली जाते. शिवाजी महाराजांच्या जीवनातील संघर्ष, त्यांचे स्वप्न, त्यांची युद्धनीती आणि लोकाभिमुख प्रशासन यांचे प्रभावी चित्रण या कादंबरीत केले आहे. रणजित देसाई यांनी इतिहासाला साहित्यिक रूप देऊन वाचकांना प्रेरणा दिली आहे.

'श्रीमान योगी' ही रणजित देसाई यांची ऐतिहासिक कादंबरी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित आहे. मराठी साहित्यामध्ये ही कादंबरी एक महत्त्वपूर्ण स्थान मिळवते कारण ती केवळ इतिहास सांगत नाही तर वाचकाला प्रेरणा देते.

शिवाजी महाराजांचे बालपण, जिजामातेंचे संस्कार, स्वराज्य स्थापनेची प्रेरणा, आणि त्यांचा संघर्ष या सर्व गोष्टी लेखकाने अत्यंत प्रभावीपणे मांडल्या आहेत. बालपणी जिजामातेंनी दिलेले संस्कार, स्वराज्य स्थापनेची प्रेरणा, अफजलखानाचा वध, तोरणाचा विजय, आग्र्याहून सुटका, रायगडावर राज्याभिषेक आणि दक्षिण मोहिमा या घटनांमधून शिवाजी महाराजांचे धैर्य, बुद्धिमत्ता आणि राष्ट्रप्रेम स्पष्ट दिसते.

लेखकाने शिवाजी महाराजांना केवळ योद्धा म्हणून नव्हे तर एक दूरदर्शी राजकारणी, न्यायप्रिय राजा आणि जनतेचा खरा संरक्षक म्हणून दाखवले आहे. त्यामुळे वाचकाला इतिहासाचा प्रवास करताना राष्ट्रभक्तीची जाणीव होते. रणजित देसाई यांनी या कादंबरीत इतिहास आणि साहित्य यांचा सुंदर संगम साधला आहे.

भाषाशैली – पुस्तकाची भाषा ओघवती, प्रभावी आणि भावनाप्रधान आहे. संवादांमधून त्या काळातील वातावरण जिवंत होते.

चरित्रनिर्मिती: शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व ठळकपणे उभे राहते. जिजामाता, तानाजी, समर्थ रामदास, आणि इतर सहकारी यांची व्यक्तिरेखा प्रभावीपणे मांडली आहे.

इतिहास व कल्पनारंजन: लेखकाने इतिहासाची चौकट पाळूनही साहित्यिक रंगत आणण्यासाठी कल्पनारंजनाचा योग्य वापर केला आहे. त्यामुळे वाचकाला इतिहास आणि कादंबरी यांचा संगम अनुभवायला मिळतो.

प्रेरणादायीता: प्रत्येक प्रसंगातून वाचकाला नेतृत्वगुण, राष्ट्रप्रेम, धैर्य आणि चिकाटी यांचे धडे मिळतात.

या वैशिष्ट्यांमुळे 'श्रीमान योगी' ही कादंबरी केवळ ऐतिहासिक ग्रंथ न राहता एक साहित्यिक कलाकृती ठरते. वाचकाला केवळ माहिती मिळत नाही तर भावनिक अनुभवही मिळतो.

'श्रीमान योगी' हे पुस्तक आजच्या पिढीसाठीही मार्गदर्शक आहे. शिवाजी महाराजांचे जीवन वाचताना वाचकाला जाणवते की राष्ट्रनिर्मिती ही केवळ तलवारीच्या जोरावर होत नाही तर दूरदृष्टी, न्यायप्रियता आणि जनतेवरील प्रेम यांवरही आधारलेली असते.

या पुस्तकाचे महत्त्व असे की ते वाचकाला इतिहासाची जाणीव करून देते, साहित्यिक आनंद देते आणि त्याच वेळी प्रेरणा देते. मराठी साहित्याला मिळालेली ही अमूल्य देणगी आजही तितकीच प्रभावी आहे.

या पुस्तकाचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्यातील भाषा शैली. लेखकाने साधी, सरळ पण प्रभावी भाषा वापरली आहे. प्रसंगानुरूप अलंकारिक शब्दांचा वापर वाचकाच्या मनाला भिडतो. काही ठिकाणी संवाद शैलीचा उपयोग केल्यामुळे कथा अधिक जिवंत वाटते. त्यामुळे वाचक केवळ वाचक न राहता त्या घटनांचा साक्षीदार बनतो. शिवाजी महाराजांच्या प्रशासन व्यवस्थेचेही पुस्तकात सुंदर वर्णन केले आहे. त्यांच्या न्यायप्रियतेचा, धर्मनिरपेक्षतेचा आणि प्रजेसाठी असलेल्या कळकळीचा उल्लेख वाचकाला आदर्श नेतृत्वाची ओळख करून देतो. स्त्रियांचा सन्मान राखण्याचा त्यांचा दृष्टिकोन आणि शत्रूप्रतीही दाखवलेली उदारता ही त्यांच्या महानतेची साक्ष देतात.

पुस्तकाचा शेवट महाराजांच्या राज्याभिषेक आणि त्यांच्या कार्याच्या परिणामांवर प्रकाश टाकतो. स्वराज्य स्थापनेमागील त्यांची जिद्द आणि चिकाटी वाचकाला प्रेरणा देते. तसेच त्यांच्या कार्यामुळे मराठी जनतेमध्ये निर्माण झालेला आत्मविश्वास आणि अभिमान यांचेही प्रभावी चित्रण केले आहे.

थोडक्यात सांगायचे झाले तर हे पुस्तक केवळ ऐतिहासिक माहिती देणारे नसून प्रेरणादायी आहे. विद्यार्थ्यांसाठी, इतिहासप्रेमींसाठी आणि प्रत्येक भारतीयासाठी हे पुस्तक वाचणे आवश्यक आहे. हे पुस्तक वाचल्यानंतर शिवाजी महाराजांविषयीचा आदर अधिक दृढ होतो आणि त्यांच्या आदर्शांचे अनुकरण करण्याची प्रेरणा मिळते. अशा प्रकारे, उत्कृष्ट मांडणी, प्रभावी भाषा आणि सखोल आशय यांमुळे हे पुस्तक एक उत्तम ऐतिहासिक साहित्य ठरते.

आदित्य गायकवाड – टी. वाय. बी. कॉम

लेखक :– रणजीत देसाई

प्रकाशक:– मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे



सायबर सुरक्षा


सायबर सुरक्षा म्हणजे डिजिटल जगात आपल्या माहितीचे आणि उपकरणांचे संरक्षण होय. आजच्या काळात इंटरनेटचा वापर प्रत्येक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे वैयक्तिक, शैक्षणिक आणि आर्थिक माहिती ऑनलाईन साठवली जाते. त्यामुळे या माहितीचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक झाले आहे. सायबर सुरक्षेमुळे हॅकिंग, फसवणूक आणि डेटा चोरी यांसारख्या धोक्यांपासून बचाव करता येते. अनेक वेळा फिशिंग, मालवेअर किवा बनावट लिंकच्या माध्यमातून लोकांची गोपनीय माहिती चोरली जाते. ज्यामुळे आर्थिक आणि मानसिक नुकसान होऊ शकते.

सायबर सुरक्षा फक्त तंत्रज्ञानापुरती मर्यादित नसून ती प्रत्येक इंटरनेट वापरणाऱ्या व्यक्तीसाठी महत्त्वाची आहे. मजबूत पासवर्ड ठेवणे, अनोळखी लिंकवर क्लिक न करणे, नियमित सॉफ्टवेअर अपडेट करणे आणि ओटीपी किंवा वैयक्तिक माहिती कुणालाही न सांगणे या साध्या सवयी आपल्याला सुरक्षित ठेवू शकतात. विशेषतः विद्यार्थ्यांनी सोशल मीडियावर माहिती शेअर करताना अधिक काळजी घेणे गरजेचे आहे, कारण लहान चुका देखील मोठ्या समस्यांना कारणीभूत ठरू शकतात. आजच्या डिजिटल युगात सायबर गुन्हेगारी झपाट्याने वाढत आहे, त्यामुळे सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे अत्यंत गरजेचे आहे. सरकार आणि विविध संस्था लोकांना सुरक्षित इंटरनेट वापराबाबत मार्गदर्शन करत आहेत, तरीसुद्धा प्रत्येकाने स्वतः जबाबदारीने वागणे आवश्यक आहे. योग्य ज्ञान आणि सतर्कता यांच्या मदतीने आपण सायबर धोक्यांपासून स्वतःचे संरक्षण करू शकतो. सायबर सुरक्षा ही केवळ गरज नसून ती आजच्या काळातील एक महत्त्वाची सवय बनली आहे.

सायबर सुरक्षेत ethical hacking ही संकल्पना खूप महत्त्वाची आहे. Ethical hackers हे कायदेशीर पद्धतीने सिस्टममधील त्रुटी शोधून त्या सुधारण्यासाठी मदत करतात. त्यामुळे कंपन्या आपल्या सिस्टम अधिक सुरक्षित बनवू शकतात. शेवटी, सायबर सुरक्षा ही एक सतत शिकण्याची प्रक्रिया आहे. नवीन तंत्रज्ञानासोबत नवीन धोकेही येतात, त्यामुळे सतर्क राहणे, अपडेटेड राहणे आणि सुरक्षित सवयी अंगीकारणे हेच सर्वात मोठे संरक्षण आहे.

'डिजिटल जगात सुरक्षित राहण्यासाठी माहिती आणि जागरूकता हाच सर्वात मोठा शस्त्र आहे.'

अपेक्षा सचिन झावरे
बी.बी.ए. (सी.ए)





सीए, सीएस, सीएम केंद्रातील यशस्वी विद्यार्थ्यांचा प्रवास

आजचा काळ हा प्रचंड स्पर्धेचा आहे. प्रत्येक क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी केवळ पारंपरिक शिक्षण पुरेसे राहिलेले नाही. विद्यार्थ्यांनी स्वतःमध्ये कौशल्य, व्यावसायिकता आणि तांत्रिक ज्ञान विकसित करणे अत्यंत गरजेचे झाले आहे. अशा परिस्थितीत चार्टर्ड अकाउंटंट (CA), कंपनी सेक्रेटरी (CS) आणि कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटंट (CMA/CM) यांसारखे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी ठरत आहेत. हे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना केवळ नोकरी मिळवून देत नाहीत, तर त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याची ताकद देतात.

महाविद्यालयांनीही या बदलत्या गरजांचा वेध घेत विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन केंद्रे स्थापन केली आहेत. या केंद्रांमुळे विद्यार्थ्यांना योग्य दिशादर्शन, अभ्यासाचे नियोजन आणि आवश्यक संसाधने सहज उपलब्ध होतात. परिणामी, अनेक विद्यार्थी या क्षेत्रात उत्तुंग यश मिळवत आहेत. या लेखात अशाच विद्यार्थ्यांच्या यशस्वी प्रवासाचा आणि त्या मागील केंद्रांच्या योगदानाचा सविस्तर आढावा घेतला आहे.

सीए, सीएस, सीएम अभ्यासक्रमांचे महत्त्व :–

CA, CS आणि CM हे अभ्यासक्रम केवळ शैक्षणिक पात्रतेपुरते मर्यादित नसून ते व्यक्तिमत्त्व विकासाचे एक प्रभावी साधन आहेत. या अभ्यासक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक विश्लेषण करण्याची क्षमता, कायद्याचे सखोल ज्ञान, करप्रणालीची समज आणि व्यवस्थापन कौशल्य विकसित होते.

उदाहरणार्थ, एक चार्टर्ड अकाउंटंट कंपनीच्या आर्थिक आरोग्याची जबाबदारी सांभाळतो, तर कंपनी सेक्रेटरी कंपनीच्या कायदेशीर बाबी व्यवस्थित पार पाडतो. कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटंट उत्पादन खर्च आणि व्यवस्थापन निर्णयांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतो. या तिन्ही क्षेत्रांमध्ये प्रचंड संधी उपलब्ध आहेत.

याशिवाय, या अभ्यासक्रमांमुळे विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर काम करण्याची संधी मिळते. अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये या व्यावसायिकांची मागणी मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे या अभ्यासक्रमांचे महत्त्व केवळ भारतापुरते मर्यादित नसून जागतिक पातळीवरही आहे.

महाविद्यालयातील केंद्रांची भूमिका :–

महाविद्यालयांमध्ये स्थापन करण्यात आलेली CA, CS, CM मार्गदर्शन केंद्रे विद्यार्थ्यांसाठी एक मजबूत आधारस्तंभ ठरतात. ही केंद्रे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करतात.

तज्ज्ञ प्राध्यापकांकडून मिळणारे मार्गदर्शन हे या केंद्रांचे सर्वात मोठे बलस्थान आहे. अनुभवी शिक्षक विद्यार्थ्यांना कठीण विषय सोप्या पद्धतीने समजावून सांगतात. याशिवाय नियमित व्याख्याने आणि कार्यशाळा आयोजित करून विद्यार्थ्यांना अद्ययावत माहिती दिली जाते.

अभ्यास साहित्य आणि संदर्भ पुस्तके उपलब्ध करून दिल्यामुळे विद्यार्थ्यांचा अभ्यास अधिक सुलभ होतो. मॉक टेस्ट आणि परीक्षा सरावामुळे विद्यार्थ्यांना वास्तविक परीक्षेचा अनुभव मिळतो, ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो.

करिअर काउन्सेलिंगच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडी आणि क्षमतेनुसार योग्य दिशा निवडण्यास मदत केली जाते. त्यामुळे विद्यार्थी अधिक सजगपणे आपले ध्येय निश्चित करू शकतात.

यशस्वी विद्यार्थ्यांची वैशिष्ट्ये :–

या केंद्रांमधून घडलेले विद्यार्थी काही विशेष गुणांनी युक्त असतात. त्यांच्या यशामागे केवळ बुद्धिमत्ता नसून त्यांची मेहनत, शिस्त आणि चिकाटी महत्त्वाची असते.

शिस्त आणि सातत्य हे त्यांच्या यशाचे मुख्य आधार असतात. ते नियमित अभ्यास करतात आणि वेळेचे योग्य नियोजन करतात. स्वतःवरील विश्वास हा त्यांचा सर्वात मोठा साथीदार असतो. कितीही कठीण परिस्थिती आली तरी ते हार मानत नाहीत.

योग्य मार्गदर्शनाचा लाभ घेणे हेही त्यांचे एक वैशिष्ट्य आहे. ते शिक्षकांचा सल्ला घेतात आणि त्यानुसार आपली रणनीती ठरवतात. अपयश आले तरी त्यातून शिकण्याची त्यांची तयारी



असते.

कष्ट आणि चिकाटी यांच्या जोरावर ते केवळ परीक्षा उत्तीर्ण होत नाहीत, तर उत्कृष्ट गुणांसह यश संपादन करतात.

महाविद्यालयाच्या यशामध्ये विद्यार्थ्यांचा वाटा :–

विद्यार्थ्यांचे यश हे महाविद्यालयाच्या प्रगतीचे प्रतिबिंब असते. जेव्हा एखादा विद्यार्थी CA, CS किंवा CMA सारख्या कठीण परीक्षांमध्ये उत्तीर्ण होतो, तेव्हा तो केवळ स्वतःचेच नव्हे तर महाविद्यालयाचेही नाव उज्ज्वल करतो.

अशा विद्यार्थ्यांमुळे महाविद्यालयाची प्रतिष्ठा वाढते. नवीन विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते आणि तेही अशाच यशाचा ध्यास घेतात. यामुळे महाविद्यालयात सकारात्मक वातावरण निर्माण होते.

यशस्वी विद्यार्थी हे महाविद्यालयाचे ब्रँड ॲम्बेसेडर बनतात. त्यांच्या यशोगाथा ऐकून इतर विद्यार्थ्यांमध्ये उत्साह निर्माण होतो. त्यामुळे महाविद्यालयाची गुणवत्ता आणि विश्वासार्हता अधिक बळकट होते.

आमच्या महाविद्यालयातील CA/CS/CMA परीक्षामध्ये यश संपादन केलेले माजी विद्यार्थी/विद्यार्थीनी :–

वर्ष	विद्यार्थ्याचे नाव	कोर्स
२०२२–२३	तनवीर राजू मोमीन	सी.ए.
२०२५–२६	राहुल अशोक गाढे	सी.ए.
२०२५–२६	कुणाल रामभाऊ शिंदे	सी.ए.
२०२५–२६	ऋतुजा विजय काळे	सी.एस.
२०२५–२६	युवराज राहुल कोठारी	सी.ए.

अडचणी आणि त्यावरील उपाय :–

या अभ्यासक्रमांमध्ये यश मिळवताना विद्यार्थ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. अभ्यासाचा प्रचंड आवाका ही त्यातील सर्वात मोठी अडचण आहे. विषयांची सखोल समज आवश्यक असल्यामुळे विद्यार्थ्यांना अधिक मेहनत घ्यावी लागते.

वेळेचे व्यवस्थापन हेही एक मोठे आव्हान असते. कॉलेजचे शिक्षण आणि व्यावसायिक अभ्यासक्रम यांचा समतोल राखणे सोपे नसते. याशिवाय मानसिक ताणही विद्यार्थ्यांना जाणवतो.

या समस्यांवर मात करण्यासाठी मार्गदर्शन केंद्रे विविध उपक्रम राबवतात. समुपदेशन सत्रांद्वारे विद्यार्थ्यांना मानसिक आधार दिला जातो. वेळ व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देऊन त्यांना अभ्यासाचे नियोजन शिकवले जाते. प्रेरणादायी सत्रांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो.

याशिवाय, गटचर्चा आणि सहअभ्यासाच्या माध्यमातून विद्यार्थी एकमेकांना मदत करतात. त्यामुळे त्यांचा अभ्यास अधिक प्रभावी होतो.

विद्यार्थ्यांच्या प्रवासातील वास्तव अनुभव :–

सीए, सीएस आणि सीएम या अभ्यासक्रमांचा प्रवास हा केवळ पुस्तकांपुरता मर्यादित नसतो, तर तो एक मानसिक, भावनिक आणि बौद्धिक संघर्ष असतो. अनेक विद्यार्थी सुरुवातीला या अभ्यासक्रमांच्या कठीणतेमुळे घाबरतात. काही वेळा पहिल्याच प्रयत्नात अपयश येते, ज्यामुळे आत्मविश्वास ढासळतो. पण अशा वेळी मार्गदर्शन केंद्रांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते.

उदाहरणार्थ, काही विद्यार्थी ग्रामीण भागातून आलेले असतात, ज्यांना इंग्रजी भाषेचे किंवा तांत्रिक संकल्पनांचे मर्यादित ज्ञान असते. अशा विद्यार्थ्यांना केंद्रामार्फत अतिरिक्त मार्गदर्शन दिले जाते. शिक्षक त्यांच्याशी वैयक्तिक पातळीवर संवाद साधतात आणि त्यांच्या अडचणी समजून घेतात. हळूहळू हे विद्यार्थीही आत्मविश्वासाने पुढे जातात आणि यश मिळवतात.

हा प्रवास विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासातच नव्हे, तर आयुष्यातही मजबूत बनवतो. ते संयम, निर्णयक्षमता आणि संकटांना सामोरे जाण्याची ताकद शिकतात.

तंत्रज्ञानाचा वापर आणि आधुनिक शिक्षण पद्धती :–

आजच्या डिजिटल युगात शिक्षणाची पद्धतही मोठ्या प्रमाणात बदलली आहे. CA, CS आणि CM मार्गदर्शन केंद्रे देखील तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत आहेत. ऑनलाइन लेक्चर्स, रेकॉर्डेड व्हिडिओ, ई–नोट्स आणि डिजिटल टेस्ट सिरीज यामुळे विद्यार्थ्यांना कुठूनही आणि कधीही अभ्यास करता येतो.



विशेषतः कोविड–१९ नंतर ऑनलाइन शिक्षणाला मोठी चालना मिळाली आहे. विद्यार्थ्यांना घरबसल्या गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळू लागले आहे. यामुळे वेळ आणि प्रवासाचा खर्च वाचतो, तसेच अभ्यास अधिक लवचिक बनतो.

तसेच, विविध मोबाईल ॲप्स आणि पोर्टल्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रगतीचा आढावा घेता येतो. त्यामुळे ते आपल्या कमकुवत बाजूंवर अधिक लक्ष केंद्रित करू शकतात.

पालक आणि शिक्षक यांची भूमिका :–

विद्यार्थ्यांच्या यशामध्ये पालक आणि शिक्षक यांची भूमिका अनन्यसाधारण असते. पालकांनी विद्यार्थ्यांना केवळ गुणांसाठी दबाव न टाकता त्यांना समजून घेणे गरजेचे आहे. त्यांच्या भावना, ताण आणि अपेक्षा यांचा विचार करून त्यांना योग्य पाठबळ देणे आवश्यक आहे.

शिक्षक हे विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक असतात. ते केवळ विषय शिकवत नाहीत, तर विद्यार्थ्यांना योग्य दिशा दाखवतात. अनेक वेळा शिक्षकच विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान ठरतात. त्यांच्या अनुभवातून आणि मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना योग्य निर्णय घेण्यास मदत होते.

जेव्हा पालक आणि शिक्षक दोघेही एकत्रितपणे विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहतात, तेव्हा विद्यार्थ्यांचे यश अधिक निश्चित होते.

प्रेरणादायी यशोगाथा :–

महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून यश मिळवले आहे. काही विद्यार्थ्यांनी आर्थिक अडचणींवर मात करत पार्ट–टाईम नोकरी करत अभ्यास पूर्ण केला. काहींनी अपयशानंतर पुन्हा प्रयत्न करून उत्कृष्ट यश संपादन केले.

अशा यशोगाथा इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरतात. 'जर ते करू शकतात, तर आपणही करू शकतो' हा आत्मविश्वास निर्माण होतो.

महाविद्यालयांनी अशा विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना प्रोत्साहन दिल्यास इतर विद्यार्थ्यांमध्येही सकारात्मक ऊर्जा निर्माण होते.

भविष्यातील संधी आणि करिअरच्या दिशा :–

CA, CS आणि CMA या क्षेत्रांमध्ये भविष्यात प्रचंड संधी उपलब्ध आहेत. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे आणि जागतिकीकरणामुळे या व्यावसायिकांची मागणी सातत्याने वाढत आहे.विद्यार्थ्यांना केवळ नोकरीपुरते मर्यादित न राहता स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची संधीही मिळते. ते कन्सल्टन्सी सेवा देऊ शकतात, स्टार्टअप्सना मार्गदर्शन करू शकतात किंवा स्वतंत्र प्रॅक्टिस सुरू करू शकतात.

तसेच, सरकारी आणि खाजगी क्षेत्रात उच्च पदांवर काम करण्याची संधी उपलब्ध असते. त्यामुळे या अभ्यासक्रमांचे महत्त्व भविष्यात आणखी वाढणार आहे.

शेवटी असे म्हणता येईल की, CA, CS आणि CMA मार्गदर्शन केंद्रे ही विद्यार्थ्यांच्या जीवनातील एक परिवर्तन घडवणारी शक्ती आहे. ही केंद्रे विद्यार्थ्यांना केवळ शिक्षण देत नाहीत, तर त्यांना जीवन जगण्याची नवी दृष्टी देतात.

विद्यार्थ्यांनीही या संधीचा योग्य उपयोग करून स्वतःचे ध्येय निश्चित करावे आणि त्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करावे. यशाचा मार्ग सोपा नसतो, पण योग्य मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांच्या जोरावर तो नक्कीच गाठता येतो.

अशा प्रकारे महाविद्यालय, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांचे संयुक्त प्रयत्नच यशाची खरी गुरुकिल्ली ठरतात.

एकूणच पाहता, CA, CS आणि CMA मार्गदर्शन केंद्रे ही विद्यार्थ्यांच्या यशामागील एक महत्त्वाची कडी आहे. योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर विद्यार्थी मोठ्या प्रमाणात यश मिळवू शकतात.

या केंद्रांमुळे विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक मदत मिळत नाही, तर त्यांचा आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्वही विकसित होते. त्यामुळे ते भविष्यातील आव्हानांना समर्थपणे सामोरे जाऊ शकतात.

महाविद्यालयांनी अशा केंद्रांची संख्या वाढवून अधिकाधिक विद्यार्थ्यांना या संधीचा लाभ मिळवून द्यावा. यामुळे केवळ विद्यार्थ्यांचेच नव्हे, तर संपूर्ण समाजाचे भविष्य उज्ज्वल होईल.

राहुल अशोक गाढे
चार्टर्ड अकाउंटंट



सुधा मूर्ती - CSR मधील संवेदनशीलता, साधेपणा आणि समाजसेवेची दिशा



कधी कधी एखाद्या व्यक्तीचे मोठेपण तिच्या पदावरून किंवा संपत्तीवरून नाही, तर तिच्या साधेपणातून आणि समाजासाठी केलेल्या कार्यातून ओळखले जाते. सुधा मूर्ती हे असेच एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या नावाशी कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी म्हणजेच CSR जोडले जाते, पण त्यांच्या कार्याकडे पाहिले की लक्षात येते. त्यांच्या दृष्टीने समाजसेवा ही केवळ कर्तव्य नसून ती एक जीवनशैली आहे. कर्नाटकातील एका साध्या कुटुंबात जन्मलेल्या सुधा मूर्ती यांनी लहानपणापासूनच शिक्षणाचे महत्त्व ओळखले. त्या अत्यंत हुशार विद्यार्थिनी होत्या आणि अभियांत्रिकी क्षेत्रात त्यांनी आपले वेगळे स्थान निर्माण केले. त्या काळात मुलींनी अभियांत्रिकी शिक्षण घेणे हे फारसे सामान्य नव्हते, पण त्यांनी आपल्या जिद्दीने आणि आत्मविश्वासाने हा मार्ग निवडला. त्यांच्या आयुष्यातील एक प्रसंग विशेष उल्लेखनीय आहे त्यांनी एका मोठ्या कंपनीला पत्र लिहून महिलांनाही नोकरीची संधी द्यावी, अशी मागणी केली होती. त्या काळात ही गोष्ट धाडसी मानली जात होती, पण याच घटनेतून त्यांच्या विचारांची स्पष्टता आणि धैर्य दिसून येते.

पुढे त्यांचा संबंध 'इन्फोसिस' (Infosys) या नामांकित कंपनीशी आला. त्यांचे पती एन. आर. नारायण मूर्ती यांनी ही कंपनी उभी केली, आणि या प्रवासात सुधा मूर्ती यांनीही महत्त्वाची भूमिका बजावली. मात्र त्यांनी स्वतःला केवळ उद्योगविश्वापुरते मर्यादित ठेवले नाही. समाजासाठी काहीतरी करण्याची त्यांची आतली प्रेरणा त्यांना एका वेगळ्याच मार्गावर घेऊन गेली. याच विचारातून 'इन्फोसिस फाउंडेशन'ची स्थापना झाली आणि त्यांनी या फाउंडेशनच्या माध्यमातून समाजसेवेचे व्यापक कार्य सुरू केले. त्यांच्या कामाची खासियत म्हणजे त्यात कोणताही दिखावा नाही. त्या प्रत्यक्ष गावांमध्ये जाऊन परिस्थिती समजून घेतात, लोकांशी संवाद साधतात आणि मगच मदतीचे स्वरूप ठरवतात. त्यामुळे त्यांच्या कामात वास्तवतेची आणि संवेदनशीलतेची छाप स्पष्टपणे दिसून येते.

CSR म्हणजे अनेक वेळा कंपन्यांसाठी एक औपचारिक जबाबदारी असते. वार्षिक अहवालात दाखवण्यासाठी काही प्रकल्प राबवले जातात आणि त्यावर मोठ्या प्रमाणात चर्चा केली जाते. पण सुधा मूर्ती यांच्या कार्यातून CSR कडे पाहण्याचा एक वेगळाच दृष्टिकोन समोर येतो. त्यांच्या मते CSR म्हणजे केवळ निधी खर्च करणे नाही, तर माणसांच्या जीवनात सकारात्मक आणि टिकाऊ बदल घडवणे होय. त्यांनी हजारो शाळांना मदत केली, वाचनालये उभी केली, आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. ग्रामीण भागात त्यांच्या कार्याचा विशेष प्रभाव दिसून येतो. अनेक गावांमध्ये त्यांनी शाळा, वसतिगृहे, रुग्णालये आणि पायाभूत सुविधा उभारण्यासाठी मदत केली. पूर, दुष्काळ किंवा इतर आपत्तीच्या काळात त्यांनी तातडीची मदत पुरवली, पण त्याचबरोबर दीर्घकालीन पुनर्वसनावरही भर दिला. उदाहरणार्थ, २०१८ मध्ये केरळमध्ये आलेल्या भीषण पुराच्या वेळी Infosys Foundation च्या माध्यमातून त्यांनी मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत, अन्नधान्य आणि आवश्यक साहित्य उपलब्ध करून दिले. त्याचप्रमाणे कर्नाटक आणि महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागांमध्ये त्यांनी पाणीपुरवठा, शाळा आणि मूलभूत सुविधा उभारण्यासाठी मदत केली. विशेषतः महाराष्ट्रातील मराठवाडा परिसरात वारंवार उद्भवणाऱ्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर काही गावांमध्ये पिण्याच्या पाण्याच्या टाक्या,



शाळांची दुरुस्ती आणि शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यास त्यांनी हातभार लावला. कोविड–१९ महामारीच्या काळातही त्यांनी रुग्णालयांना वैद्यकीय साहित्य, ऑक्सिजन सुविधा आणि गरजू लोकांना अन्नधान्य उपलब्ध करून देण्यासाठी महत्त्वाचे योगदान दिले. त्यामुळे त्यांच्या कामाचा परिणाम केवळ तात्पुरता राहत नाही, तर तो दीर्घकाळ टिकणारा ठरतो.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांचा साधेपणा. मोठ्या पदावर असूनही त्यांच्या जीवनशैलीत कोणताही दिखावा दिसत नाही. त्या अत्यंत साध्या पद्धतीने राहतात, साधे कपडे घालतात आणि सामान्य लोकांशी सहज संवाद साधतात. त्यांच्या बोलण्यातही एक आपुलकी आणि प्रामाणिकपणा जाणवतो. त्यामुळे लोक त्यांच्याशी सहज जोडले जातात आणि त्यांच्या कामावर विश्वास ठेवतात. सुधा मूर्ती या केवळ समाजसेविका नाहीत, तर त्या एक उत्तम लेखिका देखील आहेत. त्यांच्या लेखनात जीवनातील साधेपणा, मानवी नाती आणि मूल्यांचे महत्त्व अत्यंत सुंदरपणे मांडलेले असते. त्यांच्या "Wise and Otherwise', "The Day I Stopped Drinking Milk', "Three Thousand Stitches' आणि "Grandma's Bag of Stories' यांसारख्या पुस्तकांमधून त्यांनी जीवनातील साध्या पण अर्थपूर्ण अनुभवांची मांडणी केली आहे. त्यामुळे त्यांची पुस्तके वाचकांना केवळ माहिती देत नाहीत, तर विचार करायलाही भाग पाडतात.

आज अनेक कंपन्या CSR उपक्रम राबवत आहेत, पण त्यात जर संवेदनशीलता, प्रामाणिकपणा आणि प्रत्यक्ष सहभाग नसेल, तर त्या उपक्रमांचा प्रभाव मर्यादित राहतो. सुधा मूर्ती यांनी दाखवून दिले की, CSR हा केवळ कायदेशीर बंधन नसून तो समाजाशी जोडलेली एक जबाबदारी आहे. त्यांच्या कार्यातून विद्यार्थ्यांना एक महत्त्वाचा संदेश मिळतो– यश मिळाल्यानंतर समाजाला परत देणे हे तितकेच आवश्यक आहे. केवळ स्वत:साठी जगणे पुरेसे नाही, तर इतरांच्या जीवनातही काहीतरी सकारात्मक बदल घडवणे ही खरी समाधानाची गोष्ट आहे.ङ्घ त्यांच्या विचारांची साधी पण प्रभावी दिशा अशी आहे – जे शक्य आहे ते करा, पण मनापासून करा. हीच त्यांची खरी ताकद आहे.

सुधा मूर्ती यांचे जीवन आपल्याला शिकवते की संपत्तीपेक्षा संवेदनशीलता मोठी असते, आणि यशापेक्षा समाजासाठी केलेले योगदान अधिक महत्त्वाचे असते. त्यांच्या कार्यातून CSR या संकल्पनेला एक मानवी चेहरा मिळाला आहे. आजच्या तरुण पिढीसाठी त्या एक प्रेरणास्थान आहेत. त्यांच्या कार्यातून आपल्याला हे स्पष्टपणे समजते की CSR म्हणजे केवळ जबाबदारी नाही, तर समाजाशी जोडलेली आपली नाळ आहे आणि ती जपणे हीच खरी प्रगती आहे.

कु. आव्हाड प्रतीक्षा
टी. वाय. बी.बी.ए. (सी.ए.) विभाग

''आपण गरीबी हटवू शकतो,
पण माणसाची वृत्तीच
जर लोभी असेल, तर ती
कशी काय घालवणार आपण ?''

– सुधा मूर्ती



कमवा व शिका



स्वच्छ भारत अभियाना : स्वच्छता पंधरवड्याचा एक उपक्रम
बी.बी.ए. (सी.ए.) चे विद्यार्थी स्वच्छता करताना.



स्वच्छ भारत अभियाना : स्वच्छता पंधरवड्याचा एक उपक्रम
बी.बी.ए. (सी.ए.) चे विद्यार्थी स्वच्छता करताना.



स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत भारत सरकारने सुरु केलेल्या
स्वच्छता पंधरवड्याचा एक उपक्रम बी.बी.ए. (सी.ए.) चे
विद्यार्थी स्वच्छता करताना.



कमवा व शिका विद्यार्थी काम करताना



कमवा व शिका विद्यार्थी काम करताना



कमवा व शिका विभागाचे संमेलन



कॉमर्स असोसिएशन



कॉमर्समध्ये करिअरच्या संधी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. अनिल पाटील साहेब



मान. प्रतापराव पवार साहेब यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या यशस्वी उद्योजक या विषयावरील चर्चासत्र



एमबीए एंट्रन्स मार्गदर्शन कार्यशाळेत मार्गदर्शन करताना मा. प्राचार्य



प्राध्यापक चंद्रात्रे योगीराज एमबीए एंट्रन्स एक्झाम मार्गदर्शन करताना



कॉमर्स असोसिएशन अंतर्गत सार्वमत बिझनेस एक्सपो भेट



फुड फेस्टिवलला भेट देताना मान. प्राचार्य

वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ २०२५-२६



-



-



-



-



-



-

वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ २०२५-२६



-



-



-



-



-



-

बी.बी.ए. (सी.ए.) उपक्रम



चक्कड-उएढ परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना
श्री. योगीराज चंद्रात्रे



आर.बी.आय. स्थापना दिनानिमित्त अतिथी व्याख्यान –
मार्गदर्शन करताना प्रा. सचिन कुलकर्णी



आर.बी.आय. स्थापना दिनानिमित्त अतिथी व्याख्यान –
मार्गदर्शन करताना श्री. योगीराज चंद्रात्रे



बी.बी.ए. (सी.ए.) इंडक्शन प्रोग्राममध्ये मार्गदर्शन करताना
प्रा. अजय गायकवाड



बी.बी.ए. (सी.ए.) इंडक्शन प्रोग्राममध्ये मार्गदर्शन करताना
सौ. तृप्ती कोरडे-हारदे मॅडम



सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त आयोजित राष्ट्रीय एकता
दिवस कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्रा.डॉ. संजय कांबळे साहेब



रयत स्पर्धा परीक्षा केंद्र उद्घाटन



रयत स्पर्धा परीक्षा केंद्राचे उद्घाटन करताना मान्यवर



रयत स्पर्धा परीक्षा केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी मान्यवर



रयत स्पर्धा परीक्षा केंद्रास मान्यवरांची सदिच्छा भेट



रयत स्पर्धा परीक्षा केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवरांसमवेत मा. प्राचार्य व प्राध्यापक वृंद



मा. सुशील रगडे, माजी प्रबंधक, भारतीय रिझर्व बँक यांच्या समवेत आयबीपीएस मार्गदर्शनासाठी सामंजस्य करार



रयत स्पर्धा परीक्षा केंद्रातील १६ तास अखंड वाचन उपक्रमाचे उद्घाटन करताना मा. प्राचार्य डॉ. संजय कांबळे



विद्यार्थिनी मंच



सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्ताने आदरणीय मीनाताई जगधने मार्गदर्शन करताना



सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्ताने प्रमुख पाहुणे मा. शिल्पा साने व मा. शुभांगी भुजबळ मार्गदर्शन करताना



मुक्त संवाद कार्यक्रमात मा. प्राचार्य डॉ. संजय कांबळे मार्गदर्शन करताना



स्टुडन्ट इंडक्शन कार्यक्रमात मा. प्राचार्य डॉ. संजय कांबळे यांच्या हस्ते विद्यार्थिनीचा सत्कार करताना



महाविद्यालयात कराटे प्रशिक्षद घेताना विद्यार्थिनी



महाविद्यालयात कराटे प्रशिक्षण घेताना विद्यार्थिनी



विद्यार्थिनी मंच



वडाळा येथे स्त्री सुरक्षाॲपची माहिती देताना विद्यार्थिनी व शिक्षिका



वडाळा येथे स्त्री सुरक्षाॲपची माहिती देताना विद्यार्थिनी व शिक्षिका



बारामती येथे स्वयंसिध्दा संमेलनात सहभागी विद्यार्थिनी



बारामती येथे स्वयंसिध्दा संमेलनात माझे महाविद्यालय उत्कृष्ट कामगिरी सादरीकरण करताना



निर्भय कन्या अभियान कार्यक्रमात प्रमुख पाहुणे मार्गदर्शन करताना



आंतरराष्ट्रीय महिला दिन निमित्ताने प्रमुख पाहुणे मार्गदर्शन करताना



संशोधन विभाग



अविष्कार स्पर्धा



उद्योजकता या विषयावर मार्गदर्शन करताना
मा. सुजित दादा जगधने



एम.कॉम. संशोधन अहवाल विषयावर मार्गदर्शन करताना मान्यवर



संशोधन पध्दतीशास्त्र विषयावरील कार्यशाळेमध्ये सहभागी मान्यवर



राष्ट्रीय पातळीवरील चर्चासत्रामध्ये संशोधन पुस्तिकेचे अनावरण
करताना मान्यवर



राष्ट्रीय पातळीवरील चर्चासत्रामध्ये मार्गदर्शन करताना
मान्यवर अतिथी



कॉमर्स फेस्टिवल



इंडियन कल्चरल डे साजरा करताना महाविद्यालयीन विद्यार्थी



ट्रेडिशनल डे मध्ये सहभागी विद्यार्थी समवेत प्राध्यापक वृंद



ट्रेडिशनल डे मध्ये सहभागी विद्यार्थी



कॉर्पोरेट डे साजरा करताना महाविद्यालयीन विद्यार्थी



ब्लॅक अॅण्ड व्हाईट डे मध्ये सहभागी विद्यार्थी व शिक्षक



सिम्नेचर डे मध्ये सहभागी विद्यार्थी व शिक्षक

छत्रपती शिवाजी महाराज जयंती



छत्रपती शिवाजी महाराजांना वंदन करताना मान्यवर



छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त आयोजित ग्रंथ प्रदर्शन बधताना उपस्थित मान्यवर



शिवजयंतीच्या सोहळ्यात शिवगर्जना करताना महाविद्यालयीन विद्यार्थिनी समवेत प्राचार्य व शिक्षक



छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांचा सत्कार सोहळा



छत्रपती शिवाजी महारज जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मान्यवर



छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त अयोजित ग्रंथ प्रदर्शन उद्घाटन करताना मा. मीनाताई जगधने समवेत सर्व प्राध्यापक वृंद

महात्मा फुले व आंबेडकर जयंती



महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आयोजित पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन करताना मान्यवर



महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आयोजित पुस्तक प्रदर्शन बघताना मान्यवर



महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त प्रतिमा पूजन करताना मान्यवर



महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त कार्यक्रमात उपस्थित मान्यवर व मा. प्राचार्य



महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात मान्यवरांचा सत्कार करताना प्राचार्य



महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात उदबोधन करताना मान्यवर



कर्मवीर भाऊराव पाटील वक्तृत्व स्पर्धा



राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन कर्मवीर वक्तृत्व स्पर्धेमध्ये
मा. मीनाताई जगधने मार्गदर्शन करताना



राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन कर्मवीर वक्तृत्व स्पर्धेमध्ये
मा.डॉ. अनिल पाटील साहेब मार्गदर्शन करताना



राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन कर्मवीर वक्तृत्व स्पर्धेमध्ये
महाविद्यालयाचे मा.प्राचार्य मार्गदर्शन करताना



राज्यस्तरीय कर्मवीर वक्तृत्व स्पर्धेमध्ये सहभागी विद्यार्थी



राज्यस्तरीय कर्मवीर आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेमध्ये
स्पर्धक बोलताना



राज्यस्तरीय कर्मवीर वक्तृत्व स्पर्धेमधील प्रथम विजेते स्पर्धक
करंडक स्वीकारताना

राष्ट्रीय सेवा योजना विविध उपक्रम



संविधानाचा अमृत महोत्सव या निमित्त पथनाट्य सादर करताना विद्यार्थी



संविधानाचा अमृत महोत्सव या निमित्त जनजागृती रॅली



संविधानाचा अमृत महोत्सव या निमित्त पथनाट्य सादर करताना विद्यार्थी



२६ जानेवारी २०२६ ग्रामपंचायत वडाळामहादेव या ठिकाणी
पथनाट्य सादर करताना विद्यार्थी



२६ जानेवारी २०२६ ग्रामपंचायत वडाळामहादेव या ठिकाणी
पथनाट्य सादर करताना विद्यार्थी



राष्ट्रीय सेवा योजना उद्घाटन समारंभ



राष्ट्रीय सेवा योजना विविध उपक्रम



एक पेड मा के नाम या अभियायनांतर्गत विद्यार्थाना वृक्ष वाटप करण्यात आले



एक पेड मा के नाम या अभियायनांतर्गत मा प्राचार्य मार्गदर्शन करताना



महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०२५ २६ च्या राष्ट्रीय सेवा योजनेत कार्यक्रमांचे उद्घाटन करण्यात आले



महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०२५ २६ च्या राष्ट्रीय सेवा योजनेत कार्यक्रमांचे उद्घाटन करण्यात आले



राष्ट्रीय सेवा योजना उद्घाटन समारंभ



'जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन



राष्ट्रीय सेवा योजना विविध उपक्रम



'जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन



जागतिक युवा दिन कार्यक्रमात प्रसिद्ध उद्योजक धुमाळ सर यांचे व्याखान



जागतिक युवा दिन कार्यक्रमात प्रसिद्ध उद्योजक धुमाळ सर यांचे व्याखान



जागतिक युवा दिन कार्यक्रमात सहभागी विद्यार्थी



जागतिक युवा दिन कार्यक्रमात सहभागी विद्यार्थी यांना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ.संजय कांबळे



राष्ट्रीय सेवा योजना व रेड रिबन क्लब अंतर्गत विद्यार्थ्यांची जिल्हा उप रुग्णालय या ठिकाणी भेट आयोजित करण्यात आली

अहवाल विभाग



अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष अहवाल

अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष, बी.बी.ए. (सी.ए.) विभाग व प्राध्यापक प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक व शिक्षकेतर सेवकांसाठी क्षमता वृद्धी कार्यक्रमांतर्गत 'कृत्रिम बुद्धिमत्ता' या विषयावर दि. १६ ते २० जून, २०२५ या कालावधीत पाच दिवसीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. रयत शिक्षण संस्था ए.आय. प्रशिक्षण व अंमलबजावणीविषयी धोरणात्मक पावले उचलत सर्व शाखांमध्ये शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी कृती कार्यक्रम राबत असून त्यातून भविष्यातील आव्हाने संधीमध्ये रूपांतरित होतील व त्यातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नक्कीच फायदा होईल. महाविद्यालयाच्या बी.बी.ए.(सी.ए.) विभागातील प्रा. साहिल ससाणे, प्रा.अमीर शेख प्रा. तृप्ती हारदे –कोरडे, प्रा. सुविधा तावडे व प्रा. संकेत सूर्यवंशी यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेसंबंधीच्या मशीन लर्निंग, स्क्रॅच कोडींग या घटकांवर मार्गदर्शन केले.

रयत शैक्षणिक संकुल, श्रीरामपूर; साई सोशल फाउंडेशन; ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती यांच्या संयुक्त विद्यमाने मा. श्री. प्रतापराव पवार, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सकाळ पेपर्स प्रा.लि. आणि विश्वस्त, ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंटल ट्रस्ट, बारामती व रयत शैक्षणिक संकुल श्रीरामपूर, साई सोशल फाउंडेशन व ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती यांच्या संयुक्त विद्यमाने २२ जून, २०२५ रोजी आयोजित केलेल्या 'AI तंत्रज्ञान व ऊस उत्पादन वाढीचे आधुनिक तंत्रज्ञान' या विषयावरील बोरावके महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेचे उद्घाटन झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या सदस्य मा. मीनाताई जगधने होत्या. तसेच याप्रसंगी मा. आमदार श्री. हेमंत ओगले, विधानसभा सदस्य, श्रीरामपूर उपस्थित होते.

१२ ऑगस्ट, २०२५ रोजी नवप्रवेशित विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी उद्बोधन कार्यक्रम मा. प्राचार्य डॉ. संजय कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षणपद्धती, शैक्षणिक संधी, नियमावली तसेच सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाबाबत मार्गदर्शन करणे हा होता. त्यांनी विद्यार्थ्यांना शिस्त, सातत्यपूर्ण अभ्यास आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्याचे आवाहन केले. तसेच आधुनिक शिक्षणपद्धतीत कौशल्यविकास, संवादकौशल्य आणि डिजिटल ज्ञानाचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी विविध विभागप्रमुख व प्राध्यापकांनी महाविद्यालयातील अभ्यासक्रम, अंतर्गत मूल्यमापन पद्धती, सहशैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांची माहिती दिली.

रयत शैक्षणिक संकुल श्रीरामपूरमधील चंद्ररूप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, रा. ब. नारायणराव बोरावके कॉलेज, स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन यांच्या अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष व प्राध्यापक प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने २७ सप्टेंबर, २०२५ रोजी ''उच्च शिक्षणातील बदलते शिक्षण प्रवाह' या विषयावर रयत शिक्षण संस्थेचे संघटन मा. डॉ. अनिल पाटील साहेब यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केलेले होते. यावेळी तिन्ही महाविद्यालयांचे प्राचार्य डॉ. प्रवीण बडधे , डॉ. संजय कांबळे व प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे उपस्थित होते.

रयत शैक्षणिक संकुलाच्या वतीने आयोजित केलेल्या भारताचे माजी केंद्रीय कृषीमंत्री व रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष पद्मविभूषण मा. खासदार शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या ८५ व्या वाढदिवसानिमित्त १७ डिसेंबर, २०२५ रोजी 'पद्मविभूषण मा. खासदार शरदचंद्रजी पवार साहेब यांचे जीवन व कार्य' या विषयावर त्यांच्या व्यक्तित्व व कर्तृत्वाचा आरसा दाखवणाऱ्या पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आलेले होते. यात शरद पवार यांच्या दुर्मिळ छायाचित्रांचे व पुस्तकांचे प्रदर्शनाला तीन हजार विद्यार्थ्यांनी भेट दिली.

५ फेब्रुवारी, २०२६ रोजी अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष व अंतर्वासिता समन्वय समिती यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण– २०२० अन्वये निर्धारित केलेल्या व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अभ्यासक्रमात समाविष्ठ केलेल्या अंतर्वासिता उद्बोधन कार्यशाळेमध्ये प्राचार्य डॉ. संजय कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाचे परीक्षा अधिकारी प्रा. सचिन कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या उद्बोधन कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना अंतर्वासितेची संकल्पना,



उद्दिष्टे आणि कार्यपद्धती यांची सविस्तर माहिती देण्यात आली.

बी. बी. ए. (सी. ए.) विभागासाठी उद्‌बोधन कार्यक्रम २३ फेब्रुवारी ते ६ मार्च, २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आला. या उपक्रमांतर्गत विद्यापीठ अनुदान आयोग, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद नवी दिल्ली या शिखर संस्थांविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – २०२० ची तोंड ओळख करून देऊन मूल्यमापनासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

संशोधन विभाग अहवाल

१. ०४ सप्टेंबर २०२५

रयत शिक्षण संस्थेच्या चंद्ररूप डाकले जैन वाणिज्य महाविद्यालयातसंशोधन केंद्र, ARC व IQAC यांच्या संयुक्त विद्यमाने "Avishkar: Inspiring Future Innovators" या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. डॉ. अमितकुमार गागरे यांनी विद्यार्थ्यांना संशोधन कल्पना विकसित करणे, सादरीकरण कौशल्ये व पेटंट प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले. या सत्रात १०९ विद्यार्थी व ७ शिक्षक सहभागी झाले.

२. २४ सप्टेंबर २०२५

महाविद्यालय स्तरावरील अविष्कार स्पर्धा – २०२५ संपन्न झाली. या स्पर्धेत २५ पोस्टर सादर करण्यात आले. परीक्षक म्हणून डॉ. भाऊसाहेब शिंदे व डॉ. अनिकेत खत्री यांनी काम पाहिले. ६ संघ झोनल स्पर्धेसाठी निवडले गेले. विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती व नवोपक्रमाची जाणीव निर्माण झाली.

३. २४ डिसेंबर २०२५

महाविद्यालयातील १७ विद्यार्थ्यांनी ९ प्रकल्पांसह रयत अविष्कार स्पर्धेत सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी कृषी, अभियांत्रिकी, वाणिज्य व व्यवस्थापन या विविध गटांमध्ये प्रकल्प सादर केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधन व नवोपक्रमाबद्दलची आवड वाढली.

४. १६ फेब्रुवारी २०२६

संशोधन केंद्र, ARC व वाणिज्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने "Basics of Research Methodology and M.Com Project" या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमात CA (Dr.) निखिल गोयल व डॉ. भागवत अरुण यांनी मार्गदर्शन केले. एकूण ९५ विद्यार्थी व ९ कर्मचारी सहभागी झाले. विद्यार्थ्यांना संशोधन पद्धती, प्रकल्प लेखन व संशोधन नैतिकतेबाबत मार्गदर्शन मिळाले.

५. २०२५–२६ (पेटंट कार्य)

महाविद्यालयातील प्राध्यापकांनी संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. डॉ. अनिकेत खत्री व डॉ. नितीन साळवे यांनी विविध विषयांवर पेटंट प्राप्त/नोंदणी केली आहे. या कामगिरीमुळे महाविद्यालयाच्या संशोधन गुणवत्तेत भर पडली आहे.

Career Oriented Courses:

शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये सिनिअर महाविद्यालयात Career Oriented Courses सुरु करण्यात आला. या कोर्स अंतर्गत Banking, Agro Business Management, Marketing Management & Office Automation हे एकूण चार Programmes घेतले गेले. सदर कोर्स मध्ये शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये एकूण १७० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने वर्ग पूर्ण करून ऑनलाईन परीक्षा घेऊन कामकाज पूर्ण करण्यात आले.



IBPS अहवाल

रयत शिक्षण संस्थेचे चंद्ररूप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC), वाणिज्य विभाग आणि IBPS बँकिंग मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ३० जुलै २०२४ रोजी 'बँकिंग क्षेत्रातील करिअर संधी' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांना बँकिंग क्षेत्रातील विविध रोजगार संधींबाबत मार्गदर्शन करणे तसेच IBPS, SBI, RBI व इतर स्पर्धा परीक्षांविषयी माहिती उपलब्ध करून देणे हा होता. या कार्यशाळेस बी.कॉम. व एम. कॉम. विभागातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन व मान्यवरांच्या स्वागताने करण्यात आली. प्रास्ताविकामध्ये आजच्या आर्थिक आणि व्यावसायिक क्षेत्रात बँकिंग क्षेत्राचे वाढते महत्त्व अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा. श्री. अनिरुद्ध मैड, शाखा व्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र, भांबळेश्वर हे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना बँकिंग क्षेत्राची रचना, उपलब्ध रोजगार संधी, आवश्यक कौशल्ये, तसेच स्पर्धा परीक्षांची तयारी कशी करावी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना यशस्वी होण्यासाठी संवादकौशल्य, गणितीय क्षमता, वेळेचे व्यवस्थापन आणि सातत्यपूर्ण सराव यांचे महत्त्व पटवून दिले.

कार्यशाळेदरम्यान विविध बँकिंग पदांची माहिती, पात्रता निकष, परीक्षा पद्धती, मुलाखत तंत्र तसेच करिअरमधील प्रगतीच्या संधी याविषयी विद्यार्थ्यांना सखोल माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी प्रश्नोत्तर सत्रात सक्रिय सहभाग नोंदवून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांविषयी आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टीकोन निर्माण झाला.

सदर कार्यक्रमाचे आयोजन IQAC, वाणिज्य विभाग आणि IBPS बँकिंग मार्गदर्शन केंद्र यांच्या सहकार्याने यशस्वीरीत्या पार पडले. प्राध्यापकवर्ग, कर्मचारीवर्ग आणि विद्यार्थी स्वयंसेवक यांनी कार्यक्रमाच्या नियोजन व अंमलबजावणीत मोलाचे सहकार्य केले. एकूणच ही कार्यशाळा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरली.

प्लेसमेंट अँड ट्रेनिंग सेल रिपोर्ट

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या कालावधीत प्लेसमेंट अँड ट्रेनिंग सेल मार्फत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्लेसमेंट सेलमार्फत विविध उपक्रम राबविण्यात आले.

दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी आयबीएम स्किल प्रथम इन्फोटेक, मुंबई यांच्या मार्फत विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन व प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये खालील विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले:

करिअर मॅनेजमेंट

इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी

आर्टिफिशियल इंटेलिजन्स (Fundamentals)

या कार्यक्रमामध्ये प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष व तृतीय वर्ष मधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.तसेच, या संस्थेसोबत महाविद्यालयाचा करार (MoU) करण्यात आला.

दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ रोजी महाविद्यालयामध्ये ॲक्सिस बँक मार्फत मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. या मुलाखतीमध्ये विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला व त्यापैकी काही विद्यार्थ्यांची यशस्वी निवड झाली.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये महाविद्यालयातील एकूण १२ विद्यार्थ्यांची विविध क्षेत्रांमध्ये निवड झाली आहे.

०६ विद्यार्थी अग्निवीर (संरक्षण क्षेत्र)

०६ विद्यार्थी शासकीय क्षेत्रात

महाविद्यालयाने आयोजित केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमांमुळे व प्लेसमेंट उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना करिअरच्या उत्तम संधी उपलब्ध झाल्या. भविष्यातही अशाच प्रकारचे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना अधिकाधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न राहील.



शॉर्टटर्म कोर्स अहवाल

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे, त्यांच्यामध्ये कौशल्याधारित शिक्षणाची जाणीव निर्माण करणे तसेच रोजगाराभिमुख क्षमता विकसित करणे या उद्देशाने रयत शिक्षण संस्थेचे चंद्ररूप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर येथे शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये तब्बल २४ विविध शॉर्ट टर्म कोर्सेसचे

आयोजन करण्यात आले. आजच्या स्पर्धात्मक आणि तंत्रज्ञानप्रधान युगात केवळ पारंपरिक शिक्षण पुरेसे नसून विद्यार्थ्यांकडे व्यावहारिक ज्ञान, संवादकौशल्य, संगणक साक्षरता, नेतृत्वगुण आणि व्यक्तिमत्त्व विकास यांसारखी कौशल्ये असणे अत्यावश्यक बनले आहे. ही गरज ओळखून महाविद्यालयाने विद्यार्थ्यांसाठी विविध उपयुक्त, आधुनिक आणि रोजगाराभिमुख अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले.

या २४ अभ्यासक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना बँकिंग, संगणक वापर, व्यवसाय व्यवस्थापन, व्यक्तिमत्त्व विकास, मुलाखत कौशल्ये, संवादकौशल्य, उद्योजकता विकास, डिजिटल कौशल्ये, स्पर्धा परीक्षा तयारी, वित्तीय साक्षरता, ई–कॉमर्स, करिअर मार्गदर्शन अशा विविध विषयांवर प्रशिक्षण व मार्गदर्शन देण्यात आले. प्रत्येक अभ्यासक्रमामध्ये तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून विद्यार्थ्यांना सैद्धांतिक ज्ञानासोबतच प्रत्यक्ष जीवनातील उपयोगिता आणि करिअरच्या संधी यांची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांना रोजगार बाजारातील बदलत्या अपेक्षा, उद्योग क्षेत्रातील संधी आणि व्यावसायिक यशासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांविषयी सखोल मार्गदर्शन मिळाले.

अभ्यासक्रमांच्या उद्घाटन कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षणाचे महत्त्व पटवून देत अशा अभ्यासक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. प्राध्यापकवर्गाने विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण पद्धती, करिअर नियोजन आणि आत्मविकास याविषयी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. विविध क्षेत्रातील तज्ज्ञ वक्त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या शंका निरसन केले व यशस्वी करिअरसाठी आवश्यक असलेले आत्मविश्वास, सातत्य आणि सकारात्मक दृष्टीकोन यांचे महत्त्व स्पष्ट केले.

विद्यार्थ्यांनी या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. अभ्यासक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण, संघभावना, सादरीकरण कौशल्य आणि व्यावसायिक दृष्टीकोन विकसित होण्यास मदत झाली. तसेच विद्यार्थ्यांना भविष्यातील रोजगार आणि स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक असलेली तयारी करण्यास प्रेरणा मिळाली.

महाविद्यालयातील विविध विभाग, खटअउ, प्राध्यापकवर्ग, कर्मचारीवर्ग आणि विद्यार्थी स्वयंसेवक यांच्या सहकार्याने हे सर्व २४ शॉर्ट टर्म कोर्सेसयशस्वीरीत्या राबविण्यात आले. एकूणच, हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तावृद्धीसाठी, व्यक्तिमत्त्व विकासासाठी आणि उज्ज्वल करिअर घडविण्यासाठी अत्यंत उपयुक्त, प्रेरणादायी आणि परिणामकारक ठरला.

कॉमर्स असोसिएशन अहवाल

शैक्षणिक वर्ष २०२५ २६ मध्ये कॉमर्स असोसिएशनच्या अंतर्गत एकूण ५ कार्यक्रम घेतले गेले. त्यामध्ये विद्यार्थ्यांना करिअर संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. प्रामुख्याने कॉमर्स असोसिएशन अंतर्गत ७ मार्च २०२६ रोजी कॉमर्स फेस्टिवल चे आयोजन करण्यात आले त्यामध्ये ४५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

सी.ए./सी.एस./सी.एम.ए. गाईडन्स सेंटर अहवाल

विद्यार्थ्यांच्या करिअर डेव्हलपमेंट साठी विविध मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

सी.ए/ सी. एस/ सी. एम.ए. गायडन्स सेंटर अंतर्गत पाच विद्यार्थी सीए फाउंडेशन आणि तीन विद्यार्थी सीए फायनल एक विद्यार्थी सीएस फायनल प्रमाणित झाले आहेत.



राष्ट्रीय सेवा योजना विभाग

अ.क्र.	कार्यक्रमाचे नाव	कार्यक्रमाची तारीख	प्रमुख मार्गदर्शक/ व्याख्याते	कार्यक्रमाची माहिती
१	आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ विरोधी दिन (International Day Against Drug Abuse and Illicit Trafficking)	११ जुलै २०२५	डॉ. घंगाळे एस.डी.	राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना अमली पदार्थांचे दुष्परिणाम, त्यांचे आरोग्यावर व समाजावर होणारे परिणाम याबाबत माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये नशामुक्त जीवनाची जाणीव निर्माण करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले.
२	जागतिक लोकसंख्या दिन World Population Day)	११ जुलै २०२५	श्री. नागपुरे व्ही. बी.	राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमात लोकसंख्या वाढ, त्याचे सामाजिक व आार्थिक परिणाम तसेच कुटुंब नियोजनाचे महत्व याबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये लोकसंख्या विषयक जागरुकता वाढली.
३	अवयवदान जनजागृती सप्ताह	१३ ऑगस्ट २०२५	प्रसन्न धुमाळ, बाबासाहेब जाधव	विद्यार्थ्यांमध्ये अवयवदानाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. अवयवदानाचे महत्व, त्याची प्रक्रिया आणि समाजासाठी त्याचे फायदे याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.
४	आंतरराष्ट्रीय युवा दिन	१३ ऑगस्ट २०२५	प्रसन्न धुमाळ, बाबासाहेब जाधव	आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात युवकांपुढील आव्हाने, नेतृत्वगुण, सामाजिक जबाबदारी आणि राष्ट्रनिर्मितीत युवकांची भूमिका यावर मार्गदर्शन करण्यात आले.
५	माझे महाविद्यालय – स्वच्छ महाविद्यालय	१४ ऑगस्ट २०२५	डॉ. संजय कांबळे	राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत महाविद्यालय परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. स्वयंसेवकांनी परिसरातील कचरा गोळा करुन स्वच्छतेबाबत जनजागृती केली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबद्दल जागरुकता आणि सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण झाली.
६	ज्येष्ठ नागरिक सन्मान उपक्रम	२१ ऑगस्ट २०२५	डॉ. संजय कांबळे	समाजातील ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करण्यासाठी आणि त्यांच्या योगदानाची जाणीव करुन देण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये ज्येष्ठांविषयी आदर आणि संवेदनशिलता वाढविण्याचा उद्देश होता.



७	शिक्षक दिन व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन जयंती	५ सप्टेंबर २०२५	डॉ. संजय कांबळे	शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांनी शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली आणि डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.
८	वृक्षारोपण कार्यक्रम	२७ सप्टेंबर २०२५	डॉ. संजय कांबळे	पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांनी झाडे लावून पर्यावरण संरक्षणाची शपथ घेतली.
९	स्वच्छता ही सेवा अभियान	१ ऑक्टोबर २०२५	डॉ. संजय कांबळे	स्वच्छ भारत अभियानाच्या अंतर्गत विद्यार्थ्यांनी श्रमदान करुन परिसर स्वच्छ केला. स्वच्छतेचे महत्व समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी जनजागृती करण्यात आली.
१०	भारतीय संविधान अमृत महोत्सव – संविधान जागृती	१४ ऑक्टोबर २०२५	प्रा. दीपक जोंधळे	संविधानाबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी रॅली, स्ट्रीट प्ले आणि व्याख्यान आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी संविधानातील अधिकार व कर्तव्ये याविषयी माहिती दिली.
११	पोस्टर सादरीकरण कार्यक्रम	१४ ऑक्टोबर २०२५	प्रा. दीपक जोंधळे	संविधान, मतदान आणि नागरिक कर्तव्ये या विषयांवर विद्यार्थ्यांनी पोस्टर सादरीकरण केले. या माध्यमातून सामाजिक संदेश देण्यात आला.
१२	वंदे मातरम् राष्ट्रीय गीत १५० वा वर्धापन दिन	७ नोव्हेंबर २०२५	डॉ. संजय कांबळे	वंदे मातरम् राष्ट्रीय गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त समूहगायन व व्याख्यान कार्यक्रम आयोजित करण्यात आाल. विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना जागृत करण्यात आली.
१३	मतदार जनजागृती कार्यक्रम	२५ नोव्हेंबर २०२५	प्रा. दीपक जोंधळे	लोकशाही प्रक्रियेत मतदानाचे महत्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यासाठी मतदार जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.
१४	संविधान दिन	२६ नोव्हेंबर २०२५	डॉ. संजय कांबळे	संविधान दिनानिमित्त विद्यार्थ्यांना संविधानातील मूलभूत अधिकार व कर्तव्ये याबद्दल माहिती देण्यात आली.
१५	जागतिक एड्स दिन (World AIDS Day)	१ डिसेंबर २०२५	प्रसन्न धुमाळ (समुपदेशक उपजिल्हा रुग्णालय, श्रीरामपूर)	राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालय परिसरातून एड्स जनजागृती रॅली काढून करण्यात आली. स्वयंसेवकांनी हातात फलक घेऊन ''एड्सपासुन बचाव करा'', ''जागरुकता हाच उपाय'', ''आरोग्यदायी जीवन–सुरक्षित जीवन'' अशा घोषणांद्वारे नागरीकांमध्ये जनजागृती केली. रॅलीनंतर विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानात एचआयव्ही/एड्सची कारणे, प्रतिबंधक उपाय, तसेच समाजातील गैरसमज दूर करण्याबाबत माहिती देण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जागरुकता



				वाढली आणि समाजात एड्सविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्याची प्रेरणा मिळाली
१६	वीर बाल दिवस	२६ डिसेंबर २०२५	डॉ. संजय कांबळे	गुरु गोविंदसिंग यांच्या साहिबजाद्यांच्या बलिदानाची आठवण करुन देण्यासाठी वीर बाल दिवस साजरा करण्यात आला.
१७	राष्ट्रीय युवा दिन	१६ जानेवारी २०२६	मा.श्री. नवनाथ धुमाळ (उद्योजक)	स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारा कार्यक्रमा आयोजित करण्यात आला. युवकांना राष्ट्रनिर्मितीसाठी प्रेरित करण्यात आले.
१८	राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी शिबिर	२३ ते २९ जानेवारी २०२६	डॉ. संजय कांबळे	वडाळा महादेव येथे 'विशेष हिवाळी शिबीर' आयोजित करण्यात आले. या शिबिरामध्ये ग्रामस्वच्छता, पाणी व्यवस्थापन, वृक्षारोपण, आरोग्य जनजागृती, व्याख्याने व सामाजिक उपक्रम राबविण्यात आले.

उद्योजकता विकास केंद्र (CIIED)

1) FDP on Entrepreneurshpi Development

2) Guest Lecture on Government Schemes for Entrepreneurshpi Development

3) Guest Lecture on International Tourism Day

4) Workshop on The Mindset of Entrepreneurs

5) Workshop Interaction with Successful Entrepreneurs

सविस्तर अहवाल:

१) FDP on Entrepreneurshpi Development: महाविद्यालयात प्राध्यापकांसाठी उद्योजकता विकास विषयावर एफ.डी.पी. आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये तज्ज्ञांनी आधुनिक उद्योजकता, स्टार्टअप संस्कृती आणि नवकल्पनांवर मार्गदर्शन केले.

२) Guest Lecture on Government Schemes for Entrepreneurshpi Development: विद्यार्थ्यांना विविध शासकीय योजनांची माहिती मिळावी यासाठी एकदिवसीय व्याख्यान आयोजित करण्यात आले. यामध्ये स्टार्टअपसाठी उपलब्ध निधी, अनुदान व नोंदणी प्रक्रियेबाबत माहिती देण्यात आली.

३) Guest Lecture on International Tourism Day: आंतरराष्ट्रीय पर्यटन दिनानिमित्त आयोजित व्याख्यानामध्ये पर्यटन क्षेत्रातील उद्योजकतेच्या संधींवर प्रकाश टाकण्यात आला. विद्यार्थ्यांना पर्यटन

व्यवसायातील संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

४) Workshop on The Mindset of Entrepreneurs: या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकीय विचारसरणी विकसित करण्यावर भर देण्यात आला. नेतृत्व, जोखीम घेण्याची क्षमता आणि समस्या सोडविण्याच्या कौशल्यांवर मार्गदर्शन करण्यात आले.

५) Workshop: Interaction with Successful Entrepreneurs: यशस्वी उद्योजक पद्मश्री प्रतापराव पवार यांच्या सोबत संवाद सत्र आयोजित करण्यात आले. त्यांनी त्यांच्या अनुभवांद्वारे विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली व उद्योजकतेतील आव्हाने व संधींबाबत मार्गदर्शन केले.



राष्ट्रीय छात्र सेना

महाविद्यालयात ५४ NCC Cadets चे Unit कार्यरत आहे. या शैक्षणिक वर्षात 'बी' आणि 'सी' परीक्षेचा निकाल १०० % लागला . शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये ३८ एन.सी.सी कॅडेट्सने Annual Camp 57 महाराष्ट्र बटालियन अंतर्गत चखठउ अहिल्यानगर येथे पूर्ण केले . या शैक्षणिक वर्षात ५७ महाराष्ट्र बटालियन येथें बी.एच .एम जगमोहन निर्मल सर , एच.एम . राजेंद्र भालेराव सर , हवालदार सतपाल सिंग यांनी महाविद्यालयात येऊन एन.सी.सी कॅडेट्स ला Physical Training दिली तसेच त्यांना आर्मी भारतीविषयी मार्गदर्शन केले .

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये कॅडेट विशाल अशोक रननवरे, कॅडेट. योगेश शिवाजी पटारे , कॅडेट.सुयश राजेंद्र मुसमाडे कॅडेट ओम किशोर मैसमाळे ,कॅडेट. दीपक अशोक पवार , कॅडेट ओम सुनील कायगुडे अशा ७ एन.सी.सी. कॅडेट्सची इंडियन आर्मी (अग्नीवीर) मध्ये निवड झाली तसेच कॅडेट कु.श्वेता धरमचंद वाघमारे हिची ठाणे पोलीस मध्ये पोलीस म्हणून निवड झाली .

या कालावधीत पूर्ण केला.एन.सी.सी. विभाग अंतर्गत या शैक्षणिक वर्षात आंतरराष्ट्रीय योग दिन ,वृक्षारोपण, रक्तदान शिबीर , राष्ट्रीय एकता दिवस , स्वच्छता अभियान , राष्ट्रीय एन.सी.सी दिवस, आर्मी डे , राष्ट्रीय एड्स दिवस या सारखे उपक्रम राबविले गेले.

सांस्कृतिक विभाग

सांस्कृतिक विभागांतर्गत विविध राष्ट्र पुरुषांच्या जयंती व पुण्यतिथीनिमित्त प्रतिमा पूजन आयोजित करण्यात आले.

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती निमित्त १९ सप्टेंबर, २०२५ रोजी ६३ वी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेमध्ये १८ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. प्रथम क्रमांक माने मिथुन दत्तात्रय यांनी पटकाविला.

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती सोमवार, दिनांक २२ सप्टेंबर २०२५ रोजी साजरी करण्यात आली. त्या निमित्ताने महाविद्यालयात कर्मवीर जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. दिनांक २२ सप्टेंबर २०२५ ते २७ सप्टेंबर २०२५ या कालावधीत महाविद्यालयात मेहेंदी, रांगोळी व पोस्टर सादरीकरण अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

पद्मविभूषण, माननीय खासदार शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या ८५ व्या जयंतीनिमित्त १२ डिसेंबर ते १६ डिसेंबर, २०२६ रोजी युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. ग्रंथ प्रदर्शन , पुस्तक परीक्षण, मेहंदी व रांगोळी अशा विविध स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त १६ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत ग्रंथ प्रदर्शन, पोस्टर सादरीकरण, पुस्तक परीक्षण, स्वच्छता अभियान, निबंध स्पर्धा व व्याख्यान आणि पोवाडा सादरीकरण असे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

८ एप्रिल ते १४ एप्रिल, २०२६ या कालावधीत महात्मा ज्योतीराव फुले व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सव साजरा करण्यात आला. या निमित्त १८ तास अखंड वाचन उपक्रम, ग्रंथ प्रदर्शन, स्वच्छता अभियान व व्याख्यान आयोजित करण्यात आले.

सांस्कृतिक विभागाच्या विविध उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते, तसेच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळून त्याचा त्यांना भविष्यात स्वतःच्या जीवनाची दिशा ठरविण्यास मदत होते.



विद्यार्थिनी मंच विभाग

१.दिनांक १८ जुलै २०२५, रोजी स्वामी सहजानंद भारती शिक्षण शास्त्र महाविद्यालय, श्रीरामपूर येथे महिला सक्षमीकरण व सबलीकरण कार्यशाळेसाठी ४१ विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

२. दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी सावित्रीबाई फुले जयंती निमित्त महाविद्यालयात व्हय, मी सावित्रीबाई या नाट्यप्रयोगाचे सादरीकरण करण्यात आले. लेखन आणि दिग्दर्शन सुषमा देशपांडे व सादरकर्त्या शुभांगी भुजबळ शिल्पा साने यांनी केले.

३.दि.१३ जानेवारी २०२६ रोजी निर्भय कन्या अभियान उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमा मध्ये दोन व्याख्याने आयोजित करण्यात आले.त्यासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून मा. सौ. डॉ. अंजली कदम व प्रा. वीणा मुंगसे या उपस्थित होत्या. या अभियानांतर्गत १३ जानेवारी ते २० जानेवारी या दरम्यान विद्यार्थिनींसाठी कराटे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.त्यासाठी कु. प्रतिभा गायकवाड यांनी विद्यार्थिनींना ८ दिवसाचे कराटे प्रशिक्षण दिले. या उपक्रमासाठी १८६ विद्यार्थिनी सहभागी होत्या. व ५२ विद्यार्थिनींनी कराटे प्रशिक्षण घेतले.

४.दिं ४ जानेवारी २०२६ रोजी स्वयंसिद्धा युवती संमेलन शारदाबाई पवार महिला आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज बारामती या ठिकाणी ४ जानेवारी ते ७ जानेवारी २०२६ या दरम्यान आयोजित करण्यात आले. या संमेलनामध्ये महाविद्यालयातील इइअ(उअ) विभागातील व वाणिज्य विभागातील २४ विद्यार्थीनिनी सहभाग घेतला. ङ्कमाझे महाविद्यालय–आमच्या महाविद्यालयातील सर्वोत्कृष्ट उपक्रमङ्क या स्पर्धेत शर्मा सानिया राजेंद्र व कोळपकर वैष्णवी किरण यांनी सहभाग घेतला. तसेच युथ आयकॉन या स्पर्धेत कडू वैष्णवी या विद्यार्थिनीने सहभाग घेतला.

५.दि.१० मार्च २०२६ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रम साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी मा. मीनाताई जगधने अध्यक्ष म्हणून उपस्थित होत्या. तर प्रमुख पाहुण्या म्हणून माजी विद्यार्थीनी मा.सोनार पल्लवी मेहंदी आर्टिस्ट व सोनार अबोली फॅशन डिझाईन आर्टिस्ट उपस्थित होत्या. या दरम्यान महाविद्यालयातील सर्व शिक्षिका प्राध्यापिकाचा सत्कार करण्यात आला व महाविद्यालयातील अनेक स्पर्धेत भाग घेतलेल्या विद्यार्थिनींचा गुणगौरव करण्यात आला.या कार्यक्रमाने विद्यार्थिनीनां प्रेरणा मिळाली.



मराठी विभाग

पुस्तक परीक्षण आणि सादरीकरण :–

मंगळवार दि. १६ डिसेंबर २०२५ रोजी स. १०.०० वा. सेमिनार हॉलमध्ये पद्मविभूषण, माननीय खासदार शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या ८५ व्या जयंतीनिमित्त युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्ताने मुलांमध्ये पुस्तकांविषयी आवड निर्माण व्हावी म्हणून 'पुस्तक परीक्षण आणि सादरीकरण' या विषयावर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. प्रा. डॉ. अनिकेत खत्री हे होते, तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. पौर्णिमा गुजर यांनी भूषविले होते. या कार्यक्रमामुळे तरुणांमध्ये वाचनाची आवड, विचारांची देवाणघेवाण आणि सांस्कृतिक जाणीव अधिक दृढ झाली.

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा (दि.१४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२६) :–

महाविद्यालयात महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांच्या परिपत्रक क्रमांक–०३/२०२६ व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या दि. ०९/०१/२०२६ च्या परिपत्रक क्रमांक –०३ नुसार दि. १४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२६ या कालावधीत 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' विविध कार्यक्रम व स्पर्धांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

गुरुवार दि. २२ डिसेंबर २०२५ रोजी स. ९.३० वा. ०५ नंबर हॉलमध्ये 'मी मराठी – स्वाक्षरी मराठी' या विषयावर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. प्राचार्य डॉ. संजय कांबळे हे होते, तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान वाणिज्य विभाग प्रमुख मा. डॉ. संतोष घगांळे यांनी भूषविले होते.

मंगळवार दि. २३ डिसेंबर २०२५ रोजी स. ९.३० वा. १३ नंबर हॉलमध्ये 'कुसुमाग्रज साहित्य वाचन उपक्रम' या विषयावर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. प्राचार्य डॉ. संजय कांबळे हे होते, तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान वाणिज्य विभाग प्रमुख मा. डॉ. अनिकेत खत्री यांनी भूषविले होते.

गुरुवार दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी स. ९.३० वा. 'कवितेचे रसग्रहण आणि संगीतीकरण'या विषयावर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. प्राचार्य डॉ. संजय कांबळे हे होते, तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा. सोमेश कुलकर्णी रा.ब. नारायणराव बोरावके महाविद्यालय, मराठी विभाग, यांनी भूषविले होते.

'मराठी भाषा गौरव दिन' (२७ फेब्रुवारी २०२६) :–

शुक्रवार दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी स. ९.३० वा. 'मराठी भाषा गौरव दिन'सेमिनार हॉलमध्ये साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख मा. त्या प्रा. डॉ. भागवत शिंदे (स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर) यांचे 'मराठी भाषा आणि करिअर'या विषयावर व्याख्यान झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. डॉ. अनिकेत खत्री हे होते.

लेखक आपल्या भेटीला :–

महाविद्यालय सोमवार, दि. ०९/०३/२०२६ रोजी आंतरिक गुणवत्ता हमी कक्ष, मराठी विभाग व वाणिज्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'लेखक आपल्या भेटीला' हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्राचार्य डॉ. संजय कांबळे यांनी केले. अध्यक्षस्थानी मा. मीनाताई जगधने (सदस्य, मॅनेजिंग कौन्सिल, रयत शिक्षण संस्था, सातारा) उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून मा. किशोर निमर्ळ (अध्यक्ष, किसान कनेक्ट, श्रीरामपूर) होते. मा. किशोर निमर्ळ लिखित 'पाथ फाईंडर्स या पुस्तकाविषयी माहिती सांगीतली. या पुस्तकाच्या माध्यमातून त्यांनी त्याच्या जीवनातील अनेक गोष्टीचा उलगडा करून जीवनातील संघर्ष गाथा मांडली. प्रमुख पाहुणे मा. विकास अंत्रे (उपसंपादक, पुण्यनगरी), मा. करण नवले (उपसंपादक, राष्ट्रसह्याद्री) व मा. रवी भागवत (चित्रकार, श्रीरामपूर) यांनी आपले विचार मांडले.



ग्रंथालय

महाविद्यालयीन युवक युवतीमध्ये वाचन संस्कृती जतन, संवर्धन आणि वाढविण्याचे काम ग्रंथालय करत असते. बौद्धिक, शैक्षणिक आणि सामाजिक प्रगती वाढविण्याचे काम ग्रंथालय पार पाडत आहे. ग्रंथालयाची सक्षम अधिकारी, कौशल्यपूर्ण शिक्षण, सामाजिक, पर्यावरणीय, नवीन तंत्रज्ञान आणि संदर्भ या बाबत वैचारिक जागृतीची विकासात्मक भूमिका असते. ग्रंथालय हे पूर्णपणे संगणकीयकृत असून त्याचबरोबर संदर्भ ग्रंथ, क्रमिक पाठ्यपुस्तके, वृत्तपत्रे, ई–साहित्य, नियतकालिके, मासिके इ. ग्रंथ उपलब्ध आहे.

बुक – बैंक योजनाः

सन २०२५–२६या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयातील ९१७ विद्याथ्यांनी विद्यार्थ्यांनी बुक बँक योजनेचा लाभ घेतला.

उपक्रम

१. वाचन प्रेरणा दिन

२. ग्रंथ वाचन प्रेरणा सप्ताह

३. मा. खासदार शरदचंद्रजी पवार साहेब वाढदिवसानिमित्त पुस्तक प्रदर्शन

४.छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त पुस्तक प्रदर्शन

५. महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त पुस्तक प्रदर्शन

